ॐ

विवाह.

लेखक

विद्याभूषण

मोरो विनायक शिंगणे.

किंमत १ रुपया.

विवाह.

लेखक

विद्याभूषण
मोरो विनायक शिंगणे,

यांनीं

मुंबईत “ तत्त्वविवेचक ” छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १९१९.

शके १८४१. संवत १९७६.

किंमत १ रुपया.

मुंबईः—खेतवाडी ब्याकरोड घर नंबर १–
छापखान्यांत रा. श्रीधर विष्णु कामत
विनायक शिंगणे, मुरारजी गोकुळदास
मेनरोड, मुंबई नं. ४ येथें प्रसिद्ध केलें.

ा ३ येथें
नीं छापिलें
ल्डिंग्स नं.

अर्पणपत्रिका.

र रावसाहेब श्रीधर बाळकृष्ण उपासनी
बई सरकारच्या कायदेकौन्सिलचे सभासद,

ह्यांस,

विद्याभिरुचि, समाजसेवा, सत्यशोधकपणा,
ीकृत कार्य शेवटास नेण्याची उत्सुकता
वगैरे सद्गुण पाहून

हा

अल्पसा ग्रंथ अति नम्रतापूर्वक
अर्पण केला आहे.

मोरो विनायक शिंगणे.

विषयप्रवेशिका.

मनुष्यप्राणी जन्मास आल्यावर तो जसजसा मोठा होतो, तसतसे त्यास सुखोपभोग हवे असतात. सुखाची आशा धरून ते जेवढे जास्त मिळतील, तेवढे मिळविण्याचा तो प्रयत्न करीत असतो. धनदौलत, दासदासी, अनेक तऱ्हेचीं वाहनें हीं सुद्धां संसारी मनुष्याच्या सुखाचीं साधनें होत, असें जरी आहे, तरी त्यांत खरें सुख नाहीं, ह्याचें कारण आपण ज्या सुखाचा अनुभव घेतों, त्यास कोणीतरी जिवलग वाटेकरी पाहिजे, असें त्यास वाटत असतें, व हें वाटणेंही साहजिकच आहे. कारण खरी कळकळ, खरें प्रेम व खरोखर काळजी वाहणारें जर कोणी ह्या जगांत असेल तर ती एक माता व दुसरी पत्नी हींच होत. (अहेतुकें चित्तें । अनुष्ठा पां यातें । पतिव्रता पतीतें । जियापरी) मातेचें प्रेम निर्हेतुक असतें, तेवढ्या प्रमाणानें कुलीन पत्नीचेंही असतें. पत्नी जरी झाली तरी तिला पुढें माता व्हावयाचें असतें. मी व माझा पति हीं उभयतां जरी शरीरानें भिन्न असलों, तरी मनानें एकच आहोंत, असें सुशील पत्नीस सदोदित वाटतें, व हें वाटणें हेंच त्या उभयतांस आनंदानें संसारसुखाचा अनुभव घेण्यास कारणीभूत होतें. उत्तम गृहिणी ही घराची मालकीण, सर्व संसार तिच्याच आधारावर चालणारा, तिच्याच आधारावर संसाराची उभारणी करावयाची असते. गृहिणी म्हणजेच घर, अशा योग्यतेची ती असल्याकारणानें तिला कुटुंब ही बहुमानाची संज्ञा प्राप्त होते. ही संज्ञा प्राप्त होण्याला कोणत्या तरी विशिष्ट प्रकारचा संस्कार हवा असतो. आमच्या आर्यावर्तांत मुख्यत्वें करून आर्यांत विवाहरूपी संस्कार हाच स्त्रीपुरुष एकजीव होण्यास, त्यांचा समाजांत दर्जा वाढविण्यास, धर्मानुकूल आचरण करून योग्यतेला चढविण्यास, धर्माचरणानें संतति उत्पन्न करण्यास कारणीभूत आहे. विवाहसंस्कारावांचून पतिपत्नींचें नातें येत नाहीं, एवढेंच नव्हे, तर संस्कारविरहित जोडप्यास समाजांत मान न मिळतां उलट त्यांस हलकें मानण्यांत येतें. विवाहसंस्कारानें पवित्र झालेला पुरुष गृहपति होतो, जो गृहपति झाला त्याला धार्मिक कृत्यें आपल्या विवाहित पत्नीबरोबर करण्याचा अधिकार पोंचतो, ते अधिकार

असंस्कारी जोडप्यास मिळत नाहींत. सारांश असा परस्परांचा योग्यता वाढविणारा, समाजाचा पाया, सर्व आश्रमांचा पोषक असा जो विवाह-संस्कार त्याची उपयुक्तता सर्वांस कळणें हें अत्यंत जरुरीचें आहे.

ह्या विवाहरूपी बंधनानें स्त्री व पुरुष हीं एकमेकांस बद्ध करून घेतात. वैदिक कालापासून आर्यांच्या प्राचीन इतिहासाकडे जर नजर दिली, तर, व्यक्तिबंधन असावें म्हणून म्हणा, किंवा ज्या ज्या वेळीं व्यक्ति-विषयक-सौख्य-कल्पना-तरंगानें समाज उच्छूंखल होईल म्हणून म्हणा, एकेका व्यक्तीला एकेक बंधन लावून दिलें, एवढेंच नव्हे, तर शास्त्रीयरीतीनें त्या बंधनाला घट्ट बांधून नियमबद्ध करून त्यापासून च्यूत होतां येऊं नये, म्हणून शास्त्रकर्त्यांनीं बरीच खबरदारी घेतली आहे. ह्या बंधनामुळेंच अनेक भार्यात्व जाऊन पुरुषानें एकाच स्त्रीबरोबर व स्त्रियेनें एकाच पुरुषाबरोबर विवाह संस्कारानें बद्ध होऊन आपला संसार सुखानें करावा, वर्णसंकर होऊं नये, म्हणून विवाहरूपी संस्काराचें बंधन हें असलें पाहिजे. ह्या विवाहरूपी संस्काराची दिशा समजावी, आपण विवाहप्रसंगीं जे विधि करतों, त्यांचें ज्ञान व्हावें, ज्ञानपूर्वक केलेल्या कर्मांची योग्यता विशेष आहे हें प्रत्येक कार्यकर्त्या पुरुषास समजावें, विवाहांत होणाऱ्या प्रत्येक विधींची माहिती प्रत्येक स्त्रीपुरुषांस असावी, म्हणून होतां होईल तों सोप्या व सरळ भाषेंत ह्या विषयाचा उपक्रम करण्यांत आला आहे. यजमान हे रुढीचे दास, त्यांच्या ठिकाणीं श्रद्धा खरी, पण ती देखोदेखी असून ज्ञानपूर्वक नाहीं, ह्याचें कारण ह्या विवाहरूपी संस्कारांत होणाऱ्या गोष्टींची माहिती त्यांस कोणी देत नाहीं, कर्म करणारे व कर्म सांगणारे ह्यांची ह्या गोष्टीविषयीं अनभिज्ञता, त्यामुळें सर्वच कार्य अंधारांत चाललेलें असतें. विवाहसंस्काराच्यायोगें परक्याच्या कन्येशीं आपला संबंध जुळून ती व आपण तादात्म्य पावून संसारयात्रा कंठावयाची असते, सुसंतान उत्पन्न करावयाचें असतें, व पर्यायानें ह्या संस्काराचा परिणाम कुटुंबावर व समाजावरही घडणारा असतो. अशा संस्कारानें बद्ध होणापूर्वीं कोणत्या व कशा प्रतिज्ञेनें आपण घट्ट बांधून जाणार आहोंत, आपणावर जबाबदारी किती आहे, ह्याची विवाहित जोडप्यास माहिती नसली, तर संसारांत क्लेशापलिकडे कांहीं सांपडणें नाहीं. कित्येक म्हणतील कीं आमच्या विवाहाच्यावेळीं आम्हांला उपाध्यायांनीं विवाहप्रसंगीं होणाऱ्या कर्मांची माहिती न देतां कसें तरी

आमचें लग्न लावून दिलें, असें असतां आम्हीं सुखासमाधानानें संसार रेटतों कीं नाहीं ? हें त्यांचें ह्मणणें केवळ टाकाऊ आहे असें मुळींच नाहीं, हल्लीं असे प्रकार चाललेले दिसतात. ह्याचें कारण हल्लीं सुज्ञ मनुष्यांचे ठिकाणीं जो उत्साह हवा असतो, जी हुरूप असावयास पाहिजे व आपणासारखा आपण पुत्र निर्माण करून त्याला आत्मज्ञान शिकवीन असा आत्मविश्वास पाहिजे, असल्या सर्व गोष्टींचा अभाव होऊन भलत्याच कुळांत भलताच मनुष्य जन्म घेऊन कुलाचा नाश होतो, तो कुलविध्वंस होऊं नये, कुलाचें रक्षण व्हावें, ह्मणून विधिपूर्वक विवाह हे झालेच पाहिजेत. प्रत्येक प्राण्याचा देह हा त्याच्या पित्याच्या शरीरांतील नसानसांपासून उत्पन्न होतो, करितां सुसंतति उत्पन्न व्हावी, अशी इच्छा धरणारांनीं वरील गोष्टीकडे लक्ष द्यावें. मनुष्यप्राणी हा स्वैर वर्तन करणारा असतो. त्यास बंधन नको असतें. त्याची इच्छा नेहमीं मनमानेल तसें वर्तन करण्याची असते, अशावेळीं त्याला असें वाटतें कीं, हीं धर्मबंधनें नकोत. ह्यांच्यावांचून आमचें कांहींएक अडत नाहीं. आमच्या आचरणास आडकाठी नसावी. असें जरी त्यांस वाटतें, तरी हें त्यांचें वाटणें विचारपूर्वक नसतें, ह्याचें कारण यज्ञाच्यायोगें पर्जन्य पडतो, असें जरी आहे, तरी यज्ञ न करतां पर्जन्य पडतो कीं नाहीं ? मग यज्ञाची ती एवढी काय जरूर ! मनुष्य मोकळा असला ह्मणजे त्याच्या मनास येईल तसें तो अन्न खातो, पण तेंच अन्न त्यास तुरुंगांत असतांना मिळेल काय ? खचीत नाहीं. त्याचप्रमाणें विधिपूर्वक जो विवाह होईल, तो हक्कपूर्वक स्वतःचा संसार सुखानें रेटील. यज्ञाच्यायोगें हक्कानें पाऊस पडलाच पाहिजे., मग मेघराजाच्या कृपेची अपेक्षा करण्याचें कारण नाहीं, त्याचप्रमाणें प्रत्येक कर्म हें जाणून केलें तर तें इच्छित फल दिल्यावांचून राहणार नाहीं. असो.

ज्ञान ही अगम्य चीज आहे. हें ज्ञान प्राप्त करून देण्यास ज्यांच्या उपदेशाचा अंकुर कारणीभूत झाला, तो हळुहळु वृद्धिंगत झाला, त्यास गोड फळें येऊं लागलीं असे परमपूज्य गुरुवर्य वे. शा. सं. **नरहरशास्त्री गोडसे** ह्यांचे प्रथमतः आभार मानले पाहिजेत. ज्या ज्या वेळीं जी जी माहिती लागली, ती ती शास्त्रीबुवांनीं मला लागलीच दिली. तसेंच वे. शा. सं. **गंगाधर त्र्यंबकशास्त्री जोशी याज्ञिक** व वे. शा. सं. **वैजनाथ लक्ष्मण आठवले**

ह्या उभय गृहस्थांनीं मला मदत करून हा प्रयत्न पैलतीरास नेण्यास मला साहाय्य केलें, त्याबद्दल त्यांचेही आभार मानले पाहिजेत. **शास्त्रोद्धारक खेमराज श्रीकृष्णदास** ह्यांनीं ज्या ज्या वेळीं मला जीं जीं पुस्तकें लागलीं तीं देऊन बरेंच ऋणी केलें आहे. तसेंच स्वर्ग० शेट जगमोहनदास वृंदावनदास भाईशेट ह्यांचे ट्रस्टी शेट **चुनीलाल जीवनदास**, रा. रा. **मुकुंद रामराव जयकर**, ब्यारिस्टर ॲट लॉ ह्यांनीं पुस्तक प्रकाशनाचे कामीं मला मदत केली त्याबद्दल त्यांचे, तसेंच रा. **लक्ष्मण बाळकृष्ण नायक**, रा. **रामराव बाळकृष्ण कीर्तिकर** व रा. **नारायण लक्ष्मण नाईक** ह्यांनीं हस्तेंपरहस्तें मदत केली, करितां ह्या सर्वांचा मी फारफार आभारी आहें. प्रस्तुत विषय निबंधरुपानें कोल्हापूर येथील " धर्मविचार " नामक मासिक पुस्तकांत त्या मासिकाचे संपादक वे. शा. सं. **पित्रेशास्त्री** (हल्लीं श्रीमत् जगद्गुरु श्रीशंकराचार्य करवीर पिठाधिपति) ह्यांनीं प्रसिद्ध केला त्याबद्दल त्यांचे व शेवटीं हें पुस्तक लिहितांना अनेक ग्रंथांचें आलोडन करावें लागलें त्या सर्व ग्रंथकर्त्यांचा मी अत्यंत आभारी आहें.

आतां कोणतेंही काम करूं गेलें कीं तें " सर्वारंभा हि दोषेण " ह्या न्यायाला अनुसरून दोषविरहित होत नाहीं, असें जरी आहे, तरी " सदोषमपि न त्यजेत ". दोष घडतील म्हणून सोडून देणें, किंवा मुळींच न करणें हेंही श्रेयस्कर नाहीं. निर्दोष असें एक ब्रह्मच आहे. एवढ्याकरितां ह्या प्रयत्नांत न्यूनाधिक असल्यास सज्जनांनीं त्याची क्षमा करावी.

शेवटीं जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृपेनें माझा हा अल्पसा प्रयत्न सिद्धीस गेला, म्हणून त्यास शतशः प्रणाम करून वाचकांची रजा घेतों.

मुरारजी गोकुळदास बिल्डिंग्स नं. ३.
खेतवाडी मेनरोड, मुंबई नं. ४.
ता० १७-९-१९.

मोरो विनायक शिंगणे.

विषयानुक्रमणिका.

विवाह.

भाग पहिला.

*प्रियतमाकर एष गुणाकरः सुखकरः स च संततिविस्तरम् ।
बहुतरं विदधाति सुकर्मभिः स च जनैः सुजनैरिव सेव्यताम् ॥

आपला संसार सुखाचा जावा, आपणांस सुख प्राप्त व्हावें, ही इच्छा प्रत्येक मनुष्याची असते. दुःख कोणास नको आहे. यच्चावत् सर्व प्राणी सुखाकरितां धडपडत असतात. जी वस्तु आपणांस नकोशी होते, तीच दुसऱ्यास प्रिय वाटते. आपल्या अंगांतील कपडा जरा कोठें फाटला कीं, तो आपण भिकाऱ्यांस देतों, व मोठ्या आनंदानें ते त्याचा स्वीकार करून वापरतात; म्हणजे जी वस्तु एकास नकोशी होते, तीच दुसऱ्यास मोठ्या सुखाची वाटते; असें जरी आहे, तरी आपणांस होणारें दुःख हें जर दुसऱ्यास देऊं गेलों, तर तें घेण्यास कोणीच तयार होत नाहीं; ह्याचें कारण तें घेतल्यानें जीवास नानातऱ्हेच्या यातना भोगाव्या लागून रात्रंदिवस तळमळ सुरु होते. सुखाचा लवलेशही नसतो. तर हें सुख प्राप्त व्हावें कसें? हा प्रश्न उभा राहतो. सुख प्राप्त व्हावें अशी उत्कट इच्छा असेल तर, जेवढे जेवढे म्हणून सुख प्राप्त होण्याचे उपाय सांगितले आहेत त्यांचें अवलंबन केलें पाहिजे. सुख प्राप्त होण्याचे रस्ते सोडून जर आपण भलत्याच मार्गानें वाहवलों, व त्यापासून अपाय घडला तर तो दोष

---

* विवाह हा पत्नी प्राप्त करून देणारा, केवळ गुणाची खाण, सुख देणारा व बहुत संततिकारक व सत्कर्माचें साधन असा असून सुजनांची जशी संगति धरतात तशी ह्याची धरून जन त्याचा स्वीकार करोत.

नियम घालून देणाराचा नसून नियम मोडणाराचा आहे, नियमांचें उल्लंघन केलें तर अनर्थ ओढवणार. अनर्थ ओढवले कीं संसार कष्टमय होणार, व संसार कष्टमय झाला कीं जीवित असून नसून सारखेंच. प्राणी जन्मास येऊन त्याच्या हातून जर जीविताचें सार्थक झालें नाहीं, तर त्याचें जन्मास येणें न येणें सारखेंच. जन्मास येऊन जर पुरुषार्थ केला नाहीं, सत्कृत्यें घडलीं नाहींत, तर मानवदेह घेण्यांत अर्थ तो कोणता! कोणतेंही काम हेतुवाचून नसतें. मग ते हेतु बरे असोत अगर वाईट असोत, पण ते असतात एवढी गोष्ट सिद्ध आहे. मनाची प्रवृत्ति प्रत्येक मनुष्याच्या आचारावर, विचारावर व धर्मावर अवलंबून असते. " आचारः प्रथमो धर्मः " किंवा " आचारो धर्मपालकः " प्रथम आचार शुद्ध पाहिजे. घरांतील वागणूक बालबोध, व्यवस्थित व संतोषदायक अशी असली पाहिजे, पण जर ह्याच्या उलट प्रकार असला तर, तें घरांत राहणेंही नको व तें जीवितही नको अशी स्थिति होते. चांगले विचार येण्यास उत्तम संस्कार पाहिजेत, व ह्या उत्तम संस्कारांचें मूळ पुरुषार्थांत आहे. हे पुरुषार्थ चार प्रकारचे आहेत. १ धर्म, २ अर्थ, ३ काम, ४ मोक्ष. धर्मास जरी प्रथम जागा दिली आहे, तरी, पहिल्यानें अर्थ पाहिजे. अर्थानें कामना पुरवितां येतात. कामना पूर्ण झाल्या कीं, धर्म साधतां येतो व धर्म साधतां आला कीं मोक्ष मिळतो. धर्म शब्दाचे अनेक अर्थ होतात. कोणास एक पैसा दिला कीं तो झाला धर्म, भोजन घातलें झाला धर्म, मुलानें बापाच्या आज्ञेंत वागणें हा त्याचा धर्म, देवपूजा करून नैवेद्य दाखवून मग भोजन करणें हाही धर्म. आतां धर्माचें खरें रहस्य कोणतें हें समजणें जरूर आहे. भाजी शिजवितांना तिच्यांत मीठ घातलें म्हणजे तें जसें भाजीच्या नसानसांत भिनून जातें, व खाणारास ती स्वादिष्ट लागते, त्याचप्रमाणें ब्रह्मचर्यांत मिळविलेल्या ज्ञानाच्यायोगें धार्मिक तत्वेंही मनुष्याच्या नसानसांत भिनून तीं त्याला पापभीरु, सत्याचरणी, स्वावलंबी व श्रेष्ठतम अशा उच्चतम पदवीला पोंचवितात. धर्माचें खरें खरें रहस्य ज्याला समजलें, त्याच्यावर कितीही बिकट प्रसंग आले, तरी तो न डगमगतां एका सत्याच्या जोरावर, स्वतःच्या विश्वासावर व मी धर्माचें रक्षण करतों, तेव्हां धर्महो माझें रक्षण करील, अशा दृढ भावनेनें आपण आपला उद्धार करून घेतों. अर्थ साधावयाचा तर त्यास प्रथम ब्रह्मचर्य पाहिजे. ब्रह्मचर्याच्या

योगें शरीर धष्टपुष्ट, निरोगी, तेजस्वि व वीर्यवान बनतें. ब्रह्मचर्याची प्रथा तुटल्यापासून मनुष्यप्राणी दुबळे बनले, परक्यांच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी आली, उत्साहाची जागा निरुत्साहानें पटकावली, आळस आला व शेवटीं सर्वस्वीं घात होण्याची पाळी आली. हल्लीं जो मनु आहे, तोच पूर्वीं होता, हल्लीं जशीं माणसें आहेत, तशींच पूर्वीं होतीं. हल्लीं जशी मनुष्यांच्या डोक्याची रचना आहे, तशीच पूर्वींही होती; मग आतांच्यांत व पूर्वींच्यांत एवढा फरक कां आढळून येतो, ह्याचें कारण पाहूं गेलें तर फक्त एकच, व तें परंपरा तुटली हें होय. ब्रह्मचर्यानें गुरुगृहीं राहून आपल्या ब्रह्मचर्याचे जोरावर आपलें आयुष्य वाढवून आपल्या मगजांतून उत्तम विचार बाहेर पाडणारे पूर्वींचे महात्मे कोणीकडे, व हल्लींच्या काळीं फक्त नांवाला उपनयन संस्कार करून यथेच्छ विहार करणारे व निर्मगजी विद्यार्थी आपल्या नजरेस पडतात ते कोणीकडे. गुरुगृहीं ब्रह्मचर्यव्रताचें पूर्णपणें पालन होत असल्याकारणानें रोगांस विद्यार्थ्यांकडेस डोकावून पाहण्याची प्राज्ञाच नव्हती. ह्याचें कारण तेथील राहण्याची शिस्तच अशी होती कीं, सर्व कृत्यें विधिपूर्वक होऊन तीं पुनः नियमित होत असत. त्यामुळें हल्लीं जसा रोगाचा सुकाळ झाला आहे, तसा पूर्वीं होत नव्हता; व यदाकदाचित् जरी रोग असतील, तरी ते हल्लींच्यासारखे वाढत्या प्रमाणांत नसावेत. शारीरिक बळाचे खेळ हल्लीं मुलांकडून करवून घेण्यांत येतात, पण नुसतें शारीरिक बळ उपयोगाचें नाहीं, तर त्यांजबरोबर मनोवृत्तीही मजबूत झाल्या पाहिजेत. असें जरी आहे, तरी त्यांच्या नियमितपणाकडे, खाण्यापिण्याकडे व कपड्यालत्त्याकडे कोणाचें फारसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं, व जरी जात असलें तरी उपाय साध्य नाहींत. त्या बाबतींत गुरुकडे फारसा दोष नसतो, तर तो मुलांच्या आईबापांवर विशेष आहे. कदाचित् कोणी म्हणेल कीं ब्रह्मचर्य पाळावें म्हणून तुम्हीं सांगतां, पण तें पाळ-तांना खाण्यापिण्याचीही तशीच सोय पाहिजे. नुसतें ब्रह्मचर्य पाळून शरीरसंपत्ति प्राप्त होत नसते, त्याला खुराकाचीही जरूर आहे. गोष्ट खरी आहे. हल्लीं पूर्वींसारखी स्वस्ताई नाहीं, दुधातुपाची टंचाई पडली, प्रत्येक जिन्नस महाग विकूं लागल्याकारणानें तो खरेदी करण्याचें त्राणही लोकांत उरलें नाहीं. राहण्याची उत्तम सोय नाहीं, शुद्ध हवा नाहीं. पोट भरण्याकरितां शारीरिक व मानसिक श्रम फार करावे लागतात; त्यामुळें मनुष्य थकून जातो. हें जरी खरें आहे,

तरीपण, बारीक विचार करून पाहिलें तर आपणांस असें दिसून येईल कीं, दोन्ही गोष्टींपैकीं एक गोष्ट तरी आपणांस साध्य आहेना!! जी साध्य असेल ती करण्यास कोणती हरकत आहे! एक गोष्ट जरी मजबूत असली तरी पुष्कळ काम होईल. दुसरी गोष्ट साध्य नाहीं म्हणून पहिल्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें तर " इदं च नास्ति परं च न लभ्यते " म्हणजे हेंही नाहीं व तेंही नाहीं. मध्येंच लडबडणें बरोबर नाहीं, म्हणून जी गोष्ट आपणांस साध्य आहे, ती तरी साधून घेण्यास व आचरणांत आणण्यास कोणती अडचण आहे! ती गोष्ट म्हणजे ब्रह्मचर्याचें अवलंबन करणें होय. ब्रह्मचर्याच्यायोगें अर्थ साधतां येतो. अर्थ साधला कीं गृहस्थाश्रमासारखी कामना पुरविणारी परिस्थिति प्राप्त होते. ह्या गृहस्थाश्रमांतच राहून सर्वांचा परामर्ष घेतां येतो, दानधर्म करतां येतो, परोपकाराचीं कृत्यें घडतात. ब्रह्मचर्यावस्थेंत मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करतां येतो, व त्या ज्ञानाच्यायोगें मोक्ष मिळतो. असा हा मोक्ष मिळवून देणारा पुरुषार्थ अर्थानें प्राप्त होतो; व हा अर्थ विवाहाच्या योगें साध्य होतो, तेव्हां विवाह म्हणजे काय हें पाहूं.

संस्कार.

जगच्चालक परमेश्वरानें ही सृष्टि कीटपतंगापासून तो सर्वांत श्रेष्ठ अशा मनुष्य-प्राण्यापर्यंत निर्माण करून तिची रचना केली. त्यांत मनुष्यप्राणी हा बुद्धीनें, सामर्थ्यानें व आपल्या कर्तबगारीनें श्रेष्ठ असल्यामुळें त्याची गणना इतर सर्व प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ गणली गेली. इतर प्राण्यांस परमेश्वरप्राप्तीच्या मार्गाची रीतसर माहिती नसल्याकारणानें त्यांस नीच कोटींत गणून मनुष्यदेह हा ईश्वरप्राप्ति करून घेण्यास योग्य असल्यामुळें अर्थातच श्रेष्ठ गणला जातो, ह्यांत नवल नाहीं. ईश्वरप्राप्तीचीं साधनें जाणण्याची ह्याची योग्यता असल्याकारणानें त्याच्यामागें कर्ममार्ग रीतसर लावून दिले. तीं कर्में सुव्यवस्थित चालावीं म्हणून नियमांची सांगड घालून दिली कीं, जे नियम पाळले असतां त्याचें कोणत्याही रीतीनें पतन होऊं नये. पशूसारखे त्याच्या हातून व्यवहार घडूं नयेत, त्यानें आपला दर्जा ओळखून आपलें काम बजावावें, एवढेंच केवळ नव्हे, तर त्यानें जेवढे जेवढे प्रयत्न आपल्या मनुष्यपणाला शोभतील असे व्यवहार करावे, व हे व्यवहार करण्याचीं जीं बंधनें त्या बंधनांस, किंवा मनांत अनेक तऱ्हेचे विचार भरलेले असतात त्यांस, सुमार्गास लावण्याचे जे साचे त्यांस संस्कार म्हणतात. हे

संस्कार पाळले असतां मनुष्याचें शरीर, वाणी व मन हीं शुद्ध होतात; आत्मज्ञानासारख्या सूक्ष्म विषयांचें ज्ञान होण्यास शुद्धि ही आवश्यक आहे. भगवान् याज्ञवल्क्य म्हणतात:—

मलिनो हि यथादर्शो रूपालोकस्य न क्षमः ।
तथा विपक्वकरणमात्मज्ञानस्य न क्षमः ॥

मलीन दर्पणांत जसें मुख दिसत नाहीं, तसें संस्कारानें अंतःकरण शुद्ध झाल्यावांचून आत्मज्ञान होणें शक्य नाहीं. हे संस्कार नेहमीं आदेशाचें काम करीत असतात. आदेश ह्मणजे एक गोष्ट काढून त्या ठिकाणीं दुसरी बसविणें. जसें इ+अ ह्यांचा संधि झाला असतां त्यांच्या जागीं य येतो, इचा समूळ लोप होऊन तिचा मागमूसही राहत नाहीं, ह्मणून आदेश हा शत्रुवत् व आगम हा मित्रवत् समजला जातो. मनुष्याचे मनावर अनेक जन्मींच्या संस्कारांचा जो लेप बसला आहे तो नवीन आदेशानें नाहींसा करावयाचा असतो, ह्मणजे मनुष्यास नवीन विचार करावयास लावावयाचें असतें.

हे संस्कार सोळा आहेत. १ गर्भाधान, २ पुंसवन, ३ सीमन्तोनयन, ४ जातकर्म, ५ नामकरण, ६ निष्क्रमण, ७ अन्नप्राशन, ८ चूडाकर्म, ९ कर्णवेध, १० उपनयन, ११ वेदारंभ, १२ समावर्तन, १३ विवाह, १४ वानप्रस्थ, १५ संन्यास १६ अंत्येष्टि. हे संस्कार मनुष्यमात्रांनीं पाळावे अशी वेदाज्ञा आहे. आश्वलायन, पारस्कर, गोभिल शौनक इत्यादिकांच्या गृह्यसूत्रांत ह्या वरील सोळा संस्काराविषयीं विस्तारपूर्वक माहिती देऊन हे संस्कार प्रत्येक मनुष्यानें अमलांत आणल्यानें त्याच्या शरीरावर वाईट परिणाम न होतां त्याची संसारयात्रा सुखाची जाईल ह्मणून वर्णन आहे. हे संस्कार पाळावे असें शास्त्रकार सांगतात, ह्मणून आह्मीं पाळावे, हें कोणीं ह्मणेल बरोबर आहे, पण जरी न पाळले, तरी आमचे व्यवहार कोठें बंद पडतात, ते तर यथास्थित चालले आहेत. मग ते मंत्र तंत्र व संस्कारांचें लचांड हवें कशाला? असें ह्मणणारेही बरेच हरीचे लाल आहेत. " यत् व्यथ तत् ज्ञापयति " ज्यांची जरूरी नाहीं त्यांची कटकट कां पाहिजे !! चुलीवर भांडें ठेवलें ह्मण मंत्र, त्यांत पाणी ओतलें ह्मण मंत्र, तांदुळ धुवून नंतर आंत ओतले ह्मण मंत्र, खालीं जाळ लावला ह्मण मंत्र. " अंगिरसां तपसा तप्यध्वं "

"'भृगुणां तपसा तप्यध्वं" तप्यध्वं काय आणि न तप्यध्वं काय. उगाच घोटाळा व कटकट. पण असें ह्मणणारे हे दृष्ट व अदृष्ट साधन जाणणारे नसतात. भात जेवलें हें दृष्ट साधन. पण तो घशाखालीं उतरून त्याचा पोटांत परिपाक होऊन समान वायु सर्व शरीरांत त्या अन्नांतील सात्विक भाग सारखा वाटून देतो, पण तो आपल्या नजरेस येत नाहीं, पण त्यांचा परिणाम आपल्या शरीरावर होतो हें अदृष्ट साधन. त्याचप्रमाणें "अंगिरसां तपसा तप्यध्वं" हा मंत्र म्हटल्यानें अंगिरसानें केलेल्या तपाची आठवण होऊन त्यानें जें तप केलें, त्या तपांत जी तेजस्विता होती, ती तेजस्विता त्या अन्नांत येऊन तें अन्न आमच्या शरीरांत प्रवेश करून आमच्याही ठिकाणीं ती तेजस्विता येवो; ह्याच भात शिजवितांना मंत्र म्हणण्याचा मुख्य उद्देश होय; व त्या उद्देशाला अनुसरून अदृष्ट असें जें ओज, तें आमच्या शरीरांत प्रवेश करून आम्हीं वीर्यवान् व्हावें ह्याच वरील सोळा संस्कार अंमलांत आणून त्यावेळीं म्हणावयाचे मंत्र ते म्हणून आपणांस ओजास्विता आणावी ह्याच मुख्य उद्देश होय.

वर जे सोळा संस्कार दिले, त्यांत हल्लींच्या काळीं द्विजांत दोन मोठे मानले जातात. प्रथम वेदाध्ययन करून ब्रह्मचर्य पाळण्याचा संस्कार मौंजीबंधन किंवा उपनयन, आणि दुसरा विवाह. आपलें आयुष्य ११६ वर्षें पर्यंत वाढवावें अशी ज्यास इच्छा असते, त्यांच्याकरितां २४ वर्षें प्रातःसवन ४४ वर्षेंपर्यंत माध्यंदिन-सवन, व ४८ वर्षेंपर्यंत तृतीयसवन करून त्या सवनांच्या देवतांची उपासना करावी म्हणून सांगितलें आहे. ब्रह्मचर्याच्यायोगें आयुष्य वाढतें, एवढ्या-करितां ब्रह्मचर्याची प्रतिष्ठा मोठी आहे. उपनयन संस्कार हा जसा ब्रह्मचर्य पाळण्याचा आरंभ, तसाच तो द्विजत्व प्राप्त करून देणारा आहे. उपनयन-संस्कारावांचून जसें द्विजत्व प्राप्त होत नाहीं, तसेंच विवाहावांचून गृहस्थाश्रमी होतां येत नाहीं. विवाह झाला कीं मनुष्य गृहस्थाश्रमी बनला, गृहस्थाश्रमी बनला कीं अतीताभ्यागताचा परामर्ष घेण्याचा अधिकार त्याजकडे येतो, "विद्यार्थी ब्रह्मचारीस्यात् सर्वेषां पालने गृही" विद्या संपादन करणारे ब्रह्मचारी, त्याचप्रमाणें संन्याशी ह्यांचा परामर्ष गृहस्थाश्रमांत राहिल्यानें घेतां येतो. "चतुर्णामाश्रमाणां हि गार्हस्थ्य श्रेष्ठमुत्तमम्" एवढी गृहस्थाश्रमाची योग्यता असल्याकारणानें "धन्यो गृहस्थाश्रमः" म्हणून त्याची पाठ थोपटली आहे. स्त्रीपुरुषांना धर्मबंधनानें

घट्ट बांधणारा व त्यापासून ढळूं न देणारा एक विवाहसंस्कार हाच होय, ह्याची योग्यता मोठी असल्याकारणानें तो मोठ्या थाटानें केला जातो.

विवाह शब्दाची व्याख्या.

गृहस्थाश्रमाचें मूळ विवाह, व विवाहाचा आत्मा प्रतिज्ञा. ज्या विवाहांत प्रतिज्ञा नसतात, किंवा असल्या तरी भटजीबुवाच वधूवरांस त्या समजावून न देतां आपणच बडबडत जाऊन कसे बसे एकदांचे खटपटींतून मोकळे होतात त्याचें नांव लग्न. लग्न म्हणजे जोडणें अथवा प्रीतीचें बंधन. लग्न प्रीति आहे तोंपर्यंतच टिकतें, प्रीतीचा नाश झाला कीं घटस्फोटाची पाळी येते. म्हटलें आहे " काम अंतरीं । प्रेम तोंवरीं । उभयतां पोटीं । ना तरी कपाळा आठी । पण प्रतिज्ञापूर्वक एकमेकांचें हृदय जाणून झालेलें जें बंधन किंवा जोडणें, त्याचा आजन्म ताटातूट होण्याचा प्रसंग येत नाहीं. विवाह शब्दाचें मर्म फार गूढ आहे. विशेष अधिकाराला प्राप्त होणें, धर्मपूर्वक वर्तणें, धर्मपूर्वक अर्थ संपादन करणें, अर्थानें कामना पुरविणें व शेवटीं मोक्ष मिळविणें ह्या क्रियेस विवाह म्हणतात. विशेषेंकरून संसाराला वाहून घेणें, किंवा वधूनें व वरानें पूर्ण ब्रह्मचर्य व्रत पाळून शुभ, गुण-कर्मस्वभावयुक्त उत्तम संतति उत्पन्न करण्यासाठीं जो प्रतिज्ञापूर्वक संबंध जुळविला जातो, त्यासही विवाह असें म्हणतात. गुरुकडे विद्या संपादन करून समावर्तन संस्कार झाल्यावर गृहस्थाश्रमी बनणें व पुढील आयुष्य धर्माचरणांत व सुखांत घालविण्यास अग्नि व स्त्री ह्यांची विशेष आवश्यकता असते, ह्या रीतीनें सुखानें आयुष्य घालविण्याचा जो उपाय तो विवाह होय. स्त्री व पुरुष अशा दोन भिन्न घटकांची एक व्यक्ति बनणें ह्यासही विवाह असें म्हणतात. विवाहास आणखीं नांवें आहेत तीं येणें प्रमाणें:—

१ विवाह, २ उद्वाह, ३ पाणिग्रहण, ४ परिणय, ५ उपमय. विवाह व उद्वाह यांचा अर्थ कन्येला वरानें घेऊन जाणें; पाणिग्रहण म्हणजे वरानें तिचा हात स्वीकारणें, परिणय म्हणजे वधूचा हात धरून वरानें तिच्याकडून अग्नीला प्रदक्षिणा घालविणें आणि उपमय म्हणजे वरानें वधूचा स्वीकार करणें होय. विवाह व लग्न हे शब्द हल्लीं लोकव्यवहारांत सारख्याच दर्ज्याचे मानले जातात.

लग्न म्हणजे एकमेकांनीं संलग्न होणें. ह्या संलग्न होण्यांत प्रेमापलीकडे बहुधा फारसा विचार असतो असें नाहीं. विवाहसंस्कारामुळेंच परक्याची कन्या

आपली भार्या होऊं शकते. विवाहपदानें पाणिग्रहण उक्त होतें, ह्याला श्रुतिप्रमाण असें आहे कीं विवाह म्हणजे दारकर्म व दारकर्म म्हणजे पाणिग्रहण. " वह प्रापणे " ह्या धातुपासून विवाह शब्द झाला आहे, म्हणजे दारसंग्रह करावा असें मेधातिथीचें म्हणणें आहे. मनुस्मृतींत म्हटलें आहे कीं—

पाणिग्रहणिका मंत्रा नियतं दारलक्षणम् ।
तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे ॥

हा मंत्र पाणिग्रहण करण्याचे वेळचा आहे. हा स्त्रीभाव व पतिभाव होण्याचें लक्षण आहे. ह्याच्यायोगें वर व वधू ह्यांचा संबंध जोडला जातो. कित्येक वेळां असेंही होतें कीं, विवाह शब्दाचा उपयोग पाणिग्रहण करण्याचा संबंध नसतांही योजला जातो. जसें:—

इच्छयाऽन्योन्यसंयोगः कन्यायाश्च वरस्य च ।
गांधर्वः स तु विज्ञेयो मैथुन्यः कामसंभवः ॥

कन्या वधूवर ह्यांची कामासक्तिपूर्वक इच्छा होऊन संयोग होतो, ह्या अशा संयोगाला गांधर्वविवाह असें म्हणतात. हा विवाह कामोत्पत्ति मुख्य असल्या-कारणानें मैथुनाकरितांच झालेला दिसतो. ह्याच तऱ्हेचे राक्षस व पैशाच हेही विवाह आहेत. आतां अशा होणाऱ्या संबंधास विवाह म्हणतां येईल कीं काय, हाही विचार अवश्य केला पाहिजे. आतां एवढेंवरीक अनुमान करतां येईल कीं, विवाह शब्दाचा सामान्य अर्थ स्त्रीपुरुषसंयोग असाच होतो. व्याकरणांत वि उपसर्गपूर्वक प्राप्त्यर्थ द्योतक (वह) धातुनें विवाह शब्द सिद्ध होतो. जी वस्तु मिळवावयाची त्याचें नांव प्राप्ति व वि उपसर्गानें त्याचा योगरूढ अर्थ विशेष प्राप्ति (स्त्रीपुरुषसंयोग विशेष) असा समजला जातो. योगरूढ म्हण-ण्याचें कारण असें आहे कीं, अन्य प्रकारची विशेष प्राप्ति करून घ्यावयाची तिला विवाह हा शब्द लावतां येत नाहीं, कारण विवाह शब्दाचा बोधक तो अर्थ नव्हे. अशा प्रकारचा विवाह शब्दाचा अर्थ आपण करूं लागलों तर व्यभिचारादि जे प्रकार होतात, त्यांसही विवाह म्हणतां येईल. व्यभिचारादि प्रसंगांत निश्चित स्त्रीपुरुषांचा संबंध नसतो, व तीं संभोग करणाराची मी बायको किंवा संभोग करणारा मी हिचा पति असें मानीत नाहींत. हा बुद्धिभाव नसल्याकारणानें अशा संयोगास विवाह हा शब्द लावतां येत

नाहीं. विवाह शब्दाचा अर्थ अशा रीतीनें होऊं लागला तर, दिवसांतून असे शेंकडोशें विवाह वीन खर्चानें होऊं शकतील. चोरी करणें हेंही एक कर्म आहे, व सावकारी करणें हेंही एक कर्म आहे, पण दोन्हीं कर्मांत जमीन-अस्मानाचें अंतर असून त्यांचीं फळेंही निरनिराळीं प्राप्त होतात. ब्राह्मादि श्रेष्ठ विवाह धर्मपूर्वक, धर्मबुद्धीनें, धर्मानुसार गार्हस्थ्य क्रिया वगैरे करून ईश्वराज्ञानुसार स्तुति, प्रार्थना, उपासना आपल्या कर्तव्यांची प्रतिज्ञा, वाडवडील, सगेसोयरे, इष्ट-मित्र, विद्वान् व धनिक ह्यांच्यासमोर आपणावरील जबाबदारी ओळखून आपल्या मातापितरांस आनंद देणारे असे जे विवाह ते खरे विवाह होत. कारण निदान आर्यावर्तांतील आर्य लोकांत व त्यांत विशेषतः उच्च वर्गांतील विवाह हे कराररूपी नसून संस्काररूपी आहेत. करार हे पाहिजे तेव्हां मोडतां येतात; पण संस्कारांस मोडतां येत नाहीं, तोडतां येत नाहीं किंवा लौकिकदृष्ट्या खोटे पाडतां येत नाहीं. अशी जरी परिस्थिति आहे तरी कित्येक अधम लोक आपल्या विवाहित धर्मपत्नीबरोबरचा संबंध तोडून निराळे राहिलेले आढळून येतात. हलक्या जातींत आणि असमंजस लोकांत काडी मोडून देण्याची चाल आहे, ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, संस्काररूपी विवाहाचें बंधन हें बहुधा उच्च वर्गांत त्यांत विशेषतः समंजस लोकांत प्राधान्यत्वें करून दिसून येतें.

विवाहाचें कारण.

स्त्रीपुरुषसंयोग यच्चावत् प्राणीमात्रांत होत असतो. मनुष्याचा जसा विशेष प्रकारानें ह्मणजे संस्काररूपानें होतो, व तो झाला कीं तो पुनः बदलत नाहीं, तशी गोष्ट इतर प्राण्यांत नाहीं; कारण त्यांस विवाहरूपी संस्काराचें बंधन नसतें. जर मनुष्यास विवाहाचें बंधन नसेल तर गृहस्थाश्रमांतील उत्तम व्यवहार नष्ट होऊन अव्यवस्था होईल, वृद्धावस्थेंत कोणी कोणाला विचारणार नाहीं. व्यभिचार वाढून सर्व लोक रोगी, दुर्बल व अल्पायु होतील. कोणाला कोणाची भीति राहणार नाहीं. कसलेंही वाईट कृत्य करण्यास कोणास कोणाची लज्जा वाटणार नाहीं, अनाचार वाढतील व कुलपरंपरा राहणार नाहीं; कोणी कोणाचे मिळकतीचा हक्कदार राहणार नाहीं. व कोणीही कोणत्या पदार्थावर दीर्घकाळपर्यंत स्वत्व सांगण्यास धजणार नाहीं. सारांश सर्वत्र गोंधळ माजून राहील; म्हणून नियमानुसार विधिपूर्वक स्त्रीपुरुषांचे

विवाह व्हावेत हेंच योग्य आहे. शिवाय मनुष्यास तीन प्रकारचें ऋण असतें. देवऋण, ऋषिऋण व पितृऋण. ह्या तीन ऋणांतून प्रत्येकास मुक्त व्हावें लागतें. यज्ञयागादिकेंकरून देवऋणांतून, वेदादि ग्रंथांचें पठणपाठण करून ऋषिऋणांतून व संतानोत्पत्ति करून पितृऋणांतून मोकळें व्हावयाचें असतें. हा मनुष्यलोक "पुत्रेणैव जय्यो नान्येन कर्मणा" पुत्र उत्पन्न करूनच जिंकतां येतो; व मरणसमयीं आपल्या मागें यज्ञयागादिक सुरळीत चालावे म्हणून पिता आपल्या पुत्रास जवळ बोलावून असें सांगतो कीं, हे पुत्र " त्वं ब्रह्म त्वं यज्ञ, त्वं लोक " त्यावेळीं आपल्या पित्यानें चालविलेलीं सर्व धर्मकृत्यें आपण चालविलीं पाहिजेत, सर्व जबाबदारी आपणावर आहे, हें ध्यानांत आणून पुत्र म्हणतो " ब्रह्माहं, यज्ञोऽहं लोक इति " बाबा, कांहीं एक काळजी करूं नका. आपलीं अंगिकृत सर्व धर्मकृत्यें मी यथास्थित चालवीन, त्यांत अंतर पडूं देणार नाहीं. आपलीं धर्मकृत्यें सुरळीत चालावीं म्हणून पुत्र हवा असतो, व तो झाला कीं मनुष्य पितृऋणांतून मुक्त होतो, व पितृऋणांतून मुक्त करणारा प्रथम पुत्र असल्याकारणानें पित्याचे पश्चात् सर्व अधिकार त्याजकडे येतात. यथाविधि विवाह झाल्यावांचून पुत्रास *औरस हें नांव मिळत नाहीं, व हें नांव आपल्या पुत्रास मिळावें म्हणून विवाह हा झाला पाहिजे.

विवाहकाल.

विवाहकालासंबंधानें बरेच मतभेद आढळून येतात. कित्येक आठव्या वर्षापासून मुली विवाहाला योग्य होतात, तर कित्येक ह्या मर्यादेपलीकडे विवाह लांबवावा, म्हणजे त्या प्राप्तयौवना झाल्यावर त्यांचा विवाह करावा म्हणून प्रतिपादितात. वास्तविक विवाहकाल कोणता असावा, त्याची मर्यादा शास्त्रकारांनीं कशी घालून दिली आहे, शारीरशास्त्रवेत्त्यांचें ह्या संबंधीं काय म्हणणें आहे, ह्याबद्दल अवश्य विचार केला पाहिजे.

पशुपक्षी हे आपल्या उपजत बुद्धीनें प्रवृत्त होत असल्यामुळें त्यांच्यांत मनुष्यप्राण्याएवढा अनाचार दृष्टीस पडत नाहीं. पशुपक्षी हे ऋतुकालींच स्त्रीगमन

* स्वक्षेत्रत्व, विवाहसंस्कारत्व आणि स्वयमनुपादत्व ह्या तीन गुणांनीं युक्त जी संतति असेल तिलाच औरसपणा प्राप्त होतो. ह्या तीन गुणाव्यतिरिक्त इतर संभोगाच्या योगें झालेली संतति कमी दर्ज्याची ठरवून त्यांस क्षेत्रज्ञ, कृत्रिम, गूढोत्पन्न, अपविद्ध, कानीन, सहोढ, क्रीत, पौनर्भव, स्वयंदत्त, व शूद्रपुत्र हीं नांवें देण्यांत येतात.

करीत असल्याकारणानें एकदां का गर्भ राहिला कीं, ते स्त्रीकडे ढुंकूनही पाहत नाहींत. शिवाय ते अमोघवीर्य असल्याकारणानें त्यांचा एकदां का संगम झाला कीं प्रायः गर्भधारण होतें. पशुंमध्यें जोंपर्यंत नियमितपणा आहे, तोंपर्यंत त्यांची संतति धष्टपुष्ट व बलवान् अशी निपजते. मनुष्यप्राण्यांतील नियमितपणा नष्ट झाल्यामुळें संतति रोगी, तेजहीन व नेहमीं अशक्त अशी निपजून वैद्य व डाक्तर ह्यांची रोजची गिऱ्हाईक बनते. ब्रह्मचर्य पूर्णपणें पाळून आपल्या वयाच्या २५ व्या वर्षीं किंवा त्या कालाच्या पुढें पुरुषानें विवाह करावा. गर्भस्थ स्थितिपासून वृद्धीला आरंभ होतो. पहिले नऊ महिने मुलांची वाढ झपाट्यानें होते. उपजल्यानंतर त्याची वाढ वाढत वाढत तो २० व्या वर्षापासून २५ व्या वर्षीं पूर्ण होते, व ह्याच वर्षीं मनुष्यशरीर पूर्णावस्थेस येतें. सुश्रुताचार्यांनीं शरीराच्या चार अवस्था दिल्या आहेत, त्या अशाः—

चतस्रोऽवस्थाः शरीरस्य वृद्धिर्यौवनं संपूर्णता किञ्चित्परिहाणिश्चेति ।

तत्रा षोडशाद् वृद्धिः । आ पंचविंशतेर्यौवनम् ।
आ चत्वारिंशतस्संपूर्णता । ततः किञ्चित्परिहाणिश्चेति ।
पंचविंशे ततो वर्षे पुमान्नारी तु षोडशे ।
समत्वागतवीर्यौ तौ जानीयात् कुशलोभिषक् ॥

वृद्धि, यौवन, संपूर्णता आणि परिहाणी. वृद्धि हा सोळा वर्षेंपर्यंत, यौवन पंचवीस वर्षेंपर्यंत, संपूर्णता चाळीस वर्षेंपर्यंत, व त्या कालानंतर परिहाणी सुरू होते. चाळीस वर्षेंपर्यंत सर्व शरीर उत्तम रीतीनें पुष्ट झाल्यानंतर शरीरांत जे सप्तधातु बनतात ते स्थिर न राहतां स्वप्न प्रस्वेदादिकांच्या द्वारें बाहेर पडतात, ह्या अवस्थेला परिहाणी म्हणतात. वृद्धि व *यौवन हे दोन काल. ह्या कालांत पुरुष २५ वर्षांचा व स्त्री १६ वर्षांची झाली कीं तीं प्रजोत्पादनार्थ लायक होतात.

त्रिंशद्वर्षः षोडशाब्दां भार्यां विंदेत नग्निकाम्† ।
किंवा–**सप्त संवत्सरादूर्ध्वं विवाह सार्ववर्णिकः ।**

---

* **आषोडशात् सप्ततिवर्षपर्यंतं यौवनम्**–वात्स्यायन–कामसूत्र.
सोळा वर्षांपासून ७० वर्षेंपर्यंत यौवन.

† **नग्निकाऽनागतार्तवा**–अमर.
यावन्नलज्जाशालिनी कन्या पुरुषसंनिधौ ।

कन्यायाः शस्यते राजन्नन्यथा धर्मगर्हितः ॥ महाभारत.

अथास्मै पंचविंशति वर्षाय षोडशवर्षा पत्नीमावहेत् ।
पित्र्यधर्मार्थ कामप्रजाः प्राप्स्यतीति ॥ सुश्रुत.

१६ वर्षांची कन्या व २५ वर्षांचा पुरुष झाला कीं त्याचें शारीरसामर्थ्य सारख्या प्रमाणांत असतें, अशांचा विवाह व्हावा असें जर कारण पडलेंच, तर तो करावा, पण असला विवाह अधम होय. १७ वर्षांची स्त्री व ३० वर्षांचा पुरुष, १८ वर्षांची स्त्री व ३६ वर्षांचा पुरुष, १९ वर्षांची स्त्री व ३८ वर्षांचा पुरुष ह्यांचा विवाह मध्यम, आणि २०, २१, २२, किंवा २४ वर्षांची स्त्री व ४०, ४२, ४६ किंवा ४८ वर्षांचा पुरुष ह्यांचा विवाह सर्वोत्तम होय, करितां हे ब्रह्मचारीन्, जर स्वकुलाची व स्वदेशाची उन्नति करण्याचा तुझा विचार असेल, तर वरील गोष्टीकडे लक्ष दे व त्याप्रमाणें आचरण* कर.

कन्येनें ब्रह्मचर्यव्रतानें राहून नंतर रूपवान्, सुशील व विद्वान् असा पति पाहून त्याजबरोबर विवाह करावा–

ब्रह्मचर्येण कन्या३ युवानं विंदते पतिम्–अथर्ववेद.

कन्यानां संप्रदानं च कुमाराणांच रक्षणम्
अविप्लुतब्रह्मचर्यो लक्षण्यां स्त्रियमुद्वहेत्–मनु.

योन्यादि नावगूहेत तावद्भवति नग्निका ॥
नग्निकां तु वदेत् कन्यां यावन्नर्तुमती भवेत् ।
ऋतुमतीत्व नग्निका तां प्रयच्छेत्तु नग्निकाम् ॥
अप्राप्ता रजसो गौरी प्राप्ते रजसि रोहिणी ।
अव्यजिता भवेत् कन्या कुचहीनाश्च नग्निका ॥

पुरुषांच्या सन्निध असतां लज्जा प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत ती नग्निका, कन्या ऋतुमति झाली नाहीं तोंपर्यंत ती नग्निका, रजोदर्शन झालें नसेल तोंपर्यंत गौरी व रजोदर्शन झालें कीं तिला रोहिणी म्हणावें.

* वरील विचार पूर्णपणें ब्रह्मचर्य पाळून यथाविधि गुरुगृहांतून परत येणाऱ्या विद्यार्थ्यां-करितां होत. हल्लीं वरील विचार लोकांस हास्यास्पद वाटणार, एवढेंच नव्हे तर ४८ व्या वर्षी नातु खेळविणारे गृहस्थही बरेच दृष्टीस पडतात. ४८ वर्षांचा पुरुष वृद्धांत खपून सरकारी नोकरी असल्यास पेनशनांत जाण्याच्या तयारींत असतो.

धर्मशास्त्रकारांनीं कन्येच्या विवाहाला सोळावें किंवा त्या काळाच्या पुढीलही मर्यादा देऊन तो युक्त असा मानला आहे; तरी त्यानें ब्रह्मचर्यानें राहिलेंच पाहिजे, व कन्या व पुत्र हीं ब्रह्मचर्यानें राहतात किंवा नाहीं, ह्याची चौकशी त्यांच्या मातापितरांनीं व राजा ह्यांनीं करावयाची असे. ह्याचें कारण वीस वर्षांची स्त्री झाल्याशिवाय तिचा बांधा नियमेंकरून पूर्णावस्थेस येत नाहीं. पोटा-खालचा भाग ज्यास ओटी असें म्हणतात, व जो जननसंबंधी सर्व व्यापार घडून येण्याचें स्थान त्याचा आकार वीस वर्षांचें वय झाल्यावांचून पूर्ण होत नाहीं. स्त्री असो अगर पुरुष असो, त्यांस प्रौढावस्था प्राप्त झाल्यावांचून तीं प्रजो-त्पादनास लायक ठरत नाहींत. दाढी येणें, आवाजांत बदल येऊन त्यांत घोग-रेपणा येणें, शरीराच्या बांध्यांत फेरफार होणें व स्वभावांत पोक्तपणा येणें, ही पुरुषाच्या प्रौढावस्थेचीं लक्षणें समजावीं. त्याचप्रमाणें स्त्रियांचा ऊरप्रदेशोन्नति व नितंबविस्तार, शरीरांतील अस्थि व स्नायु ह्यांत जे फेरफार होतात, ते एकदम होत नसून मध्यंतरीं बराच काळ गेला पाहिजे. त्यांस प्रौढावस्था पूर्ण रीतीनें प्राप्त होण्यास बराच काळ लागतो व तो त्यांच्या २० वर्षांच्या आंत घडून येत नाहीं. प्रसिद्ध महान् तत्त्ववेत्ता प्लेटो यांनींही असें सांगितलें आहे कीं, स्त्रियांनीं वीस वर्षांचें वय झाल्यानंतर देशहिताकरितां संतत्युत्पादन करावें. आमच्या इकडील धर्मशास्त्राप्रमाणें पाश्चात्य देशांतसुद्धां विवाहकालाला प्रौढावस्थाच पाहिजे, अशी समजूत पूर्वी होती व हल्लींही आहे, असें प्लेटोच्या म्हणण्यावरून सिद्ध होतें.

कच्चें फळ पाडाला आल्यावांचून जर पिकत घातलें तर तें बिलबिलित होऊन पिकल्यासारखें वाटेल, तरी पण, तें खाल्लें असतां आंबट लागतें, पण तेंच फळ पक्क होऊन पिकल्यावर त्याचा स्वाद, गोडी, त्याच्या अंगीं आलेली रसपोषकता व खाणाराला होणारा आनंद हीं त्यांत मिळणार नाहींत. स्त्री व पुरुष हीं समवयस्क, भर तारुण्यांत आलेलीं व आनंदी अशीं असलीं तर प्रजाही तशीच निपजणार. सध्यां अशी गंमत झाली आहे कीं मुलगी आठ नऊ वर्षांची झाली नाहीं तोंच, तिच्या लग्नाची घाई उडते, कारण न जाणो, ती तशीच राहिली तर कदाचित् नहाण येऊन तिच्या आईबापांची फजिती होईल, व त्यांस रौरव नर्क प्राप्त होऊन तीं अधोगतीस जातील अशाप्रकारच्या समजुतीचा

सुकाळ आधुनिक ग्रंथांत भरपूर पाहण्यास मिळतो. ऋतुप्राप्तिनंतर* विवाह करूं नये अशा अर्थाचीं वचनें जेव्हां पुढें येऊं लागलीं त्यावेळेपासून बालविवाहाला सुरवात झाली असावी. बालविवाहाचें कारण त्यांच्या पुरस्कर्त्यांकडून असें सांगण्यांत येतें कीं, बालपणीं मुलीचा विवाह झाला तर तिला तिच्या सासरच्या माणसांची ओळख पडून सासरची रीत लागून तिची पुढील संसारयात्रा सुखानें कंठण्यास सुलभ जातें. जणूं काय, वयांत आलेल्या मुलींस सासरची रीत न लागतां त्या उच्छृंखल होऊन त्यांस रीतभात लागणार नाहीं. जर बालविवाहच प्रचारांत असता, तर, वधूवरांस विवाहानंतर त्रिरात्र, द्वादशरात्र किंवा वर्षपर्यंत ब्रह्मचर्य राखण्याची आज्ञा आश्वलायनानें केली आहे तिची जरुरीच उरली नसती. ऋतुप्राप्ति हा स्वभावधर्म आहे, मनोविकार प्रबल झाले कीं तेणेंकरून सुद्धां ऋतुप्राप्त होतो; म्हणूनच ऋतुप्राप्ति म्हणजे प्रौढावस्था नव्हे, तर त्यानंतर बराच काल पूर्णावस्थेस पावण्याचा असतो. पुरुष हा जर अल्पवयांत स्त्रीसंभोग करूं लागेल, तर त्याच्या शरीरावर अपायकारक परिणाम होऊन तो जरावस्थेला प्राप्त होईल, त्याचप्रमाणें स्त्रीजातीस अकालीं मातृत्व प्राप्त होणें हें निरनिराळ्या रोगांस व प्रसंगविशेषीं मृत्यूस बोलावणें पाठविण्यासारखें आहे. अल्पवयांत झालेली संतति बहुधा कनिष्ठ प्रकारची होते हें उघड आहे.

मनुष्याच्या विवाहाची कालगणना करतांना वनस्पतींकडेही लक्ष दिलें पाहिजे. आपण आपल्या दारांत आंब्याचें झाड लावलें, आणि त्यास जर पांच वर्षांचे आंत मोहोर आला, तर तो आपण खुडून टाकतों, व हा क्रम सतत तीन वर्षेंपर्यंत चालवितों. पहिल्या भरांत जर आंब्याचें फळ घेतलें, तर, त्याच्या ठिकाणीं प्राप्त होणारी रसपोषकता नष्ट होऊन पुढें फळें बारीक येतात. तीन वर्षें भरून चवथें वर्ष लागलें कीं, फळें घेण्यास आपण आरंभ करतों. वनस्पतींतही कांहीं फळें बियांकरितां म्हणून राखून ठेवलेलीं असतात. फुलांचा प्रथम भर खलास होऊन द्वितीय भराला आरंभ झाला, म्हणजे त्या वनस्पतींचीं फळें बियाकरितां

---

* **रसादेव स्त्रिया रक्तं रजः संज्ञं प्रवर्तते ।**
तद्वर्षा द्वादशादूर्ध्वं यातिपंचाशत् क्षयम् । सुश्रुत.

बारा वर्षांनंतर स्त्रियांना रजोदर्शन होतें, कांहींना बाराव्या वर्षीं, कांहींना १४ व्या वर्षीं कांहींना १५ व्या वर्षीं व कांहींना १६ व्या वर्षीं ह्या प्रमाणें त्यांच्या प्रकृतिमानानें रजोदर्शनास अवधि लागतो.

म्हणून राखून ठेवण्याची चाल आहे. कारण प्रथम भराचीं फळें हीं बीजोत्पत्तीस कुचकामाचीं ठरतात. वनस्पत्या दुसऱ्या भराच्या वेळेस स्वतः रसपूरीत होऊन त्यांचीं फळेंही रसपरिपोष होऊन बीजाच्या उपयोगाचीं होतात. कांहीं वनस्पत्या वर्षायु, द्विवर्षायु व कांहीं बहुवर्षायु अशा असतात. वर्षायु वनस्पत्या एकच पीक देतात. द्विवर्षायु वनस्पत्या पहिल्या वर्षी आपणा स्वतःची शरीरवृद्धि आणि धातुरसादिकांचा सांठा करून दुसऱ्या वर्षी फलादिकांचा उद्गम व विकास झाला कीं मरतात. परंतु बहुवर्षायु वनस्पत्या ह्या आपल्या शरीरवृद्धींत व रसादिकांचा सांठा करण्यांत वेळ घेतात, त्यामुळें त्या दीर्घकाळ टिकून अनेक वर्षेंपर्यंत फळ देण्यास समर्थ होतात. पक्षांत देखील त्यांचीं जीं पहिलीं अंडीं असतात, तीं आकारानें लहान व पोंचट असून प्रजोत्पादनाचे कामीं त्यांचा बहुधा उपयोग नसतो; म्हणून तीं अंडीं निरुपयोगी ठरतात. जी कोंबडी शरीरानें धष्टपुष्ट, भरलेली अशी व जिनें पुष्कळ वेळां अंडीं घातलेलीं असतील, तिचीच अंडीं राखून ठेऊन त्यांजपासून उत्तम प्रजा निर्माण करण्यांत येते. हीच गोष्ट पशुमध्येंही आहे.

जो मनुष्य आपला विवाह लांबणीवर टाकील, त्याला तो सुखाचा जाऊन बहुतकालपर्यंत आपल्या प्रजेच्या शारीरिक दुःखाची कटकट त्याच्यामागें राहणार नाहीं. बीज पक्व असल्यावर फळही निरोगी, तेजस्वी व वीर्यवान् उपजतें. प्राचीनकाळीं ऋतुप्राप्तीनंतर विवाह झाल्यास दोष मानीत नसत. स्वयंवराचा अधिकार ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षांनीं प्राप्त होतो असें मनुस्मृतींत स्पष्टपणें सांगितलें आहे. द्रौपदी, दमयंती, *सीता, कुंती, लोपामुद्रा, तपती देवयानी, शांडिल्यऋषीची

---

* सीतेच्या स्वयंवराविषयीं बराच मतभेद दृष्टीस पडतो. स्वयंवराच्यावेळीं ती अप्राप्त यौवना होती असें भवभूतीच्या म्हणण्यावरून दिसतें. भवभूतीनें आपल्या उत्तररामचरित्रांत पृथ्वीदेवीच्या मुखांत पुढील श्लोक घालून बालविवाह निंद्य मानला आहे.

न प्रमाणीकृतः पाणिर्बाल्ये बालेन पीडितः ।
नाहं न जनको नाग्निर्नानुवृत्तिर्न संततिः ॥

श्रीराम हेही बाल्यदशेंत असावेत. राजा जनकानें धनुर्भंगाचा पण लावून जो धनुर्भंग करील त्यास आपली कन्या द्यावयाची असा निश्चय प्रगट केला होता, त्यावेळचे सीतेचे उद्गार राम बालवयाचा असून त्याच्याकडून हा पण कसा जिंकला जावा असे तिच्या मुखीं घातले आहेत. पण स्वतः सीतेनें अनुसुयेला असें सांगितलें आहे कीं–

पति संयोग सुलभं वयो दृष्ट्वा तु मे पिता । बाल रामायण.

कन्या ध्रुतव्रता, भारद्वाज ऋषीची कन्या श्रुतावती वगैरे पूजनीय व सन्माननीय आर्यस्त्रीयांचीं स्वयंवरें त्यांस ऋतुप्राप्त झाल्यानंतर म्हणजे त्या प्राप्तयौवना झाल्यानंतर झालीं असा पुरावा रामायण व महाभारत ह्या ग्रंथांत सांपडतो. मिश्रमिश्र, गोपीनाथ भट्ट, मेधातिथि, देवण्णाभट्ट, जैमिनी, नीळकंठ प्रभृति ग्रंथकारांनीं कन्या वयांत आल्यावर योग्य व गुणवान् असा पति पाहून त्याला ती द्यावी असा उल्लेख केला आहे. हिरण्यकेशानीं चतुर्थीकर्म लिहिलें आहे, त्यावरून वधू ऋतु प्राप्त झालेली असावी असें बोधित होतें. विवाहाची सांगता करण्याचें सामर्थ्य यावयाचेपूर्वीं वधू विवाह्य मानीत नसत. यजुर्वेदीय कर्मांत तीन रात्रीं ब्रह्मचर्य पाळण्याचें सांगून चवथ्या रात्रीस विवाहाचे सांगतेसाठीं चतुर्थीकर्माचें विधान आहे, त्यावरून असें सिद्ध होतें कीं विवाहप्रसंगीं कन्या वयांतच आलेली असली पाहिजे, एवढेंच नव्हे तर, विवाहप्रसंगीं कन्येस उद्देशून जे मंत्र म्हटले जातात, त्यावरून मुली प्रौढ वयाच्या असल्या पाहिजेत हें उघड आहे.

वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्नि परिक्रिया ॥ मनु.

माझ्या पित्यानें जेव्हां माझें वय पतिसहवासाला योग्य झालें आहे असें पाहिलें, तेव्हांच त्यानें माझ्या स्वयंवराचा विचार केला. ह्यावरून सीतादेवी ही प्रौढवयाची असली पाहिजे, व विवाह प्रसंगीं श्रीरामचंद्राचें वय निदान विसाच्या वर असलें पाहिजे, असें अनुमान कित्येक तज्ञानीं काढिलें आहे. स्त्रियांचे विवाह प्रौढपणीं होत असत, ह्याचें कारण त्या पतिसंगतीला योग्य होण्याची वाट पहात असत, ह्या तर्काला अनुसरून ब्रह्मपुराणांत बरेच आधार आहेत. संस्कारकौस्तुभ ग्रंथांत पुढील वाक्य आहे–

पिता ऋतून् स्वपुत्र्याश्च गणयेदादितः सुधीः ।
दिनावधि गृहे यत्नात्पालयेश्च रजोवतीम् ॥

पित्यानें आपल्या मुलीच्या ऋतुंची गणना करावी, व जेवढे ऋतुपर्यंत आपल्या कन्येला घरीं ठेवण्याचें विधान आहे, तेवढे ऋतु होत तोंपर्यंत ऋतुमति कन्येला यत्नानें पाळावें असें स्पष्टपणें सांगितलें आहे, एवढेंच नव्हे तर—

वधूरियं पतिमिच्छन्त्येति । ऋग्वेद.

ह्या स्त्रीला पतीची इच्छा झाली आहे, अशी तिची भावना दृष्टीस पडेपर्यंत तिचा विवाह करूं नये. विवाहसमयीं कन्या ऋतुमति झाली तर त्यासंबंधी बरीच प्रायश्चित्तेंही सांगितलीं आहेत ह्यावरून कन्या प्राप्त यौवना असली पाहिजे हें उघड आहे.

पुरा कल्पे कुमारीणां मौंजीबंधनमिष्यते ।
अध्यापनं च वेदानां सावित्रीवचनं तथा ॥ यमस्मृति.

स्त्रियांचा विवाहविधि हाच उपनयन संस्कार आहे. पतीची सेवा करणें, गुरुगृहीं वास व सर्व गृहकृत्यें चांगल्या प्रकारानें करणें हीच होमादिरूप अग्नीची सेवा असें वरील स्मृतिकारांचें म्हणणें आहे. विवाहापूर्वी त्यांस त्यांनीं कन्या* असें म्हटलें आहे, व कन्या म्हणजे विवाहविरहित स्त्री असें माधवाचें म्हणणें आहे. कन्याशब्दवाच्य राहते, त्याचप्रमाणें अवस्था ह्या शब्दाचा अर्थ होतो. जसें "न वै कन्या न युवतिः" कन्या शब्दाचा असा अर्थ मेधातिथि व कुल्लुकभट ह्यांनीं दत्तावधि न करतां अक्षतयोनिवरच केलेला आहे. मनुनेंही बारा वर्षांचे मुलीस व ऋतुमति मुलीस विवाहापूर्वी कन्याशब्दानेंच संबोधिलें आहे. यमवचनांत "अतउर्ध्वं रजस्वला" असें म्हटलें आहे, त्याचा अर्थ दहाव्या वर्षापासून कन्येला रजस्वला म्हणावें असा न करतां, दहाव्या वर्षानंतर बऱ्याच काळांनीं रजस्वला ही संज्ञा प्राप्त होते. अशा अर्थाचे अनेक लेख संस्कारमयूख व स्मृतिचंद्रिका ग्रंथांत आहेत. मुलानें अगर मुलीनें आपला विवाह विद्यार्जन व संसारोपयोगी ज्ञान मिळविल्यावांचून करूं नये—

द्वादश वर्षाणि वेद ब्रह्मचर्यं उपनयादूर्ध्वं वेदग्रहणानां वा ।

असा उल्लेख आहे. पुरुषाला विद्या नसली, किंवा स्त्रीला संसारोपयोगी ज्ञान नसलें म्हणजे दोघांचीही फजिती होते. सुनेस सासू बोलबोलून नकोसें करते. पुरुषास विद्या नसली, किंवा व्यवहारज्ञान नसलें म्हणजे लोकांत त्याची दैना होऊन तो व्यवहारशून्य पशु समजला जातो. जाणत्या मनुष्यानें आपला मुलगा विद्याशील, सत्समागम प्रौढ व योग्य असा झाल्यावांचून त्याचा विवाह करूं नये. आपलें व आपल्या कुटुंबाचें योग्य रीतीनें संगोपन करण्याची शक्ति येई तोंपर्यंत मुलानेंही आपल्या विवाहाची संमति आपल्या मातापितरांस देऊं नये. कित्येक लोक स्वतःची पोट भरण्याची पंचाईत असतां कोणी आपली मुलगी न दिल्यास

---

* कौमारं ब्रह्मचर्यं मे कन्येवास्मि न संशयः । महाभा. अनु. पर्व.
मी ज्याअर्थी अविवाहित व ब्रह्मचर्य धारण करणारी आहें, त्याअर्थी मी कन्याच आहे.

ऋतुस्नाता तु या शुद्धा सा कन्येत्यभिधीयते । पराशर माधवीय सिद्धांत.
ऋतुस्नात असूनही जी शुद्ध असेल त्या स्त्रीला कन्या असें म्हणतात.

मुलीच्या बापास पैसा भरून अगर अदलाबदल करून आपलें लग्न करून घेतात. मुलेंबाळें झालीं कीं स्वतःचें, बायकोचें व मुलांचें पोट भरण्याची मारामार पडून दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करीत, किंवा कसेंबसें पोट भरून काळ कंठीत असतात. अशा प्रकारची हीन स्थिति येऊं नये म्हणून अगोदरच जागें होऊन स्वकुटुंब पोसण्याचें सामर्थ्य येईतोंपर्यंत अविवाहित राहणें हेंच श्रेयस्कर होय.

विवाह झालाच पाहिजे, परंतु तो अशा कष्टमय स्थितींत न झालेला बरा. ह्यापेक्षां ब्रह्मचर्यव्रतानें राहून काळ कंठणें हें सौख्यदायक होय. मागें संसाराची कटकट राहणार नाहीं, व आण्याचीही धास्ती नाहीं. ब्रह्मचर्य पाळणें म्हणजे स्वोन्नति करून घेणें होय. शुक, भीष्माचार्य, नारद, परशुराम व हनुमान हा पुरुषवर्ग ब्रह्मचर्यानें राहून जगास वंद्य झाला. लग्न होत नाहीं म्हणून ब्रह्मचर्य पालन करतों, अशा जुलमाचा रामराम नको. तर मनापासून ब्रह्मचर्य पाळून त्याप्रमाणें वर्तन ठेवणें हें भूषणावह आहे. ज्याप्रमाणें पुरुषवर्ग ब्रह्मचर्यव्रतानें राहिला होता, त्याचप्रमाणें स्त्रियांनींही तें पाळलें होतें. वाचक्नवी गार्गी, सुलभा, मैत्रेयी, वडवाप्रातीयेथी ह्या त्याचीं उदाहरणें होत, ह्यांस ब्रह्मवादिनी म्हणत. विवाहाची जशी पूर्वी सक्ति नव्हती, तशी हल्लींही नाहीं. पण ज्यांस संसारसुखाचा अनुभव घेऊन गृहस्थाश्रमी बनावयाचें असेल, त्यांनीं विवाह अवश्य करून घ्यावा. असें जरी आहे तरी तो एकाद्या अज्ञान, अल्पवयी व विवाह म्हणजे काय, ह्याचा समज नसणाऱ्या अशा मुलीबरोबर करूं नये. ह्याचें कारण विवाहप्रसंगीं होणाऱ्या प्रतिज्ञा ह्यांची महति समजण्याइतकें त्यांस ज्ञान नसतें. म्हटलें आहे—

बालेति गीयते नारी यावद्वर्षाणि षोडश ।
ततस्तु तरुणी ज्ञेया द्वात्रिंशद्वत्सरावधि ॥

मुलीचें वय सोळा वर्षें होई तोंपर्यंत तिला बाला, व ३२ वर्षें वयाची होईपर्यंत तिला तरुणी ह्मणावें.

षोडशवार्षिकं यावत् बाल्यं तावत् प्रवर्तते । हारीतसं.

१६ वर्षेंपर्यंत बाल्यावस्था समजावी. हल्लीं सुद्धां १६ वर्षांचे आंतील मुलास under age समजतात.

तदूर्ध्वमधिरूढा स्यात् पंचाशद्वत्सरावधि ।
वृद्धा तत्परतो ज्ञेया सुरतोत्सववर्जिता ॥

५० वर्षांची होईपर्यंत प्रौढा, तदनंतर रतीची इच्छा तृप्त झाली कीं तिला वृद्धा ह्मणावें, असें असतां संवर्त व दक्ष मुनींच्या ह्मणण्याप्रमाणें:—

*विवाहस्त्वष्टवर्षायाः कन्यायाः शस्यते बुधैः । संवर्त.
विवाहयेत् अष्टवर्षा एवं धर्मो न हीयते । दक्ष.

या श्लोकांत सांगितलेला आठ वर्षांच्या मुलींचा विवाह प्रशस्त मानावा, किंवा—

अष्टवर्षा भवेद्गौरी नव वर्षा च रोहिणी ।
दशवर्षा भवेत्कन्या अत ऊर्ध्वं रजस्वला । यमस्मृति.
गौरीं ददन्नाकपृष्ठे वैकुंठे रोहिणीं ददत् ।
कन्या ददद्ब्रह्मलोके रौरवे तु रजस्वलाम् ॥ मरीचि.

ह्या श्लोकांची मातबरी कोठें राहिली. सोळावें वर्ष पुरें होई तोंपर्यंत जर मुलीला बाला ह्या संज्ञेनें संबोधिलें जातें, तर ह्या बालेचा विवाह शास्त्रसंमत होत नाहीं एवढेंच नव्हे, तर कन्यादानाचे ऐवजीं बालादान होतें, व कन्यादानाचें पुण्य पदरीं पडत नाहीं, हें वेगळेंच. अप्रौढदशेंत जर स्त्रीपुरुष समागम होऊन गर्भ राहिला तर तो कोणत्या तऱ्हेचा होतो हें आपण नित्यशः पाहतोंच.

ऊनषोडशवर्षायामप्राप्तः पंचविंशतम् ।
यद्याधत्ते पुमान् गर्भं कुक्षिस्थः स विपद्यते ।
तस्मादत्यन्त बालायां गर्भाधानं न कारयेत् । सुश्रुत.

मुलीचा जर सोळा वर्षांच्या आंत गर्भाधानविधि करण्यांत आला, तर, त्यांच्या संयोगापासून राहणारा गर्भ कुक्षींतच नाश पावतो, नाश न पावला तर जन्मल्यावर जगत नाहीं, व जर यदाकदाचित् जगलाच तर दुर्बल होतो, एवढ्याकरितां स्त्रीपुरुषांनीं अवेळीं संगम करूं नये, कारण त्यांचा संगम त्यांच्या संततीस घातक होतो.

---

* मुलींचा उपनयन ह्या वैदिकविधि बंद पडल्याकारणानें वरील वचनें प्रचारांत आलीं असावीं.

पूर्ण वाढीवांचून आधीं गर्भधारण होत नाहीं, व जर यदाकदाचित् गर्भधारण झालेंच, तर बाळंतपणानंतर त्यांस गर्भाशयाचे रोग जडतात, किंवा गर्भपतनाची संवय लागते. शरीरप्रकृति बिघडते. यदाकदाचित् संतति वाढली तर ती अशक्त, निस्तेज व निरुत्साही अशीच होते. स्त्री व पुरुष ह्यांपैकीं एक जरी अल्पवयी असेल, तर त्यापैकीं अल्पवयी मनुष्याची फारच हानि होते, स्त्री अल्पवयी असेल तर तिचे गर्भाशयादि अवयव, पाठ, जंघा वगैरे अवयव रोगग्रस्त होतात, असें चरकांत सांगितलें आहे.

न्यूने वै रेतः सिक्तं मध्यं स्त्रियं प्राप्य स्थविष्ठं भवति । ऐतरेय ब्राह्मण.

मध्यम वयाच्या तरुण स्त्रीशीं गर्भाधान केल्यापासून जी संतति होते ती सशक्त व दीर्घायुषी होते.

आसां प्रथमे वयसि रेतः सिक्तं न संभवति, मध्ये वयसि
रेतः सिक्तं संभवति । गोपथ ब्राह्मण.

बाल्यावस्थेंत स्त्रियांचे ठिकाणीं गर्भधारणाचें सामर्थ्य नसतें, पण तेंच सामर्थ्य मध्यम वयामध्यें गर्भाधान केल्यानें येऊन उत्तम संतति उत्पन्न होते.

पंचविंशे ततो वर्षे पुमान् नारी तु षोडशे ।
समत्वागतवीर्यौ तौ जानीयात् कुशलो भिषक् । सुश्रुत.

पुरुषाचें वय २५ व कन्येचें वय १६ हीं वर्षें त्यांस त्यांचा परस्पर संगम होण्यास युक्त आहेत, असें कुशल वैद्यानें जाणावें. असें जरी आहे तरी पण, १६ वें वर्ष लागतांच विवाह झालाच पाहिजे असें ठरत नाहीं, व अशी सक्तीही नाहीं, साधारणपणें वरील मर्यादा दिली आहे.

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्य्यृतुमती सती ।
उर्ध्वं तु कालादेतस्माद्विंदेत सदृशं पतिम् —मनु.
त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कन्या ऋतुमती सती ।
चतुर्थे त्वथ संप्राप्ते स्वयं भर्तारमर्जयेत् ॥
प्रजा न हीयते तस्या रतिश्च भरतर्षभ ।
अतोऽन्यथा वर्तमाना भवेद्वाच्या प्रजापतेः ॥

महाभारत अनुशा. पर्व.

कन्या ऋतुमती झाल्यावर तिनें तीन वर्षे ह्मणजे ३६ महिनेपर्यंत ब्रह्मचर्य पालन करून आपल्यापेक्षां " बुद्धिमते कन्या प्रयच्छेत " ह्या तत्वाला अनुसरून बुद्धिमान पुरुषाबरोबर विवाह करावा. अशा प्रकारें व्रतस्थ राहणाऱ्या स्त्रिला होणारी प्रजा अकाळीं मरत नाहीं व तिचा ऋतुही व्यर्थ जात नाहीं ह्या नियमाविरुद्ध वागणाऱ्या स्त्रिया अनेक दोषांनीं युक्त होऊन दुःखी होतात. ऋतु प्राप्त झाला कीं कन्या स्त्रीत्वाला प्राप्त होते, अशी अज्ञ समजूत बाळगणारांनीं वरील वचनाकडे लक्ष द्यावें. अष्टवर्षा भवेद्गौरी ह्या श्लोकानें बऱ्याच अज्ञ लोकांस भुरळ घातलेली दिसते. व ह्या श्लोकाचा जन्म झाल्या दिवसापासूनच बालविवाहाला सुरवात झाली असावी, असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे.

पूर्णषोडशवर्षा स्त्री पूर्णविंशेन संगता ।
शुद्धे गर्भाशये मार्गे रक्ते शुक्रेऽनिले हृदिः ॥
वीर्यवन्तं सुतं सूते ततो न्यूनाब्दयोः पुनः ।
रोग्यल्पायुरधन्यो वा गर्भो भवति नैव वा ॥ वाग्भट.

वाग्भटानेंसुद्धां १६ वर्षांच्या आंतील स्त्रीचें गर्भादान होणें हें तिला तसेंच तिच्या संततीला अपायकारक आहे, त्याचप्रमाणें २० वर्षांच्या आंतील पुरुषानें स्त्री समागमास प्रवृत्त होणें हेंही हानिकारक आहे असें प्रतिपादन केलें आहे. विवाहसमयीं वधू यौवनसंपन्न असते, असें गृहीत धरूनच स्मृतिकार चालले आहेत. ऋतुकालापूर्वींच स्त्रियांचा विवाह व्हावा असें जर भगवान याज्ञवल्क्यांचें मत असतें, तर तें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें असतें. ते उलट असें ह्मणतात कीं, पुरुषानें आठव्यावर्षीं उपनयन झाल्यादिवसापासून निदान बारा वर्षेंपर्यंत ब्रह्मचर्यानें राहून मग विवाह करावा. मात्र वधू ही वरापेक्षां कमी वयाची असली पाहिजे. पण तिच्या वयाची मर्यादा दिलेली नाहीं. विवाहांत चतुर्थीकर्मविधि ह्मणून जो सांगितला आहे, तो तर झालाच पाहिजे. वर व वधू यौवनसंपन्न नसतील तर तो होणें अशक्य आहे. ह्यावरून प्रौढविवाह हाच शास्त्रकारांस संमत होता हें उघड आहे. " असानार्षां अस्पृष्टमैथुनां यवीयसीं सदृशीं भार्यां विंदेत '' असें वसिष्ठस्मृतींत व " अनन्यपूर्वां यवीयसीं " असें गौतमस्मृतींत ह्मटलें आहे.

जोंपर्यंत वैदिक पद्धतीनें विवाह होत असत, वधूवरांस आपल्या विवाहाची पूर्णपणें जबाबदारी ओळखावयास मिळे, तोंपर्यंत वधू व वर हे शब्द प्रचारांत असत. पण ज्या वेळेपासून वैदिक विवाह पद्धति सुटली, वधूवरांस विवाह म्हणजे काय हें कळण्याचें साधन राहिलें नाहीं, म्हणजे तें समजावून देणारे अज्ञानानें, आळसानें अगर ज्यांचा विवाह होतो, तीं विवाह म्हणजे काय हें जाणण्याचे कामीं बेफिकीर असल्याकारणानें त्यांस त्यांचें रहस्य कोणीही समजावून दिलें नाहीं, किंवा देत नाहीं, त्यावेळेपासून वर व वधू ह्यांच्याजागीं नवरा व नवरी हे शब्द प्रचारांत आले असावे. जिचा विवाह होतो, तिला जर विचारलें कीं हा सोहळा कसला चालला आहे, तर ती लागलेंच उत्तर देईल कीं, हा सोहळा चालला आहे खरा, पण त्यांतील मर्म मला समजलें नाहीं, फक्त एकमेकींचें पाहून विवाहानंतर आम्हीं सासरीं जातों, त्यावरून मी म्हणत्यें कीं हा सासरीं जाण्याचा विधि असावा.

मनूची आज्ञा प्रौढविवाह प्रचारांत होता, त्या वेळची आहे. अलिकडे प्रौढविवाह तर एकीकडेच राहिले, पण बरेच वेळां मुली *पाळण्यांत असतांनाच त्यांचा विवाह उरकून घेण्यांत येतो. सुदैवानें ह्या दांपत्यानें वृद्धावस्थेपर्यंत सुखोपभोग घेतला, तर फारच उत्तम गोष्ट होय. पण यदाकदाचित् कालचक्र फिरून आकाशाची कुऱ्हाड जर का त्या अनाथ अबलेवर पडली, तर त्या बिचारीच्या दैन्यावस्थेस पारावार नसतो. सासूसासरा बोलबोलून तिच्या दुःखावर डागण्या देतात. तिचा अपशकून वारंवार होतो. असे कितीतरी प्रकार होतात. तिचें जरा कोठें वांकडें पाऊल पडलें तर, ती दुनियेंतून उठलीच ह्मणून समजावी. तिच्याकडून वांकडें पाऊल पडूं नये म्हणून म्हणा, किंवा भूतदयेचें अवलंबन करून म्हणा, भूतदयेनें प्रेरित झालेले कित्येक लोक अशा गांजलेल्या स्त्रीचा पुनर्विवाह व्हावा असें प्रतिपादन करितात, व त्याबद्दल शास्त्रकारांची संमति त्यांजकडून पुढें मांडण्यांत येते. असो. पुनर्विवाह हा प्रस्तुतचा विषय नसल्यामुळें त्यासंबंधीं जास्त उहापोह येथें न करणें हेंच बरें.

---

* पाळण्यांत असतांनाच लग्न लावणें अगर वरापेक्षां वधू जास्त वयाची असणें, हा प्रकार थोड्याशा प्रकारांनीं कित्येक गुर्जर लोकांत आणि उत्तर हिंदुस्थानांत आढळतो. तरीपण हल्लीं त्यांच्यांत सुधारणा होत चालली आहे, ही आनंदाची गोष्ट होय.

विवाहापूर्वी कन्येचे तीन पालक.

सोमः प्रथमोविविदे गंधर्वोविविद उत्तरः ।
तृतीयोऽग्निष्टे पतिस्तुरीयस्ते मनुष्यजः ॥ ऋ. मं. १०.
पूर्वं स्त्रियः सुरैर्भुक्ता सोमगंधर्ववह्निभिः ।
भुंजते मानवः पश्चान्न ता दुष्यंति कर्हिचित् ॥ अत्रिसंहिता.

हे कन्ये, प्रथम ओषधिनाथ जो सोम (चंद्र) त्यानें तुझा सांभाळ केला, त्यानंतर गंधर्वांनीं, त्यानंतर अग्निनें तुझें रक्षण करून मोठी झाल्यावर तुला मनुष्याच्या स्वाधीन केली. ओषधिनाथ सोमानें गंधर्वाला दिली. गंधर्वानें अग्निला दिली, अग्निनें धन त्याचप्रमाणें संतति उत्पन्न व्हावी म्हणून मनुष्याला दिली. लहान असतां चंद्राच्या योगें उत्पन्न होणाऱ्या वनस्पति त्यांचा रस काढून तो तुला पाजून तुझें रक्षण केलें, जरा मोठी झाल्यावर तुला कविता व गाणीं शिकवून तीं तुझ्याकडून म्हणविलीं हें काम *गंधर्वानें केलें. आठवें वर्ष लागतांच गुरुगृहीं मुलाला व मुलीला पाठविण्याची जी जुनी रीत त्या रीतीप्रमाणें मुलगा वेदाभ्यास व कन्या वेदाभ्यास व गृहकृत्यें ह्यांचाही अभ्यास करी. मुखाच्या ठिकाणीं अग्नि आहे, त्याच अग्निच्या योगें शब्द निघतो. विवाहापूर्वी कन्येचे अगोदरच तीन पति (पालन करणारे) असतात. भगवान याज्ञवल्क्य म्हणतात, ओषधिनाथ जो चंद्र त्यानें कायिक शक्ति अर्पण केली. गंधर्वानें मंगल वाणी दिली आणि तेजोरूप अग्नीनें सर्व प्रकारची मानसिक पवित्रता दिली. ओषधीच्यायोगें स्वत:चें व आपल्या मुलाबाळांचें रक्षण करण्याचें सामर्थ्य आलें. संगीताच्या अनुष्ठानानें तिची वाणी कोमल झाली (म्हणूनच स्त्रियांचें गाणें सर्वांस फार प्रिय असतें) आणि अग्निच्या अनुष्ठानानें विधिपूर्वक सात्विक अन्न शिजवून तें सर्वांस वाटून इतरांस व स्वत:स पावन करण्याची शक्ति आली. " सा नः पूषा शिवतमा मे रयसा नऽ ऊरु उशती विहर " पूषा देवता तुला सद्गुण व शीलसंपन्न करून माझ्याकडे पाठवितो आहे, म्हणून रतिसुख त्याचप्रमाणें पुत्रसुख प्राप्त करण्याकरितां मजबरोबर विवाह कर. तुझ्या योगानें मुक्तिपर्यंत माझ्या सर्व कामना पूर्ण होवोत. किंवा

---

* गां वाणीं धारयति प्रेरयति पोषयति वा स गंधर्वः.

व्यंजनैस्तु समुत्पन्नैः सोमो भुंजीत कन्यकाम् ।
पयोधरैस्तु गंधर्वो रजसाग्निः प्रकीर्तितः ॥ गोमिलाचार्य.

ओषधिनाथ चंद्र हा मुलीला वाढवितो, तिच्यांत तेज उत्पन्न करतो. गंधर्व हा कुचादि अवयव पूर्ण करून कामवासना हळुहळू जागृत करतो व अग्नि हा अंगांत उष्णता तयार करून ऋतुस्नात करतो, व ऋतुस्नात झाली कीं, मनुष्य हा कन्येचा पति होतो. स्त्रियांचा रजोदर्शनकाळ आमच्या देशांत समशितोष्ण हवेमुळें १२ पासून १४ वर्षें किंवा अमळ त्यापेक्षांही पुढें जातो. रजोदर्शन झालें कीं कन्या विवाहाला योग्य झाली असें समजावें. अशी कित्येकांची वेडगळ समजूत आहे. वेडगळ म्हणण्याचें कारण जरी रजोदर्शन झालें, तरी स्त्रियांच्या शरीराची वाढ, धातु आणि इंद्रियें ह्यांचें दृढीकरण पुष्कळ अंशानें व्हावयाचें असतें. वाढ होण्यापूर्वीच जर गर्भधारण झालें, तर शरीरांतील जो पोषक रस त्यांच्या स्वतःच्या शरीरावयांच्या पोषणास आणि दृढीकरणास अवंश्य असतो, तो त्याच्या वाढीकडे न जातां गर्भाच्या वाढीकडे लागतो. त्यामुळें आया दुर्बळ होतात. त्यांची वाढ खुंटते आणि एक दोन प्रसवानंतर क्षयाची भावना होऊन बिचाऱ्यांस इहलोक सोडावा लागतो. अशी विपन्नावस्थेची पाळी येऊं नये ह्मणून विवाहकाल जरी आपोआप वाढत चालला आहे तरी लोकांनीं विचार करून व अनर्थांकडे लक्ष देऊन कन्या व पुत्र ह्यांचा विवाह जेवढा लांबवेल तेवढा लांबवावा. कन्येस लिहितां वाचतां येऊन गृहशिक्षण त्याचप्रमाणें मुलांस संसारोपयोगी शिक्षण हीं वेदाभ्यासाचे ऐवजीं हल्लींच्या काळीं तरी अत्यंत आवश्यक आहेत. ह्याप्रमाणें विवाहकालाविषयींचीं साधक बाधक प्रमाणें वाचकांच्या पुढें मांडलीं आहेत. त्याचा विचार करून जें योग्य तेंच आचरणांत आणावें.

जरठकुमारी विवाह.

येथपर्यंत वर व वधू ह्यांच्या विवाहाचा विचार झाला. वधूचें वय जसें वीस वर्षेंपर्यंत शास्त्रकारांनीं व शारीरशास्त्रवेत्त्यांनीं ठरविलें आहे; तसेंच पुरुषाचें वय २५ साचे वर असावें हें नक्की झालें आहे. आतां असा प्रश्न उद्भवतो कीं ज्याची विवाहीत स्त्री मृत पावली असेल, तर त्याच्या द्वितीय संबंधाचे वेळेस त्याच्या होणाऱ्या स्त्रीचें वय किती असावें ? तीस पासून पस्तीस

वर्षांचे वयांचे आंत जर भार्या मृत पावली, तर कदाचित् पुनः विवाह करावा, पण ४० च्याही वर मजल जाऊन पन्नाशी अगर साठीला मिळालेला पुनः लग्नाची हुरूप धरून सरसावलेला पुरुषवर्ग अजून दृष्टीस पडतो. द्वितीय संबंधाचे वेळेस तो आपणांस नात शोभेल अशा एकाद्या बालिकेबरोबरच लग्न लावतो; ह्याचें कारण कांहीं ब्राह्मणांत व पांढरपेशांत पुनर्विवाह प्रशस्त मानीत नाहींत. पुरुषांस आपल्या मर्जीनुरुप वाटेल तितकीं लग्नें लावण्याची मुभा आहे; म्हणून तो एकाद्या विधवेबरोबर आपला संबंध न जुळवितां फार तर १४ वर्षांच्या मुलीबरोबर जुळवितो. जो आपणांस आजोबा शोभेल, अशा म्हाताऱ्याबरोबर पतीच्या नात्यानें वागण्याचा प्रसंग येतांच तिच्या मनाला विषाद हा वाटतोच, पण करते काय ? दैवाला बोल लावून बिचारी गुपचूप राहते. गुजराथींत म्हण आहे " दिकरी ने गाय दोरे त्यां जाय " कन्या ही एकाद्या गायीसारखी असून तिचा बाप तिला जेथें देईल तेथें तिला गेलेंच पाहिजे; मग तो तिला विको, म्हाताऱ्यास देवो अगर सरणांत गेलेल्यास देवो, ती बिचारी सर्वस्वीं आपल्या मातापितरांच्या स्वाधीन असते. बरें, मातापितरांच्या इच्छेविरुद्ध वागेन म्हणेल तर, भीड, मर्यादा व लज्जा ह्यांचें उल्लंघन करणें तिला जड जात असल्याकारणानें कशीबशी आपल्या वडिलांच्या म्हणण्यास रुकार देते. देते कसची, तिला रुकार द्यावाच लागतो. विधुरानें विधवेबरोबर लग्न करावें, तर त्याला धर्म आडवा येतो म्हणून कारण सांगण्यांत येतें. धर्मशास्त्र सांगतें कीं अक्षतयोनि कन्येचा विवाह होतो, पण यदाकदाचित् गतभर्तृका क्षतयोनि स्त्री विवाह करूं इच्छिल, तर तिचा विवाह वैदिक मंत्रानीं होऊं शकत नाहीं, एवढेंच नव्हे तर धर्मयुक्तही होऊं शकणार नाहीं. कारण धर्मक्रियेचा लोप करणारी ती असते.

ता क्षतयोनयो वैवाहिकमंत्रैः संक्रियमाणा अपि यस्मादपगत-धर्मविवाहादिशालिन्यो भवन्ति नाऽसौ धर्म्यो विवाहः ।

असें कुल्लुकभटाचें म्हणणें आहे. मनूचेंही हेंच मत आहे. देवल मात्र असे विवाह वेदमंत्रानें करावे असें म्हणतात. वैदिक विवाह हे चैनीचे किंवा स्त्रीपुरुष कामुक बनविणारे मुळींच नव्हत, तर ऋतुकाळीं भार्यागमन करा "ऋतौ भार्यामुपेयात्" किंवा "यथाकालं यथाक्रमः" असें सांगून अमोघवीर्य व सुपुत्र

उत्पन्न करा म्हणून उपदेश करणारे होत. विधवा स्त्रीनें त्याचप्रमाणें *विधुर पुरुषानें आमरण ब्रह्मचर्य धारण करून राहणें हें दोघांसही फार हिताचें आहे; व ते जितेंद्रिय राहून आपला काळ धर्माजनांत घालवितील तर तीं उभयतां खरोखर धन्य होत. विधुरांस जशी पुनर्विवाहाची मोकळीक आहे, तशी स्त्रियांसही असणें फार जरूर आहे. पण स्त्रियांकडून तो हक्क काढून घेऊन स्वतःच्या सुखाकरितां पुरुषानें हव्या तेवढ्या लहान मुलीशीं लग्न करून वृद्धापकाळीं कोणीतरी आपल्या उपयोगीं पडावें, ह्या खोट्या सबबीवर एकाद्या अबलेस लौकरच वैधव्यपंकांत ढकलावें हें अनिष्ट तर खरेंच, पण त्यांतच शेखी मिरविणारे नराधम ह्या जगतीतलावर पाहण्यांत येतात. विधवा स्त्री अगर विधुर पुरुष ह्यांचा जो पुनर्लग्नसंबंध होतो, त्याला पुनर्विवाह म्हणतात. कुमार व कुमारिका ह्यांचा विवाह होतो हा न्याय्य आहे, ह्या दोघांच्या विवाहास पुनर्विवाह म्हणत नाहींत. ज्याप्रमाणें एकाद्या विधवेशीं पुरुष लग्न करूं इच्छित नाहीं, त्याचप्रमाणें विधुराशीं लग्न करावें असें कुमारिकेसही वाटत नाहीं. अविवाहित स्त्रीपुरुषांच्या समागमाला व्यभिचार म्हणतात; परंतु जी स्त्रीपुरुषें विवाह संस्कारानें बंधन पावलेलीं असतात, त्यांच्या समागमाला व्यभिचार हा शब्द न लावतां यथाशास्त्र धर्मविधीप्रमाणें झालेला समागम आहे, असें म्हणून त्या उभयतांस समागम करण्यास लज्जा वाटत नाहीं, तर तो राजरोस होतो. आतां असें जरी आहे तरी दोघांच्याही वयाची इयत्ता साजेलशी असली पाहिजे. अशी एक साधारण लोकांत बोलवा आहे कीं, तरुण वर दुधासारखा, ३५ शी उलटलेला ताकासारखा व ५० च्या घरांत गेलेला चिंचेच्या सारासारखा होय. दुध व ताक साधारणपणें सर्वांस हवीं आहेत, पण चिंचेच्या साराची अपेक्षा कोणीही करीत नाहीं. दूध पिण्यास गोड, पुष्टिदायक व वीर्यवर्धक असें असतें, त्यामुळें त्याची जरुरी सर्वांस असतेच. ताक हें दुधाच्या अभावीं थोडेंबहुत काम करतेंच, कारण अस्सल जरी नसलें तरी त्याचा जन्म दुधापासून झालेला असतो. पण साराचें नांव घेतलें कीं मस्तकांत तिडीक जाते. तें जसें ‘ मुखीं फणफणी, तोंडा बहु जाचणी व नाकांतील मणी पाडणारें ’ असतें.

---

* ईर्ष्यया रक्षतो नारीर्धिकुलस्थितिदाम्भिकान् ।
स्मरान्धात्वा विशेषेऽपि तथा नरमरक्षतः ॥ नैषध्यकाव्य.

त्याचप्रमाणें जरठकुमारी विवाह होत. बायकोची इच्छा एक तर ह्याची दुसरी. तिला आपल्या तारुण्याच्या भरांत जे विलास करावेसे वाटतात, त्यांचा ह्यास ते भोगिलेले असल्याकारणानें वीट येतो; शिवाय तो सदा निरुत्साही; तोंडाची व्यर्थ बडबड करणारा व वार्धक्यामुळें नाक गळणारा असा असतो. बायका एकत्र जमल्या व अशा ह्यातान्याच्या बायकोची त्यांस थट्टा करावीशी वाटली कीं "साळीचा भात पंक्तिला । ह्यातारा नवरा गमतीला" असें ह्मणून त्या तिला चिडवितात. अशा स्थितींत त्या बिचारीला दूध व ताकाऐवजीं सारच गोड मानून घ्यावें लागतें. अशा नेहमीं ३६ आंकडा असलेल्या जोडप्यापासून यदाकदाचित् प्रजा निर्माण झाली, तर ती कितपत सदृढ असणार हें दिसतेंच आहे. वराचें वीर्य पक्व झालेलें असलें तर वधू अपक्व दशेंत असल्याकारणानें प्रजा सदृढ निपजणें बहुतांशी कठीणच आहे. शेतकऱ्यानें उत्तम बीज पैदा केलें, तें पक्व असलें आणि जमीन जर कसहीन, घाणेरडी व बीज उगविण्याच्या कामीं नालायक असली, तर तिच्यापासून फळाची आशा करणें व्यर्थ होय. बीज उत्तम पाहिजे, जमीन कसदार व माळीही नियमित प्रमाणानें जमिनीचा मगदूर पाहून बीजाची योजना करणारा असला पाहिजे. तरच त्या बीजापासून उत्पन्न होणारा रोपा फोंफावत वर येऊन त्यावर फळें स्वादिष्ट, उत्तम व टिकाऊ अशीं लागतात. तंबाकुची अशी मजा सांगतात कीं, तंबाकुच्या शेतांत तंबाकुचीं झाडें लावतात त्या झाडांतील कांहीं रोपे बियाणें म्हणून राखून ठेवण्यांत येतात. ज्या झाडापासून लज्जतदार तंबाकु पाहिजे असेल, त्यावर आलेलीं पुष्पें व फळें ह्यांचा नाश करून फळांत जाऊन नाश पावणाऱ्या रसाचा परिपोष ते तंबाकुच्या पानांत करतात. त्याचप्रमाणें पुरुषांच्या अंगांतील धातुचा क्षय झाल्यावर त्याच्यापासून प्रजोत्पादनाची आशा नसते. आमच्या देशांतील बालविवाहाची चाल जरी कालमानानें मोडत चालली आहे, तरी, ती अजून बऱ्याच प्रमाणांत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदु खेरीज करून इतर जातींत वधूवरें वयांत येऊन त्या उभयतांची इच्छा विवाहपाशानें बद्ध व्हावी, द्रव्यसहाय्य भरपूर, अशी खात्री झाल्यावर मग ते लग्न संबंधानें निगडीत होतात. पूर्ण वय, दोघांचेंही भर तारुण्य, दोघांच्याही ठिकाणीं पूर्ण उत्साह अशी स्थिति असतांना प्रजा सुदृढ, निश्चयी, करारी व "कपाटवक्षाः परिणद्धकंधरः" अशी निपजल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें ! ! प्रजा शक्तिप्रधान असावी अशी इच्छा

असल्यास लग्नाची मर्यादा वाढविली पाहिजे, सांपत्तिक स्थिति उत्तम पाहिजे, दोघेही आनंदी, निष्काळजी, दुष्ट वासनांपासून दूर व आत्मशुद्धीचे असावेत. अशा जोडप्यापासून होणारी प्रजा वीर्यवान, शरीरानें, मनानें, विद्येनें, बुद्धीनें योग्यतेनें वगैरे अनेक गुणांनीं थोर अशीच निपजेल. त्यांस स्त्रैणता कधींही शिवणार नाहीं. ते वीर, लोकांचे पुढारी, नेते व सन्मार्गदर्शक असेच निपजतील. सत्याची आवड व उत्तम शिक्षण ह्यांच्या योगानें मन सुसंस्कृत होतें. चांगले गुण पुरुषांत हवे आहेत. स्त्रियांस त्यांची जरुरी नाहीं असें नाहीं, त्यांसही चांगल्या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे. सत्यप्रिय मनुष्य, स्पष्टवक्ता, निस्पृही व उदार असा असतो. मातापितरें सदाचरणी सत्यभाषणी व धर्मानुकूल वर्तन करणारीं असलीं, तर त्यांच्या मुलांसही तोच कित्ता लागतो, म्हणून थट्टेंत देखील मुलांदेखत, नव्हे, तर एरव्हींसुद्धां असत्य भाषणाचा व अधर्माचा विटाळ आपणांस होऊं देऊं नये. लहानपणीं मुलांस उत्तम शिक्षणाबरोबर सुसंगतीचीही अत्यंत जरूरी आहे. आईबाप सच्छील तर त्यांची प्रजाही हज़ार हिशानें तशी निपजणार. म्हण आहे–गवयाचें पोर रडलें तरी तें सुरावर रडणार—ह्याचें कारण काय तर त्यास रोजचा सहवास. "ज्या जैशी संगति त्यासी तैशी गति । होय काळी माती कस्तुरीका" सारांश संगत उत्तम पाहिजे. विजोड जोडपें, कशास कांहीं ठिकाण नाहीं, अशा जोडप्यांच्या ठिकाणीं आनंद असला काय आणि नसला काय सारखाच. कामवासना पुरविण्याकरितां विवाह करणें म्हणजे देशांत भिकार वाढविणें होय. भिकार पुष्कळ आहे, हल्लीं त्याची जरुरी नाहीं. सत्समागमाचा मार्ग दाखविणारी प्रजा पाहिजे व अशी प्रजा प्रौढ-विवाहानेंच निर्माण होईल. "कुविवाहैः कुसंतानः" अयोग्य विवाहानें कुसंतान उत्पन्न होतें.

विवाहपूर्ति.

धर्मशास्त्राप्रमाणें देवप्रतिष्ठेपासून सप्तपदीपर्यंत होणाऱ्या कर्माला विवाहविधि ही संज्ञा दिली गेली, परंतु ह्याचा विचार करण्यापूर्वीं लौकिक त्याचप्रमाणें शास्त्रीय व्यवहाराकडेही ध्यान दिलें तर एवढें सिद्ध होतें कीं, सर्व कर्में तीन प्रकारचीं आहेत. पहिलें मानसिक, दुसरें वाचिक व तिसरें कायिक.

ह्या तिन्ही कर्मांत अनेक कर्मे केवळ मानासिक असतात. " जसें स्मरणादिक " त्याचप्रमाणें कित्येक कर्मे मनानें व वाणीनें केलीं जातात. मनानें विचार केला कीं, मी ह्यावेळीं अमुक गोष्ट अमुक प्रकारानें करीन व विचार करून तो ती करूं लागतो; कित्येक कर्मे मन, वाणी व शरीर ह्या तिहींच्या योगें आपण करतों. प्रथम विचार झाला कीं, अमक्या ठिकाणीं अमुक वेळीं जावयाचें. मनांत आल्याबरोबर वाणींतून बाहेर पडलें, विचार व वाणी हीं संगनमत होऊन शरीराला गति दिली, पण ह्या तिन्हीं कर्मांत मानस कर्म हें श्रेष्ठ ठरतें; कारण त्यावांचून वाचिक व कायिक कर्मे व्हावयाचींच नाहींत. एकादें काम करावयाचें मनांत आलें ह्मणजे तें आपण करतों. पण तें करूं लागण्याचे अगोदर मनाची प्रवृत्ति प्रथम झाली पाहिजे. कारण मनांत आल्यावांचून वाणींत यावयाचें नाहीं, व वाणींत आल्यावांचून कृतींत उतरत नाहीं. विवाहकर्म हेंही ह्या तीन प्रकारांत येतें. पहिल्यानें माता पितरांच्या मनांत आलें पाहिजे. त्यांच्या मनांत आलें ह्मणजे आपल्या कन्येस उत्तम पति मिळावा ह्मणून ते त्याच्या शोधाला लागतात. वर शोधून झाल्यावर मंडप वगैरे घालून विवाहाची तयारी होते. येथपर्यंत मानसिक व कायिक कर्म झालें. विवाहानंतर वधूवरांचा जो संबंध जडतो तो कायिक कर्म होय. यद्यपि वर सांगितल्याप्रमाणें सर्वांचें मूळ मानस कर्म श्रेष्ठ आहे, तथापि कांहीं कर्मे मानसिक, कांहीं वाचिक व कांहीं शारीरिक अशीं असतात. परंतु त्यांच्यांत मानसिक कर्म मुख्य असल्याकारणानें मानसिक विवाह श्रेष्ठ ठरतो. तरीपण, फलाकडे दृष्टी दिली तर विवाह हें शारीरिक विवाहाचें कारण आहे. जर शारीरिक विवाह न झाला तर " रतिपुत्र फलानारीं " इत्यादि वचनें सार्थ होणार नाहींत, म्हणूनच तिन्हीं प्रकारच्या पूर्तींत विवाहपूर्ति होऊन जाते. यद्यपि मानसिक कर्म वाचिक व कायिक कर्मांचें मूळ आहे, तथापि मानसिक विवाह लटपटूं लागतो, कारण प्रसिद्धपणें कोणी कोणाचें मन जाणूं शकत नाहीं. मनाचें स्वाभाविक कर्म संकल्पविकल्प करण्याचें आहे. तथापि विशेष कारणाचे आणि मिथ्या संकल्पाचे सज्जनांचे मानसिक विचार त्यांसही एकाएकीं बाजूला ठेवतां येत नाहीं. वाचिक कर्म प्रसिद्धीस येतें व सज्जनांचें हेंच काम आहे कीं, होतां होईल तों गेलेला शब्द परत न घेणें. " सप्तद्वारावकीर्णां च न वाचमनृतां वदेत् " डोळे, नाक, कान ह्यांची दोन दोन छिद्रें आणि मुखाचें एक मिळून सप्तदारांत संचार करणारी वाणी आत्म्याच्या

इच्छेनें अंतःकरणद्वारा प्रसिद्ध होते, एवढ्याकरतांच *वाणी एकदां निघाली कीं ती परत घेऊं नये. "दत्वा न पश्चात् कुरुतेऽनुतापम्" असें महाभारतांत वाक्य आहे, व श्रेष्ठाचा धर्म हा आहे कीं, कोणताही पदार्थ दिल्यावर अथवा हो उच्चारल्यावर परत घेत नाहींत म्हणजे दिलेलें वचन मोडीत नाहींत. दिलेलें वचन मोडणें हें दशविध पापांत व सत्याचरण हे दशविध पुण्यांत गणलें गेलें आहे. लौकिक व्यवहार फक्त एका वाणीवर चालला आहे, तसा मनावर अगर शरीराचे आश्रयावर चाललेला नाहीं, एवढ्याकरितांच वाणीचे व्यवहार खोटे पाडूं नयेत. ह्याच अभिप्रायानें धर्मशास्त्रकारांनीं सप्तपदीपर्यंत जी वाचिक क्रिया होते, तिलाच विवाह ही संज्ञा दिली आहे; कारण सप्तपदीपर्यंत मानसिक व वाचिक ह्या दोन प्रकारचे विवाह होऊन गेलेले असतात. फक्त शारीरिक विवाह शिल्लक राहतो. जरी विवाहाचा उद्देश स्त्रीपुरुषसंयोग हा आहे, तथापि तो संयोग प्रथम मन आणि वाणी ह्यांच्या योगानें होतो. शारीरिक संयोग मागून होतो. कारण मानसिक व वाचिक संयोग झाल्यावाचून कायिक होणें असंभवनीय होय. मन वाणीचा संयोगरूप विवाह शारीर संयोगाचे उपयोगाचा होतो. लौकिक व शास्त्रीय नियम असा आहे कीं, जी कारणभूत क्रिया सिद्ध होणाऱ्या फलरूप क्रियेकरितां केली जाते; त्या पहिल्या क्रियेला फलरूपभाविनी क्रिया असें म्हणतात. उदाहरणार्थ—एकानें दुसऱ्यास भाकरीचें पीठ मळण्यास सांगितलें, कीं तो तें मळून त्याची भाकरी बनवितो. वास्तविक पीठ मळण्याची क्रिया भाकर करण्याची नाहीं. परंतु भाकरी करण्याकरतांच तो तें पीठ मळूं लागतो, व ह्या पीठ मळण्याचे क्रियेस भाकरी भाजणें असें म्हणतात. त्याचप्रमाणें सप्तपदीपर्यंतची क्रिया शारीरिक विवाहाकरतां केली जाते, एवढ्याकरतां त्यास विवाह म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. विवाहकर्मांत वाचिक क्रिया इतक्या प्रमाणानें मुख्य मानिली गेली आहे कीं, एकाद्याचा विवाह एकादीच्याबरोबर होण्याचें

---

* दन्तिदन्तसमानं हि निःसृतं महतां वचः ।
कूर्मग्रीवेव नीचानां पुनरायाति यातिच ॥

हत्तीचा दांत एकदां का बाहेर आला कीं तो पुनः आंत जात नाहीं, तसें मोठ्याचें वचन एकदां का बाहेर पडलें कीं तें पुनः फिरत नाहीं, पण नीचांचें वचन कांसवांच्या मानेसारखें वाटेल तेव्हां आंत जातें व वाटेल तेव्हां बाहेर येतें, त्याप्रमाणें नीचांच्या बोलण्यावर कधींच विश्वास नसतो.

वाणीनें नक्की ठरलें, तर तो विशेष कारण घडल्यावांचून मोडूं शकत नाहीं. धर्मशास्त्रकारांनीं हा सिद्धांत ठरविला आहे कीं, विशेष बाधक कारण नसेल तर वाणीनें केलेली प्रतिज्ञा कधींही न मोडली पाहिजे; ह्यावरून साधारणपणें इतकें ठरतें कीं विवाह प्रसंगीं वाचिक कर्म मुख्य होय.

वरशोधन.

वयोमर्यादा जरी शास्त्रकारांनीं वाढविली आहे, तरी वरशोधनाचें काम कन्येच्या मातापितरांस अगर त्यांच्या अभावीं तिच्या सग्यासोयऱ्यांसच करावें लागतें. प्राचीनकाळीं कन्या व वर ह्यांनीं ज्याच्याबरोबर किंवा जिच्याबरोबर विवाह करावयाचा असेल, त्या दोघांचीही माहिती करून घेऊन परस्परांनीं परस्परांस पसंत करून मग आपापलीं छायाचित्रें अगर जीवनवृत्तांत पाठवून विवाहाचें नक्की करावें अशी वहिवाट असे. एकाच गुरुकुलांत असल्यास त्यांचा समावर्तनसंस्कार एकाचवेळीं व्हावा. यदाकदाचित् विवाहापूर्वीं जर त्या उभयतांस कांहीं कुशलप्रश्न विचारावयाचे असतील तर ते अध्यापक व इतर भद्र पुरुष ह्यांच्या समक्ष विचारावे. दोघांचा विवाह व्हावा हें नक्की ठरलें कीं ब्रह्मचर्याश्रमांत असतांना विद्याप्राप्तिरूपी तप करून झालेल्या कष्टांच्या योगानें शरीरास प्राप्त झालेली क्षीणता जाऊन तें लवकरच घष्टपुष्ट होईल अशी खाणापिण्याची योजना करून कन्या रजस्वला होऊन शुद्ध झाल्यावर मंडप वगैरे घालून त्या ठिकाणीं सुगंधादि द्रव्यांचा व घृतादिकांचा होम करून विद्वान् स्त्रीपुरुष, वडील माणसें, आईबाप इत्यादिकांचा सत्कार करून अध्यापकाचे समक्ष विवाह करावा. ते पूर्वींचे दिवस गेले. तो काळ बदलला, विचार बदलले व मनुही फिरला, अशा समयीं वधूवरांच्या मातापितरांकडून असें सांगण्यांत येतें कीं–

देवदत्तां पतिर्भार्यां विंदते नेच्छयात्मनः—मनु.

पुरुषांस त्यांच्या इच्छेप्रमाणें नव्हे तर, देवानें जी नेमलेली असेल तीच भार्या मिळेल, तसेच स्त्रीसही जो पति नेमला असेल तोच मिळतो. मग आपण उगाच धांवाधांव व खटपट कां करा ! ! कित्येक ह्मणतात, सती सावित्रीनें आपला पति स्वतः शोधला. त्या सावित्रीची योग्यता ज्यावेळीं आमच्याकडील स्त्रियांस येईल, त्या दिवशीं आह्मीं आमच्यावरील जबाबदारी त्यांच्यावर टाकून मोकळे होऊं. सावित्री विचारी, निश्चयी व स्वतःच्या जबाबदारीवर काम करणारी असल्याकार-

णानें तिनें जें केलें तें त्या काळाला अनुसरूनच केलें. पण हल्लींच्या काळीं कन्येवर अगर मुलावर जर जबाबदारी टाकली, तर तीं कदाचित् बाहेरील भपक्याबर भुलून जाऊन एकमेकांच्या कुळांची माहिती त्यांस नसली तर, विपरीत परिणाम घडून येतील. पाश्च्यात्य देशांत स्त्रीपुरुषांची कामवासना उद्भुत होऊन वधूवरशोधन, कुलपरीक्षा न होतां होतें, ह्मणजे त्यांचें एकमेकांवर प्रेम जडून मग त्यांचा विवाह होतो. असल्या प्रकारचे विवाह कधीं सुखाचे तर कधीं दुःखाचे असे आढळण्यांत येतात. प्रेमातिशयांत त्यांचा मागचा पुढचा विचार नाहींसा होतो. घटस्फोटाची पाळी न येतां उभयतांचा काळ नेहमीं सुखाचा जावा, परस्परांनीं प्रेमानें वागावें, ह्मणून त्या उभयतांच्या कल्याणाकरितां त्यांच्या मातापितरांनीं खबरदारी घेतली पाहिजे. आमच्या देशांत वर व वधू ह्यांची विचारीं मातापितरें दोन्ही कुलांचा पूर्ण शोध करून मग बहुधा आपल्या कन्येची व मुलाची संमति घेऊन विवाहाला आपलें अनुमोदन देतात, व त्या उभयतांचें आयुष्य सुखांत जातें. यदाकदाचित् विपरीत परिणाम घडून आल्यास ह्मणजे कन्येच्या संसाराचा बिघाड झाल्यास–

यस्मै दद्यात्पिता त्वेनां भ्राता चानुमते पितुः ।
तं शुश्रूषेत जीवंतं संस्थितं न च लंघयेत् ॥—मनु.

पित्यानें अगर भ्रात्यानें आपणांस ज्याच्या स्वाधीन केली आहे तो जिवंत असे पर्यंत त्याची सेवा स्त्रीनें करावी, एवढेंच नव्हे तर तो मृत्यु पावल्यानंतरही पति-व्रता धर्माचें उल्लंघन करूं नये अशी मनुनें स्पष्ट आज्ञा केली आहे.

भार्या व पति.

भार्याया भरणाद्भर्ता पालनाच्च पतिः स्मृतः । महाभारत.

भार्येचें पोषण करतो म्हणून भर्ता व पालन करतो म्हणून पति. पति शब्दांत नकार घुसून पति शब्द पत्नी झाला. स्त्रीलिंगी पति ती पत्नी म्हणजे दोन्हीं एकच. एक नकार घुसल्यानें हे शब्द निरनिराळे झाले. व्यास महर्षींनींही ह्मटलें आहे—

भर्तव्या रक्षणीया च पत्नी हि पतिना सदा ।

ह्या दोन्हीं वचनांवरून हें उघड होतें कीं जिच्याबरोबर आपण विवाह करतों, जी आपणाकरितां झटते, जी आपल्या जिवाची पर्वा न करतां रात्रंदिवस आपली काळजी वाहते, अशा गृहलक्ष्मीवर कटु वचनांनीं सत्ता गाजविणें हें निंद्य तर

खरेंच, पण अत्यंत गर्हणीय आहे. "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" हें मनुचें वचन घेऊन कित्येक असें प्रतिपादन करतात कीं, स्त्रियांस स्वातंत्र्य हें मुळींच नाहीं, तर त्यांनीं घरांतील कामें पहावीं व चूल फुंकावी, ह्याशिवाय इतर खटपटींत पडूं नये. पण सबंध श्लोकाचें निरीक्षण केल्यास असें आढळून येईल कीं, कौमार्यावस्थेंत, यौवनावस्थेंत तसेंच वार्धक्यांत ह्या तिन्हीं काळीं पिता, पति व पुत्र ह्यांनीं स्त्रियांचें रक्षण करावें. संरक्षण करणें म्हणजे जशी गोठ्यांत गुरेंढोरें असतात, त्यांच्या खाण्यापिण्याची तजवीज ठेऊन त्यांचें संरक्षण करितों, तशा प्रकारचें कीं काय ? नव्हे, असल्या प्रकारचें संरक्षण करावयाचें असतें, तर, मनुला एवढें सांगण्याची खटपटच पडली नसती. मनुच्या म्हणण्याचा गर्भित अर्थ असा आहे कीं, स्त्रियांचें सामाजिक, धार्मिक व पारलौकिक बाबतींत बरेंच महत्व आहे, तें लक्षांत आणून त्यांचें नुसतें शारीरिक रक्षणच न करतां मानसिक व विशेषतः नैतिक शिक्षण त्यांस देऊन त्यांजपासून होणारी प्रजा ही कीर्तिमान् व पराक्रमी निपजेल अशा प्रकारचें असावें.

स्वां प्रसूतिं चरित्रं च कुलमात्मानमेव च ।
स्वं च धर्मं प्रयत्नेन जायां रक्षन् हि रक्षति ॥ मनु.

पत्नीचें नैतिक संरक्षण केल्यानें आपली संतति, आपलें चारित्र्य, आपलें कुळ, आपलें शरीर व आपला धर्म ह्या सर्वांचें आपोआप व सहजगत्या संरक्षण होतें. कदाचित् कोणी ह्मणेल कीं, घरांत चार माणसें खातात, त्यांच्यांतच स्त्री ही खाईल व स्वस्थ राहील, तिच्या रक्षणाचे एवढे चोचले कशाला हवेत ! पण मनु म्हणतात—

यादृशं भजते हि स्त्री सुतं सूते तथाविधम् ।
तस्मात्प्रजाविशुद्ध्यर्थं स्त्रियं रक्षेत्प्रयत्नतः ॥ मनु.

स्त्री ही जशा प्रकारच्या पुरुषाचें सेवन करते, तशा प्रकारचा पुत्र प्रसवते, एवढ्याकरितां जर शुद्ध प्रजा हवी असेल तर मोठ्या प्रयत्नानें स्त्रियेचें रक्षण करून सुप्रजा निर्माण कर, कारण स्त्रियेचें रक्षण हेंच कुलधर्म होत. जर करितां रक्षणाबद्दल तिला हाणमार करून, रात्रंदिवस त्रास देऊन बोचबोचून घेशील, तिला कोंडून ठेवण्याचा प्रयत्न करशील तर तुझे हे उपाय व्यर्थ होत.

न कश्चिद्योषितः शक्तः प्रसह्य परिरक्षितुम् ।
एतैरुपाययोगैस्तु शक्यास्ताः परिरक्षितुम् ॥ मनु.

कोणीही मनुष्य स्त्रियांस बलात्कारानें कोंडून रक्षण करण्यास समर्थ होत नाहीं, तर, त्यांचें रक्षण करण्यास पुढील उपाय योजले पाहिजेत.

अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत् ।
शौचे धर्मेऽन्नपक्त्यां च पारिणाह्यस्य चेक्षणे ॥ मनु.

स्त्रियांच्या हातीं द्रव्यसंग्रह, व्यय, स्वच्छता, धर्म, पाकनिष्पत्ति आणि घरांतील जिनसांवरील देखरेख ह्यांजवर जर त्यांची योजना केली, तर पति पत्नी हीं दोघेंही आनंदी राहून संसार सुखाचा जाईल. दोघेंही आनंदी असल्यानें दोघांसही समाधान, एकमेकांच्या विचारांचा विनिमय होऊन गृहकृत्यें यथास्थित चालतील. वरील विवेचनावरुन कित्येक असा आक्षेप घेतील कीं स्त्रियांस स्वातंत्र्य हें मुळींच नाहीं, आणि असें वाटणें हें साहजिकच आहे, तथापि शास्त्रकारांनीं मुद्दाम जर कोणी स्त्रीस्वातंत्र्याविरुद्ध म्हणत असतील त्याबद्दल जास्त खुलासा केला असावा.

पतिर्भार्यां संप्रविश्य गर्भो भूत्वेह जायते ।
जायायास्तद्धि जायात्वं यदस्यां जायते पुनः ॥
पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स्वमातरम् ।
तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते ॥
तज्जाया जाया भवति यदस्यां जायते पुनः ।

पति हाच स्वतः स्वभार्येच्या पोटीं प्रवेश करून गर्भरुपानें पुनः जन्मतो, ह्मणजे पिताच पुत्र होतो. ह्मटलें आहे.

आत्मा वै पुत्रनामासि ।

ह्मणून पुत्राला आत्मज किंवा अपत्य ह्मणतात.

विवाहयोग्य कन्या.

विवाह करण्यापूर्वीं भलतीच एकादी मुलगी पाहून तिच्याबरोबर विवाह न करतां आपल्या कुळाला, शीलाला व योग्यतेला साजेल अशाच कन्येशीं विवाह करावा. कन्या ही तिच्या मातापितरांच्या गळ्यांत एक घोरपडच आहे.

जातेति कन्या महती हि चिंता कस्मै प्रदेयेति महान्वितर्कः ।
दत्ता सुखं यास्यति वा न वेति कन्यापितृत्वं खलु नाम कष्टः ॥

आधीं कन्या झाली ही वार्ता कानीं पडतांच मोठी चिंता उत्पन्न होते, मग ती हळु-हळु वाढली कीं तिला कोणाला व कोठें द्यावी असे नानाप्रकारचे विचार मनांत घोळूं लागतात. बरें एकाद्याच्या गळ्यांत घातली तर तो सुख देईल किंवा नाहीं, अशा काळजीनें तो विचारा* झुरत असतो. सुदैवानें जावई चांगला मिळाला तर ठीक, पण, तो जर का खाष्ट मिळाला कीं, बिचाऱ्या आईबापांच्या दुःखाला पारावारच नसतो. जावई व कन्या हीं उभयतां आपला संसार सुखानें लोटतात, हें पाहून त्याची सासु व सासरा आपण स्वतःस धन्य मानून घेतात. एवढ्याकरितां दोघांच्याही कुलाचा प्रथम विचार केला पाहिजे.

अर्थो हि कन्या परकीय एव तामद्य संप्रेष्य परिग्रहीतुः ।
जातो ममायं विशदः प्रकामं प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा ॥

कन्यारूपी धन हें परक्याचें आहे, हें पिता जाणतो. कन्या वयांत येई तोंपर्यंत तिचें लालनपालन करण्याचें काम पित्याचें असतें. त्यानें उत्तम, निरोगी व विद्वान् असा वर पाहून आपणाजवळ असलेली ठेव विधिपूर्वक त्याच्या स्वाधीन करावी. मग त्याचा तिच्यावर कोणत्याही प्रकारचा हक्क नसतो. ठेव ठेवणाराची ठेव जोंपर्यंत आपल्या स्वाधीन आहे, तोंपर्यंत आपण तिचे मालक असतों; पण ज्यावेळीं ठेव ठेवणारा ठेवीची मागणी करण्यास येतो, त्यावेळीं प्रामाणिक व्यापारी विनतक्रार ती मालकाच्या स्वाधीन करतो. त्याचप्रमाणें कन्यारुपी ठेव उत्तम व जाणत्या पित्यानें ठेवीची मुदत सरल्याबरोबर म्हणजे कन्या उपवर झाल्याबरोबर तिला तिच्या पतीच्या स्वाधीन करावी. कोणत्याही प्रकारचा मोबदला चांगला व्यापारी ठेव ठेवणारापासून घेत नाहीं, त्याचप्रमाणें सुशील आईबाप ठेवीच्या रक्षणाबद्दल तिच्या पतिकडून एक छदामही न घेतां मोठ्या आनंदानें व स्वतःस कृत्यकृत्य झालों असें मानून कन्येला सालंकृत करून तिला तिच्या पतीच्या स्वाधीन करतात. पण जो अधम व्यापारी पैसाच

---

* संभवे स्वजनदुःखकारिका । संप्रदान समयेऽर्थहारिका ॥
यौवनेपिबहुदोषकारिका । दारिका हृदयदारिका पितुः ॥

मिळावा अशी इच्छा बाळगणारा असतो, तो व्याजबट्टा करून ठेव ठेवण्याबद्दलची जबाबदारी पडली, काळजी वहावी लागली, म्हणून ठेव परत देतेवेळेस चक्रवाढीनें पैशाची आकारणी करतो, त्याचप्रमाणें अधम बाप आपली कन्या देतेवेळीं तिच्या पतीकडून द्रव्य घेऊन तिची विक्री करतो. वास्तविक पैसा घेऊन केलेलें कन्यादान हें प्रथमतः *दानच नव्हे, व तें कन्यादानही होऊं शकत नाहीं व कन्यादानाचें पुण्यही पदरीं पडत नाहीं. पिता ज्यावेळीं कन्येचें दान करतो, कन्या हें परक्याचें धन आहे, हें जरी तो पूर्णपणें जाणतो, तरी पण, माया ही कांहीं अगम्य चीज असल्याकारणानें त्याचा कंठ भरून आल्यावांचून राहत नाहीं. मग तो गृहस्थाश्रमी असो अगर

* दान म्हणजे कोणत्याही पदार्थावरची आपली सत्ता निवृत्ति करून तो पदार्थ मोबदल्याशिवाय दुसऱ्यास देणें. वस्तुचें दान केल्यावर प्रत्युपकाराची आशा ठेऊं नये. श्रीभगवान म्हणतात—

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।

दातव्यमिति ह्या श्लोकांतील तव्य प्रत्यय फारच महत्वाचा आहे. तव्याचा अर्थ जें द्यावयाचें तें दिलेंच पाहिजे, तेथें क्षमा नाहीं. आधीं कन्या झाली, कीं, ती जन्मल्याबरोबर तिच्या कपाळीं दातव्य हा शब्द जरी काळ्या शाईनें लिहिलेला नसला तरी तो ब्रह्मलिखित असतोच. लहानपणीं तिचें पालन पोषण करून मोठी झाल्यावर तिला प्रत्युपकाराची अपेक्षा न करतां देशकाल व सुपात्र वर पाहून त्याला ती दिलीच पाहिजे. पात्र शब्द " पतनात् त्रायते इति पात्रं " आपलें पतन होऊं नये व कन्यादानाचें पुण्य मिळून आपला उद्धार व्हावा म्हणून "विष्णुस्वरूपी वराय श्रीस्वरूपी कन्यां प्रयच्छेत" असा संकल्प करून ती द्यावीच लागते.

अध्यात्म दृष्टीनें पाहूं गेलें असतां दान म्हणजे जी वस्तु ज्याची असेल ती तेथें ठेवणें किंवा देणें. आपली कन्या ही तिच्या पतीची, तेव्हां ती त्याला देणें म्हणजे तिचें दान करणें होय. दान म्हणजे एकाचा संबंध निवृत्त होऊन दुसऱ्याचा संबंध उत्पन्न होणें हें दानाचें स्वरूप होय. कन्यादानांत पित्याचा संबंध निवृत्त होत नाहीं, असें असतां दान कसें होतें ? अशी शंका येते. त्यास उत्तर हेंच कीं, कन्येच्या ठिकाणीं पित्याचे दोन संबंध असतात. एक अपत्यापत्यवद्भाव व दुसरा स्वस्वामिभाव, त्यापैकीं स्वस्वामिभाव पित्याचा निवृत्त होऊन भर्त्याचा उत्पन्न होतो, पण पित्याचा अपत्यापत्यवद्भाव संबंध निवृत्त होत नाहीं, हें इतर दानापेक्षां कन्यादानांत विशेष आहे.

कन्येचें दान केल्यावर तिच्याकडचें अन्न घेणें म्हणजे आपल्या पुण्याची हानि करून घेणें होय. कन्यादान हें सात्विकदान असतें. सात्विक दानांत ही मजा आहे कीं दान

तपोवनांतील कण्व असो. माया ही रडवितेच. आपलें म्हटलें कीं मोह हा उत्पन्न व्हावयाचाच. ज्याचा आपला संबंध नसतो त्याजवर प्रीति नसते, पण एकदां का आपला म्हटलें म्हणजे माया ही दत्त म्हणून पुढें येऊन उभी राहते, व आपणांपासून आपल्या प्रिय वस्तुची ताटातूट होण्याचा प्रसंग आला कीं रडविते.

गण.

ज्योतिषशास्त्राप्रमाणें वर व वधू ह्यांचे गण, नाडी व गुण बरोबर जुळतील, ग्रहमैत्री जमेल अशाच कन्येबरोबर विवाह करावा. ह्याच्या विरुद्ध प्रकार असल्यास परस्परांनीं परस्पराबरोबर विवाह करूं नये.

गोत्र.

सवर्णामसमानानार्षाममातृ पितृ गोत्रजाम् ।—व्यास.
असगोत्रान् । मातुरसपिण्डान् ।—गोभिलगृह्यसूत्र.

बापाच्या गोत्रांतील त्याचप्रमाणें मातेच्या सहा पिढ्यांतील मुलीशीं विवाह करूं नये.

अरोगिणीं भ्रातृमतीमसमानार्ष गोत्रजाम् ।
पंचमात्सप्तमादूर्ध्वं मातृतः पितृतस्तथा । याज्ञवल्क्य.

निरोगी, जिला बंधु आहेत, समान गोत्रांतील व समान प्रवरांतील नव्हे अशा मुलीशीं विवाह करावा.

मातुलस्य सुतां विप्रो दक्षिणे तां समुद्वहेत् ।
वर्जनीया प्रयत्नेन सर्वैर्वाजसनेयिभिः ॥

करणारा प्रत्युपकाराची इच्छा करीत नसतो, जी वस्तु एकदां दान केली, तिच्याकडचें अन्न ग्रहण करणें म्हणजे आपला सात्विकपणा घालविणें होय, तो जाऊं नये व जोडलेल्या पुण्याचें फल कायम रहावें हाच आपल्या कन्येकडचें अन्न तिला मूल होईतोंपर्यंत ग्रहण न करण्याचा मतलब आहे.

पुराणांतरीं असें वर्णन आहे कीं कन्यादानाचे वेळीं कन्येचा पिता असें म्हणतो कीं:—

अस्यां यो जायते पुत्रः स मे पुत्रो भवेदिति ।

म्हणजे ह्या कन्येच्यापोटीं जो प्रथम पुत्र होईल त्यावर तुमचा हक्क न राहतां त्याच्यावर माझी सत्ता राहील; तुमची राहणार नाहीं, असा करार जावयापासून पूर्वी करून घेत !

वाजसनेयी शाखेच्या ब्राह्मणांनीं मातुलगोत्रांतील कन्या वरूं नये.

यदाकदाचित् चुकून वाग्दान होऊन विवाहसमय प्राप्त होऊन सर्व तयारी झाली आणि एक गोत्र वधूवरांचें निघालें, तर त्यावेळीं कित्येक शास्त्रकारांनीं कन्येचें दत्तविधान करून मग तिचा विवाह करावा असें सांगितलें आहे, कारण—

गोत्रान्मातुः सपिण्डात्तु विवाहो गोवधस्तथा ।—ब्रह्मपुराण.

मातुल गोत्र व सपिंड्य हीं दोन्हीं वर्ज न करतां जर विवाहसंबंध घडून आला, तर तो गोवधाप्रमाणें समजावा, असें जरी आहे, तरी यजुर्वेदांतर्गत वाजसनेयी (ह्या शाखेचा प्रवर्तक श्रीभगवान् याज्ञवल्क्य ह्यांनीं असल्या विवाहास मनाई केली आहे) शाखेच्या ब्राह्मणाव्यतिरिक्त इतर शाखेंतील ब्राह्मणांत तो घडून येतो.

असपिंडाच या मातुरसगोत्रो च या पितुः ।
सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने ॥—मनु.

जी कन्या मातेच्या सहा पिढ्यांत किंवा पित्याच्या गोत्रांतील नसेल अशा मुलीशीं विवाह करावा. सपिंड व सगोत्रांत विवाह केल्यानें संततींत विशेष गुण उत्पन्न होत नाहींत. एवढेंच नव्हे तर तो विवाह सशास्त्र न मानतां गौण समजावा. (ह्याविषयीं विशेष विस्तार ज्योतिषशास्त्रांत पाहावा.)

दुधांत मिश्रि आदिक औषधी मिळविल्यानें फार उत्तम गुण त्या मिश्रणांत उत्पन्न होतात. त्याचप्रमाणें भिन्न कुल व भिन्न गोत्रांतील मुलीशीं विवाह केल्यानें फार लाभ होतात. शिवाय विवाहित स्त्रीपुरुषांचीं घरें जवळ असल्यानें तंटेबखेडे उत्पन्न होऊन एकमेकांचें वारंवार जाणेंयेणें होतें, त्यामुळें वांकडें पडण्याचा बराच संभव असतो. कन्येचें माहेर जवळ असल्यानें तिला तिच्या माहेरच्या माणसांबद्दल जास्त घमेंड येईल, वारंवार माहेरी जाईल, असें होऊं नये म्हणून तिला दूर दिलेलेंच चांगलें. कारण "दुहिता, दुर्हिता, दुरेहिता भवतीति" (निरुक्त). कन्येचा दूर देशांतील वराशीं संबंध झाल्यानें फार हित होतें, म्हणून कन्येला दुहिता म्हणतात. शिवाय दूर असल्याकारणानें जावई वगैरे ह्यांस दोन दिवस सासुरवाडीस पाहुणे म्हणून जाण्यास मिळतें, व आयताच पाहुणचाराचा व आदरातिथ्याचा लाभ मिळतो.

विवाहानंतर कन्येचें गोत्र.

पाणिग्रहणिका मंत्राः पितृगोत्रापहारकाः ।
भर्तृगोत्रेण नारीणां देयं पिण्डादिकं ततः ॥

विवाहसंबंधाचे मंत्र पित्याचे गोत्रापासून कन्येला सोडविणारे आहेत, कारण विवाह झाल्यानंतर विवाहित स्त्रिच्या पतीचें जें गोत्र असतें त्यांत ती जाते, व पिण्डादि हे तिच्या पतीच्या गोत्राच्या नामोच्चारानें द्यावें असें बृहस्पति आचार्य म्हणतातः—

चतुर्थी होम मंत्रेन त्वङमांस हृदयेंद्रियैः ।
भर्ता संयुज्यते पत्नी तद्गोत्रा तेन सा भवेत् ॥

चतुर्थीकर्माचे वेळीं जो होम केला जातो, त्यावेळीं जे मंत्र म्हटले जातात, त्या मंत्राच्या योगें त्वचा, मांस, हृदय आणि इंद्रियें ह्यांजसहित पत्नी पतिबरोबर संयुक्त होऊन जाते, व त्याच वेळेपासून ती पतीच्या गोत्राची होते. विवाहानंतर कन्या दुसऱ्याचे गृहीं जाते, व त्या कुलाचा अभिमान ती बाळगते नव्हे ती त्या कुळांतीलच एक होते, म्हणून तिचें माहेरचें नांव बदलून सासरचें नांव ठेवण्यांत येतें.

स्वगोत्राद्भ्रश्यते नारी विवाहात्सप्तमे पदे—याज्ञवल्क्य.

विवाह झाल्यावर सप्तपदी झाली कीं कन्या पित्याचे गोत्रापासून ती आपल्या पतीच्या गोत्रांत जाते.

अर्धापुरुष.

ज्याचा विवाह झाला नाहीं, त्याला अर्धा म्हणावें, म्हणजे त्याचें जें अर्धांग स्त्री ती त्याला मिळली नाहीं. म्हटलें आहे

अर्ध भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।

पुरुषाला पत्नी पाहिजे, असें जरी आहे तरी वाटेल त्या स्त्रियेबरोबर विवाह करण्याची मनाई केली आहे.

यावन्नविंदते जायां तावदर्द्धो भवेत्पुमान् ।
नार्द्ध प्रजायते पूर्णः प्रजायेतेत्यपि श्रुतिः ॥

जोंपर्यंत पुरुष व स्त्री ह्यांचा विवाह झाला नाहीं तोंपर्यंत तो अर्धा समजावा, कारण एकटा पुरुष किंवा एकटी स्त्री हीं प्रजा उत्पन्न करण्यास असमर्थ असतात, म्हणून त्यांचे विवाह हे झालेच पाहिजेत.

परिवित्तिः परिवेत्ता च ययाच परिविद्यते ।
दाराग्नि होत्रसंयोग कुरुते योग्रजे स्थिते ।
परिवेत्ता सविज्ञेयः परिवित्तिस्तुपूर्वजः ।

विवाह करणाऱ्या धाकट्या भावास परिवेत्ता व अविवाहित राहिलेल्या वडील भावास परिवित्ति ह्मणतात, व परिवेत्याच्या बरोबर लग्न करणाऱ्या कन्येस परिवेदिनी म्हणतात.

विवाहास वर्ज कन्या व कुलें.

अक्षता च क्षता चैव पुनर्भूः संस्कृता पुनः ।
स्वैरिणी या पतिं हित्वा सवर्णं कामतः श्रयेत् ॥—याज्ञवल्क्य.

जी अनन्यपूर्विका नसेल तिच्याबरोबर विवाह करावा " अन्येषां वाग्दानादिना न पूर्वदत्ता " कोणत्याही प्रकारचा ज्याच्याबरोबर पूर्वसंबंध झाला असेल तिला अनन्यपूर्विका म्हणतात. जसें वाग्दान वगैरे. एक पुनर्भूः व दुसरी स्वैरिणी. पुनर्भू दोन जातीची असते, क्षता आणि अक्षता. लग्नापूर्वी अन्य पुरुषाबरोबर जिचा संबंध घडला असेल ती क्षता; पण जिचा विवाह मात्र झाला आहे, पण पतिसमागम घडला नाहीं ती अक्षता. जी विवाहसंस्कार होण्यापूर्वी कामासक्त होऊन अन्य सवर्ण पुरुषांचा आश्रय करिते ती स्वैरिणी. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, पुनर्भूः व स्वैरिणी ह्यांजबरोबर विवाह करूं नये. धनधान्यादिकें करून जरी युक्त असलीं तरी खालीं दिलेल्या दहा कुलांशीं संबंध ठेऊं नये.

महांत्यपि समृद्धानि गोजाविधन धान्यतः ।
स्त्रीसंबंधे दशैतानि कुलानि परिवर्जयेत् ॥ मनु.

वधूचें कुल गाई, शेळया द्रव्यादि समृद्ध असलें तरी तें जर हीनक्रिय असेल तर तें कुल वर्ज करावें.

हीनक्रियं निष्पुरुषं निश्छंदो रोमशार्शसम् !
क्षय्यामयाव्यपस्मारिश्वित्रिकुष्ठिकुलानी च ॥ मनु.

जो सदाचारहीन, ज्या कुळांत सत्पुरुष नाहींत, वेदाध्ययनरहित, अति केसांची, ज्यांच्या कुळांत क्षय, दमा, क्षयरोग, अपस्मार, श्वेतकुष्ट, गलितकुष्ट अशा कुळांतील कन्येशीं विवाह करूं नये, व जर केले तर ते रोग त्या कुळांत उत्पन्न होतात.

नोद्वहेत्कपिलां कन्यां नाधिकांगीं न रोगिणीम् ।
नालोमिकां नातिलोमां न वाचाटां न पिंगलाम् ॥ मनु.

रंगानें पिंवळी, पुरुषापेक्षां अधिक लठ्ठ, उंच किंवा बलिष्ट, रोगी, केशरहित, किंवा सर्वांगावर केस आहेत अशी, बडबड करणारी, वाचाळ, पिंगट डोळ्यांची अशा स्त्रिशीं विवाह करूं नये.

सरसा सालंकारा सुपदन्यासा सुवर्णमय मूर्तिः ।
आर्या तथैव भार्या न लभ्यते यत्नहीनेन ॥ मनु.

रस त्याचप्रमाणें अलंकारासहित, सुंदर पदन्यासवाली, सुवर्णमय (जिचा वर्ण गोरा आहे) अशी भार्या पाहून तिच्या बरोबर विवाह करावा. पण अशी सर्व गुण संपन्न भार्या मिळणें कठीण असल्याकारणानें साधारण कुल, गोत्र, कुलाचार व सदाचार पाहून आपणांस योग्य अशा कन्येबरोबर विवाह करावा. सर्व गुण संपन्न भार्या सर्वांसच कोठून मिळणार ! पुनः ती कशी असावी—

अव्यंगांगी सौम्यनाम्नीं हंस वारणगामिनीम् ।
तनुलोम केशदशनां मृद्वंगीमुद्वहेत् स्त्रियम् ॥ मनु.

कोणत्याही तऱ्हेचें जिला व्यंग नाहीं, मृदु नांवाची, हंस अगर हत्तीच्या गतीची, मऊ व लांब केस, नाजुक दांत व अंगाची कातडी मऊ असावी.

अनिंदितांकन्यावरयेत्कुलतोलक्षणतश्चयवीयसीमवयसावपुषाच ।

कुळानें अगर लक्षणानें अनिंदित व आपल्यापेक्षां वयानें लहान अशा कन्ये-बरोबर विवाह करावा.

कुलंच शीलंच वयश्चरूपं विद्यांच वित्तंच सनाथतांच ।
एतान्गुणान्सप्त परीक्षदेया कन्या बुधैः शेषमचिंतनियम् ॥

कुल, शील, वय, रूप, विद्या, वित्त, पालक ह्या प्रकारच्या सात गुणांनीं युक्त असलेल्या कन्येबरोबर विवाह करावा.

मंत्रतस्तु समृद्धानि कुलान्यल्प धनान्यपि ।
कुल संख्यांच गच्छन्ति कर्षन्तिच महद्यशः ॥

धनवान लोक कुलशीलाचे समजले जातात, पण जरा द्रव्य असलें तरी कुला-शीलाला लागणारी सामुग्री, धर्माचरण, विनय, विद्या, दान, शूरता हीं नसलीं तर तें कुल कुलवान गणूं नये, तर ज्या कुलांत वरील गुण असतील तेंच कुल कुलीन जाणावें व त्याच कुलांतील माणसें यश संपादन करतात.

कन्येचे गुण व परीक्षा.

दुर्विज्ञेयानि लक्षणानीति । अष्टौ पिंडान् कृत्वा ऋतमग्रे प्रथमं जज्ञ ऋते सत्यं प्रतिष्ठितं यदियं कुमार्यभिजाता तदियमिह प्रतिपद्यतां यत्सत्यं तद्दश्यतामिति पिंडान-भिमंत्र्य कुमारीं ब्रूयादेषामेकं गृहाणेति। क्षेत्राच्चेदुभयतः सस्याद्गृण्हीयादन्नवत्यस्याः प्रजा भविष्यतीति विद्याद्गो-ष्ठात्पशुमती वेदिपुरीषाद् ब्रह्मवर्चस्विन्यविदासिनो न्ह-दात्सर्वसंपन्ना देवनात्कितवी चतुष्पथा द्विप्रव्राजिनी-रिणा दधन्या स्मशानात्पतिघ्नी ॥

कन्येची परीक्षा करण्याचा प्रकार वरप्रमाणें आश्वलायनानें दिला आहे. १ उभयतः सस्यक्षेत्र (ज्या शेतांत दोन वेळ धान्य पिकतें ती जमीन.) २ गोष्ट (गोठा.) ३ वेदिपुरीष (यज्ञांतील उरलेल्या दर्भ समिधादि टाकण्याची जागा.) ४ अविदासि न्हद (कधींच न आटणारा पाण्याचा डोह.) ५ देवन (जुगार खेळण्याची जागा.) ६ चतुष्पथ (चवाठा.) ७ इरिण (खारी जमीन जिच्यांत

धान्य उगवत नाहीं अशी.) ८ स्मशानः अशा आठ ठिकाणची माती आणून तिचे पेरु एवढे आठ गोळे करावे, व ते खुणेनें पाटावर मांडावे. एवढें झाल्यावर " ऋतमग्रे प्रथमं " ह्या मंत्रानें त्याचें अभिमंत्रण करावें, नंतर वधूकडून त्या आठ गोळयांपैकीं वाटेल तो उचलण्यास सांगावा. वर दिलेल्या जागेवरील ज्या ज्या जागेवरचा मातीचा गोळा ती उचलील, त्या त्या प्रमाणें तिचीं लक्षणें पहावीं. १ धनधान्य संपन्न होईल. २ संतति पश्वादिकांनीं युक्त होऊन सुख भोगील. ३ वेदशास्त्र संपन्न होईल. ४ संतति सर्व प्रकारच्या संपत्तिनीं युक्त होईल. ५ संतति जुगारी निपजेल. ६ ती स्वतः व्यभिचारिणी निपजेल. ७ दरिद्री होईल. ८ पतीला मारील.

आदौ कुलं परीक्षेत ततो विद्यां ततो वयः ।
शीलं धनं ततो रूपं देशं पश्चाद्विवाहयेत् ॥

प्रथम कुल, नंतर विद्या, वय, स्वभाव, धन, रूप, त्याचप्रमाणें राहण्याचें ठिकाण, ह्यांचा तपास करून मग कन्येबरोबर विवाह करावा.

कुलमग्रे परीक्षेत बुद्धिमते कन्यां प्रयच्छेत् ।
बुद्धिरूप शील लक्षण सपन्नामरोगामुपयच्छेत् ॥

कन्या पसंत करतेवेळीं प्रथम कुलाची परीक्षा करावी, बुद्धिमान् अशा वराला द्यावी, सुंदर, बुद्धि, रूप, स्वभाव, उत्तम लक्षणाची व निरोगी अशा कन्येबरोबर विवाह करावा.

ययोरेव समं वित्तं ययोरेव समं कुलम् ।
तयोर्मैत्री विवाहश्च न तु पुष्टविपुष्टयोः ॥ पंचतंत्र.

वित्त व कुल हीं ज्यांचीं सारखीं आहेत त्यांची मैत्री व विवाह नीट रीतीनें होऊं शकतात.

ऱ्हस्वस्वरां मेघवर्णां मधुपिंगल लोचनां ।
तादृशीं वरयेत्कन्यां गृहस्थ सुख मेधते ॥ शातातप.

मृदु आवाजाची, श्यामवर्ण व मधूर आणि पिंगळवर्ण नेत्राची अशा कन्येबरोबर विवाह केला असतां सुखप्राप्ति होते.

वर कसा असावा.

एतैरेव गुणैर्युक्तः सवर्णः श्रोत्रियो वरः ।
यत्नात्परीक्षितः पुंस्त्वे युवा धीमान जयप्रियः ॥ याज्ञ०

वर अशा गुणानें युक्त असावा कीं, तो समान वर्णाचा, विद्वान्, वीर्यवान्, तरुण, बुद्धिमान् त्याचप्रमाणें लोकप्रिय असावा.

कुलंच शीलंच सनाथताच । विद्याच वित्तंच वपुर्वयश्च ।
एतान्गुणान्सप्त विचिन्त्यदेया । कन्या बुधैः शेषमचिंन्तनीयम् ॥

बुद्धिमान् पुरुषानें कुल, शील, वर्तणूक, विद्या, धन, शरीर वगैरे गुणांची परीक्षा करून मग कन्या द्यावी.

मुलाला आपणांस बायको सुस्वरूप, सद्गुणी व विद्वान् असावी असें वाटतें, त्याचप्रमाणें कन्येलाही आपणांस रूपवान्, विद्वान् व सर्वमान्य असा पति मिळावा अशी इच्छा असते.

कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतम् ।
बांधवाः कुलमिच्छंति मिष्टान्नमितरे जनाः ॥

कन्या रूपवान् पति मिळावा म्हणून इच्छा करते, तिच्या आईला वाटतें कीं जावई धनवान् असावा, बापाला वाटतें जावई विद्वान् असावा, बंधू म्हणतात आपली बहीण कुलशील घराण्यांत पडावी, व इतर सगेसोयरे ह्यांस लग्नांत दोन दिवस मिष्टान्न मिळून चंगळ उडेल असें वाटत असतें.

विवाह कधीं व कोणाबरोबर करावा.

चतुर्थमायुषो भागं उषित्वा गुरु सन्निधौ ।

आयुष्याचा चवथा भाग म्हणजे पंचवीस वर्षांचा विद्यार्थी होई तोंपर्यंत त्यानें गुरुगृहीं अध्ययन करून मग गुर्वाज्ञेनें विवाह करावा.

बाल्ये विद्याग्रहणादीनर्थात् ॥ २ ॥ कामं च यौवने ॥ ३ ॥

वात्स्यायन कामसूत्र.

बालपणांत विद्या ग्रहण करून यौवन प्राप्त झालें कीं गुणवान् अशी कन्या पाहून तिच्याबरोबर विवाह करून गृहस्थाश्रमाचा आश्रय करावा.

गुरुणानुमतः स्नात्वा समावृत्तो यथाविधि ।
उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् ॥

*ब्रह्मचाऱ्यानें वेदादि शास्त्रांचें पूर्ण अध्ययन करून झाल्यावर गुरुची आज्ञा घेऊन व्रतस्नात† होऊन गुरुगृहांतून परत स्वगृहीं यावें, व ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्यांनीं आपापल्या वर्णानुकूल उत्तम अशा कन्येशीं विवाह करावा.

विवाह हे ज्या वर्णाचा वर असेल, त्याच वर्णांतील वधूशीं व्हावा हें प्रशस्त होय. मनु म्हणतात " सवर्णाऽग्रे द्विजातीनां प्रशस्ता दार कर्मणि " ब्राह्मणानें इतर वर्णाच्या वधूबरोबर विवाह केल्यास तो प्रशस्त नव्हे, त्याचप्रमाणें इतर तीन वर्णांनीं ब्राह्मणकन्येशीं विवाह करूं नये, प्रत्येक वर्णानें आपापल्या वर्णांतील स्त्रीबरोबर विवाह करावा, कारण सवर्णांतील दांपत्यापासून होणारी प्रजा तें कुल समजलें जातें. कुलाचें रक्षण करण्याकरितां प्रत्येकानें आपापल्या वर्णांतील

---

*ब्रह्मचाऱ्याचे दोन वर्ग आहेत. एक नैष्ठिक व दुसरा उपकुर्वाण. नैष्ठिक हा आपला अभ्यास पुढें चालवितो व उपकुर्वाण हा गृहस्थाश्रम चालविण्यास उत्सुक असतो.

† विद्या समाप्त केली, पण ब्रह्मचर्याची समाप्ति न करतां जो स्नान करतो तो विद्यास्नातक, ब्रह्मचर्य समाप्त केलें, पण विद्या समाप्त न करतां स्नान करतो तो व्रतस्नातक व जो विद्या व ब्रह्मचर्य हीं दोन्हीं समाप्त करतो तो विद्याव्रतस्नातक जाणावा.

विद्यां समाप्य दारान् कृत्वाग्नीनाधाय कर्माण्यारभते सोमावराध्यानि यानिश्रूयन्ते ।

विद्या समाप्त करून झाल्यावर मग विवाह करावा. गृह्यकर्मासाठीं अग्न्याधान करावें व उत्तमोत्तम कर्मे करावींत. विद्या पूर्ण करून विद्यार्थी पितृगृहीं यावयास निघतो, त्यावेळीं आचार्य (गुरु) त्यास उपदेश करीत असत व सांगत कीं " प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सी ", हे शिष्य तूं जो मजजवळ विद्या शिकलास त्या विद्येचा वंश तोडूं नकोस. " वंशो द्विधा विद्यया जन्मनांच ". त्याचप्रमाणें पितृगृहीं गेल्यावर विवाह करून प्रजोत्पादन कर. ह्या उपदेशाचें मर्म इतकेंच कीं तूं दुर्वेच्या ताण्याप्रमाणें आपला विद्यारूपी वंश व पितृवंश ह्यांचा उच्छेद न करतां तो एकसारखा चालवीत जा. विवाह करणें तो विद्यास्नातक झाल्यावांचून करूं नये. तसेंच जो व्रात्य असेल तो सुद्धां विवाहाला नालायक ठरतो. " व्रात्य संस्कार हीनः " ज्याचा कोणत्याही तऱ्हेचा संस्कार झाला नाहीं, किंवा ज्याला रीतभात योग्यायोग्य कळत नाहीं तो व्रात्य. व्रात्याचा विवाह होऊं नये असें मनु, कात्यायन, आपस्तंब वगैरे स्मृतिकारांचें म्हणणें आहे.

कन्येबरोबर विवाह करावा, ह्याचें कारण प्रत्येक वर्णांतील गुणधर्म निराळे असतात. ब्राह्मणानें क्षत्रिय कन्येबरोबर अगर क्षत्रियानें वैश्य कन्येबरोबर विवाह केला असतां वर्णभेद होऊन आचरणांत फरक पडतो. प्रत्येकाचें आपापल्या वर्णाप्रमाणें आचरण असतें. अशा परिस्थितींत धर्माचरणाला अडथळा येतो, प्रत्येकानें आपले धर्म हे पाळलेच पाहिजेत, ते मिश्र विवाहानें पाळतां येणार नाहींत. आपला वर्ण सोडून अगर कर्माचा त्याग करून जर विवाह होऊं लागले तर " स्वकर्मणांच त्यागेन जायते वर्णसंकरः " वर्णसंकर होतो. वर्णांचा व्यभिचार झाला कीं अनुलोम व प्रतिलोम विवाह प्रचारांत येतात.

हीनजातिं स्त्रियंमोहाद्धहन्तो द्विजातयः ।
कुलान्येव नयंत्याशु ससन्तानानि शूद्रताम् ॥—मनु.

हलक्या वर्णाच्या स्त्रीशीं विवाह करणारे हे आपल्या कुलाला संततीबरोबर शुद्रत्वाला नेतात. हलक्या वर्णाच्या स्त्रीशीं केलेल्या विवाहास अनुलोम व उच्च वर्णाच्या स्त्रिशीं विवाह केल्यास त्यास प्रतिलोम विवाह असें म्हणतात. मिश्र विवाहाच्या योगें होणारी संतति धर्मकृत्याला अनधिकारी होते. गौतमानें असें स्पष्ट सांगितलें आहे कीं " प्रतिलोमजास्तु धर्महिनः " प्रतिलोम विवाहापासून होणारी संतति धर्महीन निपजते, किंवा " कुलानुरूपाः प्रजाः संभवंति (हारीत) जसें कुल असेल तशी संतति होईल.

कन्यानामसवर्णानां विवाहश्च द्विजातिभिः ॥

ब्राह्मण वगैरे द्विजांनीं आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या कन्येबरोबर विवाह करूं नये.

विवाह हे दृष्ट साधनाकरितां नसून अदृष्ट साधनाकरितां आहेत. आपण आत्मा नित्य मानणारे आहोंत. आपणांस मरणोत्तर उत्तम फळ मिळावें म्हणून संस्कार हवे असतात. ह्या संस्कारांस झुगारून देऊन मनासारखें वागलें कीं संकर होतो. संकर व संस्कार हे दोन्ही शब्द सम उपसर्गपूर्वक कृ धातुपासून झाले आहेत. " संपरिभ्यां करोतौ भूषणे " (पाणिनि). कोणतेंही कृत्य विधिपूर्वक व धर्मानुकूल होतें त्यास संस्कार म्हणतात, व जें अविधिपूर्वक कामोपभोग पुरविण्याकरितां केलें जातें, त्या ठिकाणीं संस्कारांतील सकार जाऊन फक्त संकर

राहतो. संकर हा नीचावस्थेला नेणारा होऊन संस्कार हा उच्च गति देतो. सर्व प्राणी एकच, मग त्यांत उंचनीच हा भाव कोठून येतो ! सर्वच एका ईश्वराचीं लेकरें आहेंत, त्यांत एक श्रेष्ठ व दुसरा कनिष्ठ हा भेदभाव मुळींच नसावा. गोष्ट खरी, आंबा तेवढा येथून तेथून एकच, मग त्यांत हापूस, पायरी व रायवळ हे भेद कां हवेत ? हापूस मिटक्या मारून खावा व रायवळ नांव ऐकल्याबरोबर दूर सारावा हा न्याय कोठचा ! आंब्यांत जशा उंचनीच जाती आहेत, तशा मनुष्यप्राण्यांतसुद्धां उच्चनीच वर्ण आहेत. विधिपूर्वक स्ववर्णांतील कन्येबरोबर जो संबंध जोडला जातो, तो हापुसचे आंब्यासारख्या असून त्यापासून होणारी प्रजा ही अपत्यभाव पावते, व हीच पितृकार्याकरितां गृहित धरली जाते. " न पतंति पितरः अनेन स अपत्यं " " आत्मावैपुत्रनामासि " वगैरे वचनें हेंच दाखवितात कीं जर तुला दृष्टादृष्ट फळ मिळविण्याची इच्छा असेल तर सवर्णांतील कन्येबरोबर विवाह कर, कारण अपत्य हें पितरांचा उद्धार करणारें असतें. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं,—

अगम्यायाः स्त्रिया गम्यते सत्यपि कामशांतिर्भवत्येव,
तर्हि एक पत्न्या एव पाणिग्रहणस्य किं प्रयोजनं ?

कामशांति हाच जर विवाहाचा हेतु आहे, तर मग विवाह करून एकाच स्त्रीचे ठिकाणीं बांधून राहण्याचें प्रयोजन नाहीं अशा लोकांचें अज्ञान मात्र दृष्टोत्पत्तीस येऊन विवाहबंधनाची त्यांस मुळींच किंमत कळली नाहीं असेंच म्हणावें लागतें. प्रत्येक कर्मांत दोन फळें असतात. एक दृष्ट व दुसरें अदृष्ट. भात जेवलों, पोट भरलें हें दृष्ट फळ. पण तें अन्न पोटांत जाऊन त्याची बरोबर वाटणी होऊन शरीरसंरक्षणार्थ त्याचा उपयोग झाला, पण तो कसा झाला, ह्याचा उमज आपणांस होत नाहीं हें अदृष्ट फळ. जनावराचे हाडास कोणी जवळही घेण्यास खुशी नसतो, पण ज्यावेळीं तें हाड परदेशांत जाऊन त्याजवर संस्कार होऊन चाकूवाच्या पाताबरोबर तें मूठ होऊन आपल्या हातांत येतें, त्यावेळीं त्या हाडाचें कौतुक करून आपण काळजीपूर्वक त्यास खिशांत बाळगतों. संस्कारपूर्वक जो विवाहरूपी संबंध जोडला जातो, त्यापासून जी प्रजा होते ती आपल्या उद्धाराला कारणीभूत होते. संस्कार हे जसें दृष्ट फळ तसेच अदृष्ट फळ देणारे आहेत. असंस्कारी दांपत्यापासून होणारी प्रजा वारस ठरत नाहीं,

कोणासच कोणाचा थांग न लागतां अशा प्रकारचा संयोग करणाऱ्यांत व पशूंत भेद न उरतां त्यांची व ह्यांची बरोबरी होईल.

यथा गोश्वोष्ट्रदासीषु महिष्यजा विकासु च ।
नोत्पादकः प्रजाभागी तथैवान्यांगनास्वपि ॥—मनु.

गाय, घोडा, उंट, दासी, ह्मैस, शेळी, मेंढी यांच्या ठिकाणीं आपले बैल इत्यादिक योजून त्यांजपासून वत्स उत्पन्न करविणारा स्वामी जसा त्या संततीचा मालक होत नाहीं, त्याचप्रमाणें परस्त्रीचे ठायीं प्रजा उत्पन्न करणारा हा प्रजेचा विभागी होत नाहीं. क्षेत्राचे स्वामी नसून परक्षेत्रांत जे बीज पेरतात, ते फक्त क्षेत्राच्या स्वामीचा मात्र फायदा करून देतात, पेरणाराला त्यापासून कांहींच फायदा होत नाहीं. दुसऱ्याच्या गाईच्या ठिकाणीं दुसऱ्याच्या बैलानें जरी शंभर वत्स उत्पन्न केले, तथापि ते सर्व वत्स गाईच्या मालकासच मिळतात. त्याचप्रमाणें केवळ विषयवासना पुरविण्याकरितां जर अविधिपूर्वक संभोग झाले, तर त्यापासून होणारे पुत्र हे पित्याच्या उद्धाराच्या कामीं लायक ठरत नाहींत. एवढ्याकरितां संस्कारपूर्वक विवाहरूपी बंधनानें संपत्युत्पादन केलें असतां तें आपलें होऊन आपल्या उद्धाराला कारणीभूत होऊन आपल्या धर्माचें व कुलाचेंही रक्षण होतें. वर्णांचा संकर होत नाहीं, तो होऊं नये, धर्माचें यथायोग्य रक्षण व्हावें, एवढ्या॰ करितांच "सवर्णाऽग्रे द्विजातीनां प्रशस्ता दार कर्मणि" हें मनुनें ठासून सांगितलें आहे. धर्मरक्षणाकडे मनुचा विशेष कटाक्ष आहे हें वाचकांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें.

"समानशीले व्यसनेषु सख्यं" समानशील असतील त्यांचेंच सख्य होईल. गुर्जर ब्राह्मण व दक्षिणी ब्राह्मण यांच्यांत विवाह होत नाहीं, ह्याचें कारण गुर्जर कन्येची राहणी निराळी, खाणें निराळें, ती जर दक्षिणी ब्राह्मणाकडे आली तर त्यांचें जमावें कसें? श्रीमंताची ब्राह्मण कन्या ही गरीबाकडे जाऊं शकत नाहीं, जर गेली तर तिचा श्रीमंती थाट गरीबाकडे कसा चालणार? अकुलांतील कन्या कुलवानाकडे चालत नाहीं, ह्याचें कारण त्या दोघांच्या राहणींत फेरफार असणार. असा जर एकाच वर्णांत भेदभाव दिसून येतो, तर भिन्न कुलांतील किंवा भिन्न वर्णांतील कन्येबरोबर संबंध हा सुखकर कसा होणार! एवढ्याकरतांच "सवर्णाऽग्रे द्विजातीनां प्रशस्ता दार कर्मणि" हें धर्मशास्त्रकारांचें म्हणणें किती विचारपूर्वक आहे हें प्रत्येकानें ध्यानांत ठेवावें.

भाग २.

विवाहाचे प्रकार.

ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथाऽऽसुरः ।
गांधर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥

ब्राह्म, २ दैव, ३ आर्ष, ४ प्राजापत्य, ५ आसुर, ६ गांधर्व, ७ राक्षस, ८ पैशाच. ह्या आठ विवाहांची योग्यता अनुक्रमानें कमी कमी होत गेली आहे. प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस व पैशाच ह्या पांच जातींच्या विवाहांत प्राजापत्य, गांधर्व, व राक्षस हे साधारणपणें धर्मयुक्त होत. आसुर व पैशाच ह्या दोन विवाहांस धर्मबाह्य म्हटलें आहे. क्षत्रियांस गांधर्वविवाह उक्त आहे, तरी त्यांत राक्षस श्रेष्ठ, वैश्यांस व शूद्रांस गांधर्व, आसुर आणि पैशाच हे तीन उक्त आहेत. पहिले चार ब्राह्मणांस उक्त. उक्त म्हणण्याचें कारण, ह्या विवाहांपैकीं कोणताही विवाह घेतला, तरी पहिला खेरीज करून बाकीचे देवघेवीचे अगर परिस्थिति अनुकूळ नसली तर, कसेंतरी करून कन्या एकदाची कशीबशी उजकून टाकतां येते. ब्राह्मविवाहांत वराला घरीं आदरपूर्वक आणून वस्त्रालंकारांनीं भूषित अशी कन्या विधिपूर्वक त्याच्या स्वाधीन करावी.

यथैवात्मा तथा पुत्रः पुत्रेण दुहिता समा. मनु.

स्वतःवर जशी प्रीति करतो तशीच मुलावर, व जशी मुलावर तशीच कन्येवरही करावी.

कन्याप्येवं पालनीया शिक्षणीयात्तु यत्नतः ।
देया वराय विदुषे धनरत्न समन्विता ॥

कन्येचें पालन करावें, तिला उत्तम शिक्षण द्यावें, व विद्वान् असा वर पाहून त्याला ती सालंकृत करून द्यावी हें म्हणणें ब्राह्मविवाहांत सार्थ होऊं शकतें. अशा

ह्या विवाहित वधुवरांपासून उत्पन्न झालेला पुत्र* सदाचारसंपन्न असला तर आपल्यापासून पूर्वींचे बारा पुरुष व पुढें उत्पन्न होणारे बारा ह्यांस व स्वतः मिळून २५ व मातृकुलांतील पूर्वींचे १२ व पुढें होणारे बारा ह्यांचा उद्धार करतो. हा उद्धार व्हावा, आपल्या वंशाचें नांव निघावें, कुलाला शोभा यावी, कीर्तिमान घराणें म्हणून नांव निघावें, व आपल्या घराण्याचें नांव निघाल्याबरोबर सर्वांनीं माना डोलवाव्या, एवढ्याकरतांच सुपुत्र उत्पन्न व्हावे, हा उद्देश नजरेसमोर ठेऊन " अघोर चक्षुपति " ह्या मंत्रांतील " सुमना सुवर्चाः व वीरसूः " ह्या मोल्यवान् शब्दांकडे प्रत्येकानें लक्ष्य पुरवून योग्य प्रजा निर्माण व्हावी ह्मणून वधुवरें पूर्ण वयांत आल्यानंतर त्यांचा संबंध घडेल अशी तजवीज योजावी. वरानें स्वतः अत्र बनून ह्मणजे दुसऱ्याच्या सहाय्याची अपेक्षा न करितां स्वतःच्या बाहुबलावर आपला विवाह करून आपली संसारयात्रा सुखानें कंठावी. आपला विवाह व्हावा, व अशावेळीं दुसऱ्याचें सहाय्य मिळाल्यास आपला, आपल्या कुटुंबाचा चरितार्थ उत्तम रीतीनें चालेल, अशा भावनेनें जे विवाह होतात ते क्षत्रविवाह होत. असल्या विवाहाची इच्छा जाणत्या पुरुषांनीं कधींही करूं नये; कारण परावलंबी बनून कालाचे दिवस लोटणें हें जितकें लाजिरवाणें तेवढेंच निंद्य होय. जो स्वावलंबी होऊन आपला विवाह करून घेतो तो सिंहासारखा निर्धास्त पराक्रमी व सर्वांवर छाप बसविणारा असतो. २ यज्ञकर्मांत ऋत्विजाला कन्या अलंकृत करून देणें हा दैवविवाह, अशा स्त्रियेपासून झालेला पुत्र वरप्रमाणेंच दहा दहा पुरुष पवित्र करतो. ३ अनुष्ठान वगैरे जें करणें असेल तें कन्येसहवर्तमान करावें, असें सांगून त्याचे स्वाधीन कन्या करणें ह्यास प्राजापत्यविवाह म्हणतात. ह्या विवाहापासून झालेला पुत्र वरील प्रमाणेंच आठ आठ पुरुष पवित्र करतो. ४ वरानें वधूच्या बापाला गाय व बैल देऊन विवाह करणें ह्यांस आर्षविवाह म्हणतात. ह्या कन्येपासून झालेला पुत्र वरप्रमाणें सात सात पुरुष पवित्र करतो. ५ मी तुझी पत्नी होतें व तूं माझा पति हो असा स्त्रीपुरुषांचा परस्पर संकेत होऊन जो संबंध जडतो ह्याचें नांव गांधर्व. ६ कन्येच्या बापाला द्रव्य देऊन त्याजपासून मुलगी विकत घेणें याचें नांव आसुरविवाह. ७ कन्येकडील मंडळी

---

* आत्माऽत्मनैव जनितः पुत्र इत्युच्यते बुधैः ।—महाभारत.
आपणच आपणांस जो उत्पन्न करतो त्यास शहाणे लोक पुत्र असें म्हणतात.

निद्रिस्त अगर असावध असतां कन्येला पळवून तिच्याबरोबर विवाह करणें हा पैशाचविवाह. ८ कन्येकडील मंडळीशीं युद्ध करून कन्या पळवून तिच्याशीं विवाह करणें ह्याचें नांव राक्षसविवाह होय. ह्या आठ प्रकारच्या विवाहांत ब्राह्मविवाहाची विशेष थोरवी आहे, हें वर येऊन गेलेंच आहे. विवाहप्रकरणाचा उपसंहार करतांना मनूनें म्हटलें आहेः—

ब्राह्मादिषु विवाहेषु चतुर्ष्वेवानुपूर्वशः ।
ब्रह्मवर्चस्विनः पुत्रा जायंते शिष्टसंमताः ॥

पहिले ब्राह्म वगैरे अनुक्रमें चार विवाहांनीं जी संतती होते, ती ब्रह्मवर्चस्वी, आचारविचाराची आणि शिष्ट पुरुषांना मान देणारी होते.

भाग ३.

विवाहांतील विधि.

विवाह होण्यापूर्वी कोणकोणते व कसकसे विधि (धर्मपूर्वक वर्तन) करावे लागतात, त्यांची माहिती असणें अतिशय जरूर आहे. ही जी मी माहिती देणार आहें, ती सर्वांस सारखी पटेल असें मुळींच नाहीं. देशकालपरत्वें भिन्न भिन्न ठिकाणीं भिन्न भिन्न चाली, रीति, कुलाचार वगैरे असतात. प्रत्यक्ष भगवान् आश्वलायनालासुद्धां विवाहाचें विवरण करतांना असें सांगावें लागलें आहे कीं " अथ खलूच्चावचा जनपदधर्मा ग्रामधर्माश्च तान् विवाहे प्रतीयात् " करितां मी खालीं दिलेली माहिती एकदेशी होणार. कारण आश्वलायन गृह्यसूत्राप्रमाणें ऋग्वेदीयांचीं कर्में होतात, तींच विवाहांतील कर्में पारस्करगृह्यसूत्राप्रमाणें यजुर्वेद्यांचीं होतात. त्यांतही जनपदधर्म, देशाचार व कुलाचार हे येतातच. सारांश खालील माहिती सर्व शाखेंतील ब्राह्मणांस जुळती मिळणार नाहीं. असें जरी आहे तरी प्रथमतः ऋक्वेदीय ब्राह्मणांच्या विवाहविधींचें विवरण करून मग यजुर्वेदीयांच्या विधींची माहिती देऊं. आश्वलायन गृह्यसूत्राला अनुसरून मुख्य भागाचें विवे-

चन करण्यांत येईल व हें विवेचन करतांना कित्येक ठिकाणीं वेद मंत्र संबंध न देतां फक्त प्रतीकेंच देण्यांत आलीं आहेत, हें वाचकांनीं ध्यानांत ठेवावें.

प्रथम जोतिषानें चांगला *मुहूर्त पाहून दिला असेल, त्या मुहूर्तावर उत्तम पोशाख केलेले ब्राह्मण, शिष्टमंडळी व सुवासिनी ह्यांस वराच्या पित्यानें किंवा त्याच्या अभावीं इतरानें किंवा स्वतः वरानें कन्येच्या पित्याकडे " अनृक्षरा ऋजवः सन्तु पन्थायेभिः " हा मंत्र ह्मणून पाठवावे, त्यावेळीं त्यांजबरोबर मंगलवाद्यें असावीं. कन्येकडून उत्तम पोशाख करवून तिला पूर्वाभिमुख बसवावें. वरपक्षीयांनीं कन्येच्या हातांत नारळ व विडा द्यावा. नंतर वरपक्षाकडून गोत्रोच्चार करून झाल्यावर कन्येच्या गोत्राचा उच्चार व्हावा.

वरगोत्रं समुच्चार्य प्रपितामहपूर्वकम् ।
नाम संकीर्त्तयेद्विद्वान् कन्यायाश्चैवमेव हि ॥

त्याचा प्रकार येणें प्रमाणें—अमुक गोत्रस्यामुक प्रवरस्यामुकशर्मणः प्रपौत्राय, अमुक गोत्रस्यामुक प्रवरस्यामुकशर्मणः पौत्राय, अमुक गोत्रस्यामुक प्रवरस्यामुकशर्मणः पुत्राय असा वरपक्षाकडून व त्याचप्रमाणें प्रपौत्रीम्, पौत्रीम् व पुत्रीम् हे शब्द घालून कन्यापक्षाकडून गोत्रोच्चार व्हावा. तीन पिढ्यांचा उच्चार झाल्यावर अमुक गोत्राय अमुक प्रवराय अमुक शर्मणे †ब्राह्मणाय म्हणून अमुक गोत्राम् अमुक प्रवराम् अमुक नाम्नीमिमां कन्यां सालंकारां प्रजापतिदेवतां यथाशक्त्यलंकृतां पुराणोक्तां कन्यादान फलकामो भार्यात्वेन तुभ्यमहं संप्रददे. म्हणजे अमुक गोत्रांतील वर व अमुक गोत्रांतील माझी कन्या ही तुम्हांस तुमची भार्या म्हणून अर्पण केली आहे, असें म्हणून कुशासहित जल घेऊन कन्येचा हात वराच्या हातांत द्यावा. त्यावेळीं कन्येच्या पित्यानें

---

*उत्तरायणांत शुक्लपक्षांत अक्षतयोनि अशी कन्या पाहून तिच्याबरोबर विवाह करावा. उत्तराफाल्गुनी, हस्त, चित्रा, उत्तराषाढा श्रवण, धनिष्ठा, उत्तराभाद्रपदा, रेवती, अश्विनी, स्वाति, विशाखा, मृगशीर्ष आणि रोहिणी हीं नक्षत्रें विवाहकार्याकरितां शुभ मानिलीं आहेत. चातुर्वर्णापैकीं प्रत्येकानें आपापल्या वर्णांतील कुमारिकेबरोबर विवाह करावा. विवाहास उत्तरायण व शुक्लपक्ष हीं उत्तमच आहेत. कृष्णपक्षांत देखील विवाह होतात, तसेच दक्षिणायनांतही (मार्गशीर्ष महिन्यांत) विवाह केल्यास हरकत नाहीं.

† क्षत्रिय असल्यास वर्मा व वैश्य असल्यास गुप्त किंवा दास हे शब्द वापरावे.

ममास्याः कन्यायाः करिष्यमाण विवाहांगभूतं वाग्दानमहं करिष्ये.
ही माझी कन्या विवाहाला* योग्य झाली आहे, ही आपल्या मुलाला देतों असें वाग्दान करावें व परपक्षीयानें तिचा स्वीकार केला असें म्हणावें. आतां ही कन्या कशी आहे म्हणाल तरः—

अभ्यंगेऽपतिते क्लीबे दशदोषविवर्जिते ।
इमां कन्यां प्रदास्यामि देवाग्नि द्विजसन्निधौ ॥

हे दहा दोष येणेंप्रमाणेंः—

उन्मत्ता वृत्तिहीनाश्च तथापस्मार दूषिताः ।
दूरस्थाः कुष्ठिनो मूर्खा मोक्षमार्गानुसारिणः ॥
शूरा अवेद्या निर्वृत्ता दशदोषयुता वराः ।
तथा षंढाश्च पतिताश्चक्षुःश्रोत्र विवर्जिताः ॥
वर्जनीयाः प्रयत्नेन कन्यादाने न संशयः । संस्काररत्नमाला.

१ उन्मत्त, २ ज्यास उपजीविकेचें साधन नाहीं; ३ अपस्मार, ४ दूरवासी, ५ कुष्ठी, ६ मूर्ख, ७ मोक्षमार्गाला अनुसरणारा, ८ शूर, ९ अवेद्य (अक्षर शून्य), १० विवाहसमयीं पराङ्मुख, नपुंसक, पतित, कानडोळे नसणारा हे किंवा त्यांच्यासारखे दोष कन्यादानास वर्ज होत. हे दोष कन्येच्या तसेच वराच्या ठिकाणीं नसले पाहिजेत.

---

* एकाच आईच्या पोटीं जन्म पावलेले भाऊ अगर बहिणी ह्यांचा विवाह एकाच वर्षी करण्यांत येऊं नये, व तो केल्यास समक्रिया दोष लागतो असें सारावली ग्रंथांत सांगितलें आहे. तसेंच जेष्ठ मुलाचा जेष्ठ मुलीबरोबर जेष्ठ महिन्यांत विवाह करूं नये असें जोतिषशास्त्रांत सांगितलें आहे. गर्गाचार्यांचें असें म्हणणें आहे कीं विवाहासारखें मंगलकार्य एकाच दिवशीं व एकाच मंडपांत बहीण व भावाचें होऊं नये, पण जर यदाकदाचित् करण्याचा प्रसंग आलाच, तर दोन्हीं कार्यांच्या जागेमध्यें नदी अगर डोंगर असावा. वास्तविक सहा महिन्यांचा अवधि गेल्याशिवाय हीं कर्मे करूं नयेत.

एक मंडपे शोभन द्वयस्य प्राङ्निषिद्धत्वात्
एक गृहेपि सहशोभनस्य निषेधः ।
मंदिर वामभागे वेदी विधानाद्वेद्यास्तु मंडपमध्ये विधानाच्च
एक गृहे एक मंडपःस्यात् । प्रयोगसार.

कन्येचे दोष.

निर्गुणा शुल्क संभाषी क्रोधयुक्ता सरोगिणी।
विषयोगा वंध्ययोगा कुलविध्वंस योगका ॥
दरिद्रजारयोगाच हीनाचरण संयुता।
एतद्दोष दशैर्युक्ता तां कन्यां न प्रतिगृहेत् ॥

वराचे दोष.

आचारहीनो मूर्खश्च कुरूपो चोरजातकः ।
पाखंडीच तथोन्मत्तो गूहकः कुलदूषकः ॥
द्यूतकर्म रतश्चैव दशदोषाः प्रकीर्तितः ।
एतद्दोष प्रयुक्ताये तेषु कन्या न दीयते ॥
षंढ मूकांध बधिर काणकुब्जाश्च वामनः ।
अश्रोत्री पंगवश्चैव तेषु कन्या न दीयते ॥
श्वित्री कुष्ठी अपस्मारी कुनखी श्यामदंतकः ।
वृणयुक्तो व्याधियुक्तस्तेषु कन्या न दीयते ॥

ह्या दहा दोषांपैकीं कोणताही दोष माझ्या कन्येच्या ठिकाणीं नाहीं, करितां निर्दोष अशा माझ्या कन्येचा स्वीकार करून मला कृतकृत्य करावें. असें म्हणून वरपक्षीयाच्या पदरांस "तदस्तुमित्रा वरुणा" हा मंत्र म्हणून सुपाऱ्या बांधून त्यांस गांठ द्यावी व त्या गांठीवर गंधाक्षत* घालावें. तसेंच वरपक्षीयानें कन्यापक्षीयांच्या पदरांस हळकुंडें व सुपाऱ्या बांधून वर गंधाक्षता टाकाव्या. नंतर कन्यापित्यानें वराच्या बापास म्हणावें.

वाचादत्ता मया कन्या पुत्रार्थं स्वीकृतात्वया ।
कन्यावलोकन विधौ निश्चितस्त्वं सुखीभव ॥

ही माझी कन्या मी स्वखुशीनें तुमच्या मुलाला दिली, व तुम्हींही स्वखुशीनें हिचा स्वीकार केला. आतां ह्यांच्या विवाहाचा सुमुहूर्त साधण्यास तयार असावें. तुमचें कल्याण असो. त्यावेळीं वरपक्षीय म्हणतो कीं:—

---

* विवाहसमयीं प्रत्येक कार्याच्या आरंभीं गणपतिपूजन प्रथम करावें लागतें, करितां वारंवार त्याचा नामनिर्देश न करतां फक्त मुख्य कृत्य हेंच सांगण्यांत येईल.

वाचादत्ता त्वया कन्या पुत्रार्थं स्वीकृतामया ।
वरावलोकन विधौ निश्चितस्त्वं सुखीभव ॥

ठीक आहे. आह्मी हिचा स्वीकार केला. आतां तुह्मांला वरास पाहणें अगर विचारपूस करणें असेल तर खुशाल करावी.

एवढा विधि झाल्यावर *सीमांत पूजनाचा विधि होतो. नंतर गणपतिपूजन पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध,† ग्रहयज्ञ, मंडपप्रतिष्ठा, कुलदेवताराधन व पूजन इतकीं विवाहाचीं कर्मे करावीं. वरानें स्नानसंध्यादि कम आटपून ब्राह्मणादिकांबरोबर तसेंच इष्टमित्रांबरोबर भोजन करून नूतन वस्त्रें परिधान करून बाशिंग, ‡ व सुपुष्पांच्या मुंडावळी § बांधून वाडवडील व इष्टदेवता ह्यांस नमस्कार करून घोडा, पालखी अगर अश्वरथ ह्यांत बसून इष्टमित्र व सुवासिनी ह्यांस बरोबर घेऊन वधूगृहीं ¶जावें. तीन वर्षेपर्यंत ऋतुस्नात होत असलेली वधू चवथें वर्ष लागल्यावर रजस्वला झाली असतां स्नान करून शुद्ध झाल्यावर नानाप्रकारचे सुवासिक पदार्थ घालून तापविलेल्या जलानें तिला स्नान घालावें. आपल्या ब्रह्मचर्याची समाप्ति व सुसंतान उत्पन्न करण्याकरितां कामविलासाची उत्पत्ति व्हावी, एवढ्या करतांच वरील स्नान वधूवरांस घालण्यांत येतें. त्यावेळीं "ॐ कामवेद ते नाम मदोनामासि" हा मंत्र वधुवरांकडून म्हणविला जातो. हें स्नान कित्येक लोक आपापल्या घरींच घालतात, ह्याचें कारण वर वधूगृहीं आल्यावर विवाहमुहूर्त नजीक येत असल्याकारणानें स्नानाची खटपट अगोदरच उरकून घेण्यांत येते. वर वधूगृहीं गेल्यावर नाना तऱ्हेच्या वाद्यांचे मंजुळ ध्वनि त्याच्या कानावर जावे, सुवासिनी उदकपूर्ण कलश व आरती घेऊन समोर याव्या, व त्यांनीं

---

* कित्येक ठिकाणीं हें करीतही नाहींत.

† ह्यास अभ्युदयिक किंवा वृद्धिश्राद्ध असेंही म्हणतात. आपल्या वाडवडिलांचें स्मरण करून त्यांचा सन्मान करून त्यांचा आशीर्वाद घेणें हा ह्या श्राद्धाचा उद्देश असतो ह्या श्राद्धप्रसंगीं सव्यापसव्य नसतें. ह्यांत दर्भाबद्दल दुर्वा व स्वधाबद्दल स्वाहा उच्चारतात.

‡ कित्येक ठिकाणी हें बांधीत नाहींत. हा देशाचार आहे.

§ मुंड-डोकें व आवलि-सर=मुंडावली. कित्येक ठिकाणीं मुंडावळीच बांधतात.

¶ वधूकडे जातेवेळीं उदकपूर्ण कलश, कुमारिका, अक्षत दीप (हा दीप वरमातेनें किंवा तिच्या अभावीं इतर मानकरी स्त्रीनें न्यावयाचा असतो) वाद्य वगैरे सामुग्री बरोबर असावी.

वरास आरती करावी. नंतर वरास कन्येच्या पित्यानें *मंडपांत नेऊन हिरवे दर्भ पसरले आहेत अशा भद्रासनावर पूर्वाभिमुख बसवावें व त्याचा †मधुपर्कादिकें करून सत्कार करावा. त्यावेळीं—

---

*वर मंडपद्वारीं आल्यावर त्यास रथांतून, पालखींतून, गाडींतून, अगर घोड्यावरून उतरविण्यापूर्वी कित्येक ठिकाणीं वधूच्या बंधूनें त्याच्या कानास हात लावून कान पिळ-ल्यासारखें केलें कीं त्याबद्दल वरपक्षीयाकडून त्यास अहेर होतो. कान पिळण्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, वर हा राजा म्हणून समजला जातो; म्हणजे वरास वरराजा म्हण-तात. राजा गादीवर बसण्यापूर्वी त्यास गुरुकडून उपदेश होत असे. परंतु हा वरराजा राज्यरहित ह्यास गुरूकडून उपदेशाचें कारण नाहीं. उपदेशाचा भाग बाजूला राहून त्याच्या जागीं ह्या राजाचा कान पिळण्याची वहिवाट पडली असावी. सूत्रांत ह्याचा उल्लेख नाहीं. हा देशाचार अगर रुढि होय.

† दधि सर्पिर्जलं क्षौद्रं सितैताभिस्तु पंचभिः ।
प्रोच्यते मधुपर्कस्तु सर्व देवौघ तुष्टये ॥

सर्पि=तूप, क्षौद्रं=मध, सिता=साखर.

जलंतु सर्वतः स्वल्पं सितादधि घृतं समं ।
सर्वेषामधिकं क्षौद्रं मधुपर्के प्रयोजयेत् ॥

मधुना पर्कः (योग, संयोग) यस्मिन्नराः (आलेल्या प्रवाशाला-वराला) मधुदान देणें, वैद्यशास्त्राच्या दृष्टीनें गुणकारक आहे. शरीरांतल्या नाड्यांत शक्ति आणणें, श्रम घालविणें, मेदच्छेद करणें वगैरे गुण मधांत आहेत. ह्या लक्षणांत जल घ्यावयास सांगितलें आहे. कित्येक जलाच्या ऐवजीं दूध घ्यावयास सांगतात. कित्येकांच्या मतें दह्यांत तूप किंवा मध मिळवावा. मधुपर्काचें प्रमाण १२ तोळे दह्यांत ४ तोळे मध किंवा ४ तोळे तूप मिळवून तो कांसपात्रांत तयार करावा.

स्नातकायोपस्थिताय, राज्ञे च, आचार्यश्वशुरपितृव्य मातुलानां च ।

आश्वलायन गृह्यसूत्र.

मधुपर्क हा घरीं आलेला स्नातक (वेदविद्या व व्रतें पुरी करून आलेला कन्यार्थी वर) राजा, सासरा, चुलता व मामा इतक्यांचा करावा.

षडर्घ्या भवन्त्याचार्य्यऽऋत्विग्वैवाह्यो राजा प्रियः स्नातक इति—पारस्कर.
वेद शिकविणारा, यज्ञांत दक्षिणा घेऊन काम करणारा, विवाहसमयीं वर, राज्याभिषेक

कन्यार्थिने गृहागतायास्मै स्नातकाय वराय कन्या-दानांगभूतं मधुपर्कं करिष्ये ।

असा संकल्प करावा. ज्योतिषानें घटीयंत्राची पूजा करून पत्रिका पूजन करावें. मधुपर्कानें पूजा करण्याकरितां स्वच्छ उदकानें भरलेलें असें भांडें, एक *कांसपात्र,

ज्याला झाला आहे असा राजा, मित्र, समावर्तन समाप्त झालेला ब्रह्मचारी इतक्यांचा मधुपर्कादिकेंकरून सत्कार करावा. आर्यांशिवाय इतर लोकांत हस्तांदोलन किंवा हस्तचुंबन करून मधुपर्क करण्यांत येतो.

ह्या मानकरी लोकांस सूत्रकारानीं "अर्घ्य" असें म्हटलें आहे. कित्येक मधुपर्काचे वेळेस मांस असावें असें प्रतिपादन करतात, व त्यास "नामांसो मधुपर्को भवति" म्हणजे मांसावांचून मधुपर्क होत नाहीं, असें प्रमाण पुढें मांडतात. "नामांसो मधुपर्को भवति" ह्या वाक्यांत "उभौ नञौ प्रकृत्यर्थं गमयतः" म्हणजे दोन नकार प्रकृत्यर्थ दाखवितात. ह्या नियमाप्रमाणें प्रकृत्यर्थरूप मांस (स्मृतींत मांस हें होमद्रव्य सांगितलें आहे) त्याचा मधुपर्क करावा हें घडतच नाहीं, कारण मधुपर्क म्हणजे दहीं व मध किंवा दहीं, दुध व मध ह्यांचें मिश्रण करणें होय. "नामांसो मधुपर्को भवति" ह्या वाक्यात जो नकार आहे, तो लौकिक संस्कृतांत निषेधार्थ वाचक होय, पण तोच नकार वैदिक व्याकरणांत उपमा देण्याकडे योजतात, जसें "श्येनोना तरत्" ह्यांचा अर्थ श्येनपक्षाप्रमाणें तरला असा न करतां श्येन पक्षी तरला नाहीं असा केल्यास चूक होईल. त्याचप्रमाणें येथें सुद्धां नकाराचा उपमारूप अर्थ होत असल्याकारणानें मांसरहित मधुपर्क करावा असेंच सिद्ध होतें. मधुपर्कास इतर पदार्थ उपयोगाचे नाहींत, तर रसच पाहिजे. मध हा फुलांचा रस, घृत हें गवताचा रस, गाय चारा खाते, त्याच्यापासून दूध उत्पन्न होतें. तें दूध आंबत घातलें कीं त्याचा विकार दहीं होतें, दह्यापासून तूप होतें, म्हणजे मधुपर्क हा प्रत्येक वस्तुचा तृतीय परिणाम होय.

शुक्रः शुशुक्कां उषो न जारः प्रपा समीचिदिवो न ज्योतीः । ऋग्वेद.

ह्या मंत्रांत तसेंच—**गावो न गव्यूतीरनु** । ह्या दोन्हीं जागीं नकार उपमा दाखवितो.

* कांसपात्र देण्याचें कारण महर्षि व्यास असें देतात कीं, कांसपात्रांत भोजन केलें असतां भोजन करणाराचें आयुष्य, बुद्धि व बल हीं वृद्धिगत होतात.

सौवर्णे राजते कांस्ये पद्मपालाशपत्रयोः ।
भाजने भोजने चैव त्रिरात्रफलमश्नुते ॥ पैठीनसि.

सुवर्णाचे, रुप्याचे व कांसपात्रांत, त्याचप्रमाणें केळीचे व पळसाचे पानावर भोजन केलें तर एक चतुर्थांश प्राजापत्य व्रताचें फळ मिळतें. दुसरें कारण समजून अगर न समजून

धेनु व *विष्टर इतकें साहित्य घेऊन सहधर्मचारिणीसहित त्यानें वरापुढें बसावें. नंतर मधुपर्कानें वराची पूजा करून " विष्टरो विष्टरो विष्टरः प्रतिगृह्यताम् " असें म्हणून तो दर्भ वराच्या हातांत द्यावा, व त्यानें तो घेतेवेळीं " प्रतिगृण्हामि " ह्मणावें. नंतर वरानें " ॐ अहं वर्ष्मसजातानां †विद्युतामिवसूर्यः " हा मंत्र ह्मणून विष्टराचीं अग्रें उत्तरेस धरून त्यावर बसावें. कन्येच्या पित्यानें पाण्याचें पात्र हातांत घेऊन " पाद्यं पाद्यं पाद्यं " असें तिनदां म्हणून तें आपल्या पत्नीच्या स्वाधीन करून तिच्याकडून तें वराच्या पायावर घालवावें. आपण अगोदर वराचा उजवा व नंतर डावा पाय धुवावे. पाद्यानंतर " अर्घ्यं अर्घ्यं अर्घ्यं " "आचमनीयं, आचमनीयं, आचमनीयं," म्हणून वराच्या हातावर उदक घालावें, व त्यानें त्यांतील थोडें उदक आपल्या हातावर घेऊन " अमृतोपस्तरणमसि " हा मंत्र ह्मणून प्राशन करावें, व दुसऱ्या शुद्ध जलानें आचमन करावें. नंतर कन्येच्या पित्यानें वराला अर्पण करण्याकारितां ‡मधुपर्काचें पात्र आपल्या हातीं घ्यावें व तें

घडलेलीं पातकें कांसपात्राच्या दानानें नाहींशीं होतात. तिसरें कारण ह्या पात्राचा आवाज इतर धातुच्या पात्रापेक्षां मोठा होतो, तो ऐकून भूत पिशाचादि पीडा करणारे पळून जातात. हल्लीं सुद्धां सरकारास थाळी पिटणें झालें तर ती काशाचीच असली पाहिजे. कांसपात्राशिवाय इतर धातुचें पात्र घेऊन थाळी पिटली तर ती जमेस न धरतां बेकायदे-शीर होते.

* २५ दर्भ घेऊन त्यांचे शेंडे वर करून त्यास दुसऱ्या दर्भांनीं डावीकडून फेरे देऊन त्यांची जुडी बांधावी, किंवा दर्भाच्या शेंड्याची वेणी घालून शेंड्याशीं गांठ द्यावी, ह्मणजे तो विष्टर झाला. ५० दर्भ घेऊन त्यांचे शेंडे वर करून त्यास दुसऱ्या दर्भाच्या उजवेकडून फेरे दिले म्हणजे तो ब्रह्मा झाला.

† मंत्राचा अर्थ असा आहे कीं, ज्याप्रमाणें सूर्य सजातीय तेजोगोलांना आपल्या प्रकाशानें लोपून टाकतो, त्याप्रमाणें हा विष्टर आहे, असें समजून त्यास पायाखालीं घालून त्यावर मी बसतों. कुश, काश व दर्भ असे दर्भाचे तीन भेद आहेत. अरत्निमात्रं कौशेय रज्जु असें भर्तृयज्ञ, त्रिवृत्त प्रादेशमात्र कुश घ्यावा असें रेणु व पंचदर्भाचा घ्यावा असें हरिहराचें ह्मणणें आहे.

‡ विष्टरो विष्टरो किंवा मधुपर्को–वगैरे जें तीनदां म्हणलें जातें ह्याचा उद्देश असा आहे कीं, आदरार्थें द्विरुक्ति किंवा त्रिरुक्ति करण्याचा परिपाठ आहे. आपल्या जिव्हाळ्याचा पाहुणा आला कीं आपण त्याला यावं यावं यावं असें तिनदां म्हणतों, तेणेंकरून

कन्येच्या पित्याच्या हातांत असतांना वरानें " मित्रस्यत्वा चक्षुषा प्रतीक्षे " हा मंत्र ह्मणून मधुपर्क पाहावा. मध्यें आणखी ह्या संबंधाचेच मंत्र आहेत ते ह्मणून झाल्यावर "विराजोदोहोसि" हा मंत्र म्हणून मधुपर्क प्राशन करावा व शुद्ध जलानें आचमन करावें. मधुपर्काचें प्राशन वरानें केल्यावर कन्या पित्यानें " गौं गौं गौं " म्हणून एक गाय वरास निवेदन करावी व वरानें—

***माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसादित्यानाममृतस्य नाभिः।**
प्रनुवोचं चिकितुषेजनायमागामनागामदितिं वधिष्ट ॥

यणाऱ्याच्या जिवाला त्याचप्रमाणें आपणांसही त्याचा आदर ठेवला म्हणून समाधान वाटतें. अध्यात्म दृष्टीनें पाहूं गेलें तर असें आढळून येईल कीं हें जग तीन पदार्थांनीं भूषित आहे, व ते तीन पदार्थ ईश्वर, जीव व प्रकृति हे होत. ह्या तीन पदार्थांस जाणल्यानें मनुष्यास परम सुख प्राप्त होतें. आपल्याकडे पाहुणा आला कीं त्यास जेणेंकरून सुख प्राप्त होईल, तो प्रसन्नचित्त राहील असे उपाय आपण नेहमीं योजित असतों.

* मंत्राचा अर्थ असा आहे कीं, ही गाय रुद्रांची माता, वसुंची कन्या, आदित्यांची भगिनी व अमृताचें नाभिस्थान असून जिचें दूध यज्ञद्वारानें सर्व देवांस मिळतें, ती ही धेनु अदितींसारखी सर्व देवांची माता आहे. यज्ञाला मुख्य साधन हीच, व हिच्याचयोगें अमृतत्व प्राप्त होतें, म्हणून तूं जो शहाणा, त्या तुला मी असें सांगतों कीं, तूं हिला सोड. विवाहप्रसंगीं धेनुदान करणें हें उक्तच आहे. पण सर्वच धेनुदान करण्यास समर्थ नसतात. अशा वेळीं धेनुदान करण्यास सांगून मग तूं हिचा वध करूं नकोस म्हणून सांगण्याचा हेतु काय? हेतु इतकाच कीं, तूं आपल्या गाईचा (वाणीचा) वध करूं नकोस. ह्यावरून असें दर्शविलें कीं, " वाचाह स्म वै पूर्व उपयन्ति " आपलें उपनयन झालें नसल्यास अगर आपल्या हातून दोष घडल्यास प्रत्यक्ष उपनयन न करतां तें वाणीच्यायोगें करीत. उपनयन झालें कीं ब्रह्मचर्य आलेंच. उपनयनाचे प्रसंगीं व त्यानंतर सत्यभाषण करण्याचा उपदेश गुरु करीत असतात. " सत्यं वद " हें तर सांगतच, पण आणखी " यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि " " यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि " असाही उपदेश करीत. ह्या उपदेशाप्रमाणें छात्रवर्ग वागत असतांना यदाकदाचित् अभद्र भाषणाचा प्रसंग येऊन तें केलें असल्यास तें सोडून देण्याची आज्ञा करीत. उपनयनानंतर गुरुगृहीं वास करून स्नातक होऊन विवाहाला उद्युक्त झालास, करितां गुरुगृहीं ज्या सत्य भाषणाचें अवलंबन केलें होतेंस, तेंच ह्यापुढें ठेऊन अभद्रादि भाषणानें वाणीला सतावूं नकोस, किंवा ही जी कन्यारूपी धेनु तुझ्या स्वाधीन केली आहे, तिचा छलादिकें-

"ॐ उत्सृजत" हा मंत्र म्हणून गाईस सोड म्हणून सांगावें. कन्यापित्यानें वरास वस्त्रादिकेंकरून भूषित करावें व कन्येकडून गौरीहराची पूजा करवावी. मधुपर्कानें वराची पूजा झाल्यावर कन्यापित्यानें अगर त्याच्या उपाध्यायानें वधूवरांस निरनिराळ्या तांदुळांचे* राशीवर उभें करून शेल्याच्या मध्यभागीं कुंकुमानें दोन्हीं

करून वध करूं नकोस. वाणीचा व धेनूचा संबंध काय? तर शास्त्रकार "वाचं धेनुमुपासीत" म्हणजे वाणीला गाईची उपमा देतात. गाईला चार स्तन असतात, तसे वाणीलाही १ स्वाहाकार, २ वषट्कार, ३ स्वधाकार व ४ हंतकार (किंवा परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी) असे चार स्तन आहेत. ह्या गाईच्या दुधानें म्हणजे अमृततुल्य वाणीनें देव, पितर, अग्नि वगैरे संतुष्ट होतात, अशा अमृततुल्य वाणीचा अद्वातद्वा बोलून वध करूं नकोस, तर मितभाषणीं होऊन सत्याचें अवलंबन कर. सत्य भाषणांत जो जोर असतो, जी शक्ति असते व जें तेज असतें तें अतिवादी मनुष्याच्या वाणींत न राहतां ती ढिली पडते. एका वाणीला खराब केल्यानें इतर सर्व इंद्रियें खराब होतात. भगवान् म्हणतातः—

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥

आपल्या भाषणापासून कोणाला उद्वेग होणार नाहीं, असें सत्य, प्रिय आणि हितकर वाक्य, स्वाध्यायाचा अभ्यास ह्यांस वाङ्म म्हणतात. वाङ्मय हा वाणीचा रस आहे, सारांश वाणीला भ्रष्ट न करणें म्हणजे तिचा वध न करणें होय.

स्वर्गेषु पशुवाग्वज्र दिङ्नेत्र घृणि भूजले ।
लक्ष्य दृष्ट्या स्त्रियां पुंसि गौर्लिंगं चिन्हशेफसोः ॥ अमर.

अशीं गो शब्दाला अनेक नांवें आहेत. प्रस्तुत प्रसंगीं वरील हेतुच बरोबर रीतीनें लागू पडतो व हाच मुख्य हेतु असावा.

* तांदुळाचे राशीवर उभें राहिल्यावर वधुवरांनीं आपल्या मनांत कुलस्वामिणीचें स्मरण करीत व अंतःपटावरील स्वस्तिकाकडे 卐 एकाग्र दृष्टीनें पाहत निश्चल उभें राहावें. ह्या प्रसंगीं स्त्रियांनीं उक्त समयास अनुसरून गाणीं म्हणावीं. तांदुळाचे अगर गव्हाचे राशीवर वधुवरांस उभें करण्याचें कारण हे दोन्ही पदार्थ मंगल असून भरण पोषणास उपयोगी आहेत, व हा पिंडही त्याजपासून पोसला जातो. स्वस्तिक हें ॐकार रूप असल्याकारणानें त्याजकडे लक्ष देणें म्हणजे त्याचें चिंतन करणें होय.

बाजूस स्वस्तिकें काढिलीं आहेत असा अंतपट* दोन्ही राशींच्यामध्यें पूर्वेकडील राशीवर पश्चिमाभिमुख वरानें व पश्चिमेकडील राशीवर वधूनें पूर्वाभिमुख उभें राहावें. उत्तरेस दशा करून अंतःपट धरावा. मंगल समयाला अनुसरून † मंगलाष्टकें म्हणावीं. मंगलाष्टकें म्हणून झाल्यावर ॐ प्रतिष्ट म्हणून अंतःपट

---

* विवाहांत अंतःपट बाजूला करून परस्पर निरीक्षण करावयाचें असल्याकारणानें हें मुख्य कृत्य असून त्यास सुमुहूर्त लागतो. उपनयनांत जसा गायत्रीमंत्र मुख्य तसेंच विवाहांत पाणिग्रहण मुख्य होय. पाणिग्रहण हें जरी मुख्य असलें तरी कन्यादान, लाजाहोम व सप्तपदी हे विधि झाल्यावांचून विवाहसांगता होत नाहीं. अंतर=मध्य+पट=वस्त्र, अंतःपट. हा एकमेकांनीं पाहण्यास अजून अवधि आहे, हें दाखविण्याकरितां विवाहप्रसंगीं वधू व वर ह्यांच्यामध्यें धरला जातो. वास्तविक दुसऱ्याची कन्या जिचा आपला कधींहि संबंध नसतो, अशा कन्येचा व आपला संबंध जडतो, जी आपल्या सुखदुःखाला भागीदार होते, तिचा व आपला पूर्वजन्मीचा कांहींतरी स्नेहसंबंध असला पाहिजे. तो त्यांचा संबंध (अबोधपूर्व) घडून येतो, त्यांची एकमेकांस आठवण नसते इतकेंच. त्यांचा पूर्वजन्मीचा संबंध नसेल तर हा योग घडून येणार नाहीं. पति पत्नी संबंधानें एकजीव होऊन तीं ह्या जन्मीं परस्परांस बांधून घेऊन पूर्वजन्मीची मैत्री कायम ठेवतात. ती मैत्री कायम रहावी म्हणून वाक्‌निश्चय करून जशी पोस्टांतून एकाद्या गृहस्थाची मोहराची पिशवी विमा उतरून आली असतां ती साधारण शिपायाबरोबर न पाठवितां एकाद्या जबाबदार मनुष्याबरोबर सरकार साक्षी मुद्रासह ती ज्याची त्याच्या स्वाधीन करतो, त्याच प्रमाणें अर्यमा, सविता, अग्नि व शिष्टजन ह्यांच्या समक्ष कन्येला तिच्या पतिच्या स्वाधीन करण्यांत येतें. करितां देवाचें प्रिय आचरण करणारानें ती साध्वी असें मानून तिचें नित्य अन्नोदकानें परिपालन करावें.

† मंगलाष्टकें म्हणत असतां प्रत्येक मंगलाष्टकाचे शेवटीं सावधान म्हणून म्हणण्यांत येतें. ह्या म्हणण्याचा इत्यर्थ इतकाच कीं, अहो वधुवरहो, तुम्ही विवाहाला उद्युक्त झालां आहां, परंतु सावध असा, हा संसार फार कष्टमय आहे, ह्यांत अनेक तऱ्हेचीं संकटें प्राप्त होतात, त्यांस सहन करावें लागेल, करितां तुम्ही उभयतां सावध रहा. ह्याच अर्थाचे सूचक स्त्रियांच्या गळ्यांत कारल्यासारख्या आकाराचा सुवर्णाचा दागिना घालण्यांत येतो. तोही हेंच सुचवितो कीं, हा संसार कारल्यासारखा कटु आहे; करितां ह्या कटु संसाराची वारंवार आठवण ठेऊन तो तरून जाण्याचा मार्ग ह्यांतूनच काढला पाहिजे. करितां पति हाच तुझा देव, ह्याची मनोभावें सेवा करून तुम्ही उभयतांनीं संसार तरून जावें. मंगलाष्टकें म्हटलीं जातात, त्यावेळीं कुलदेवता, ग्रामदेवता, वसिष्ठ अरुंधतीचें वगैरे स्मरण वधुवरांकडून करविण्यांत येतें.

काढून घ्यावा. वधूनें वराचे गळ्यांत पुष्पमाला घालावी व आपापलीं आसनें बदलावीं. आसन बदलतेवेळेस वधुवरांनीं आपल्या हातांतील तांदूळ, गूळ व जिरें हीं एकमेकांच्या मस्तकावर घालावीं. विवाहानंतर कन्येच्या पित्यानें वधुवरांच्या दक्षिणेस पत्नीसहित उत्तराभिमुख बसून आचमन व देशकालाचें स्मरण करून दर्भ, अक्षता व पाणी हातांत घेऊन " मम समस्त पितृणां " हा मंत्र " कन्यादानमहं करिष्ये " पर्यंत म्हणून कन्यादानास बसावें. कन्यादान करतेवेळीं कन्यापित्याचा उद्धार होतोच, पण तो स्वतःच्याच उद्धाराचा विचार न करतां आपल्या समस्त पितरांचा उद्धार व्हावा ही इच्छा धरून कन्यादान करतो.

विश्वंभरः सर्वभूताः साक्षिण्यः सर्व देवताः ।
इमां कन्यां प्रदास्यामि पितृणां तारणायच ॥

सर्व चराचर जगास व्यापून राहणारा असा परमेश्वर पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें, सर्व देवता ह्या सर्वांस साक्ष ठेवून ह्या सर्वांच्या समक्ष पितरांच्या उद्धाराकरितां ही कन्या तुला देतों.

कन्यादान करण्यांत " कन्या तारयतु " हा मंत्र म्हणून कन्येच्या दानानें मला पुण्य मिळो, माझीं पापें नाहींशीं होवोत, हा पूज्य हेतु असतोच. " कामः कामायऽदात्, कामोदाता, कामः प्रतिग्रहीता " वगैरे वचनें हेंच दाखवितात कीं आपण कृतकृत्य व्हावें; इष्टसिद्धि प्राप्त व्हावी, हा ह्या दानांत मुख्य हेतु असतो. आपणांस इच्छित प्राप्त व्हावें, ह्या इच्छेनेंच मनुष्य सर्व कामें करीत असतो. आपणास पुत्रपौत्रादि प्राप्त व्हावे, ह्या इच्छेनें वरही कन्या स्वीकारण्यास उत्सुक असतो. श्रुतींतसुद्धां असें वर्णन आहे कीं " सोऽकामयत । बहुस्यां प्रजायेयेति । " प्रजापतीला सृष्टि निर्माण करण्याची इच्छा झाली, तेव्हां कोठें ती त्यानें निर्माण केली, तशीच कन्यादानानें आपली इच्छा तृप्त व्हावी म्हणून मातापितरें कन्येचें दान करितात, व वर तिचा स्वीकार करतो, शिवाय एक कन्यादान करणें म्हणजे पृथ्वीदान करणें अशीही पूर्वीपासून समजूत आहे. ह्या माझ्या कन्यादानाच्या योगें ब्रह्मदेव (प्रजापति) तृप्त होवो, असें म्हणून आपण विष्णुस्वरूपी असून लक्ष्मीस्वरूपी ही माझी कन्या हिचा स्वीकार करावा, म्हणून कन्यापित्यानें वराची प्रार्थना करावी. वरानें " ॐ स्वति " म्हणून हिचा

स्वीकार केला असें सुचवावें. ह्या प्रसंगीं कन्येच्या संबंधी बरेच मंत्र आहेत. कन्येच्या पित्यानें " धर्मेच, अर्थेच, कामेच नाति चरितव्या त्वयेयं " धर्म, अर्थ व काम हे तिन्हीं पुरुषार्थ तुम्हीं उभयतांनीं साधावे, म्हणून ही *कन्या तुम्हांस दिली आहे, तर त्याचें उल्लंघन करूं नये, असें वरास सांगावें, व वरानें " नाति चरामि" नाहीं, मी त्यांचें उल्लंघन करणार नाहीं म्हणून म्हणावें. विवाहसमयीं सोनें, रुपें, तांबें, पितळ वगैरे धातूंचीं भांडीं कन्येला देण्याची वहिवाट आहे. त्यांत कांसपात्र मुख्य असतें, इतर भांडीं न दिलीं तरी चालतील पण कांसपात्र हें दिलेंच पाहिजे. कन्यादानानंतर वधुवरांला समोरासमोर बसवून उदकांत सुवर्णद्रव्य घालून त्या उदकानें मंत्रपूर्वक त्यांस अभिषेक करावा. (ह्या कृत्यास सुवर्णाभिषेक म्हणतात.)

वरील विधि झाल्यावर सूत्रावेष्टन† होतें. दुहेरी कच्चें पांढरें सूत दुधांत भिजवून वधुवरांस समोरासमोर बसवून त्यांच्या कंठास व कटीस चार किंवा पांच वेळ त्याचें वेष्टन करावें. त्यावेळीं " ॐ परित्वागिर्वणो " इत्यादि मंत्र म्हणून वेष्टन झाल्यावर कंठाचें सूत खालीं जमिनीवर ठेवून कटीचें सूत्र वरून काढावें आणि वधुवरांस उठवून जमिनीवरील सूत्र उचलावें, व त्यास कुंकुम लावून पीळ

---

* कन्यादानाचा अधिकार—

पिता पितामहो भ्राता सकुल्यो जननी तथा ।
कन्याप्रदः पूर्वनाशे प्रकृतिस्थः परः परः ॥ याज्ञवल्क्य.

कन्येचा पिता, आजा, भाऊ तिच्याच कुलांतील म्हणजे चुलता, भाऊ माता वगैरे ह्यांपैकीं अनुक्रमें जे विद्यमान असतील, व ज्यांची मानसिक स्थिति चांगली आहे अशांसच कन्यादानाचा अधिकार आहे.

सकृत्प्रदीयते कन्या हरस्तां चोरदण्ड भाक् ।
दत्तामपि हरेत् पूर्वाछ्रेयांश्चेद्वर आव्रजेत् ॥ याज्ञवल्क्य.

कन्यादान एकच वेळ होतें. कन्यादान करून मग कन्येला सासरीं न पाठविणारा पिता चोर होय व त्याला योग्य दंड झालाच पाहिजे. ज्याच्याबरोबर वाग्दान झालें आहे, त्याच्याहीपेक्षां अन्य श्रेष्ठ वर मिळाल्यास कन्या प्रथम वराला न दिली तरी चालेल.

† कच्च्या सुताचें वेष्टन असें दाखवितें कीं, आतां तुम्हीं परस्पर कच्च्या सुतानें बांधले गेले आहां, आतां तुम्हांस परस्परापासून निराळें होतां येणार नाहीं.

घालून त्याला हळकुंड व ऊर्णा हीं बांधून तें वरानें वधूच्या डाव्य मनगटास ॐ *नीललोहितं भवतिकृत्या सक्तिर्व्यज्यते " म्हणून बांधावें, तसेंच कटीचें सूत्र वर सांगितल्याप्रमाणें करून वधूनें वराच्या वरील मंत्रानें उजव्या मनगटास बांधावें. †अक्षतारोपणाचा विधि झाल्यानंतर वरपक्षीय सुवासिनींनीं वधूवरांस पूर्वाभिमुख बसवून ‡अष्टपुत्री नांवाचीं दोन उत्तम वस्त्रें, चोळी व मंगळसूत्र हीं कन्येस द्यावीं. एक वस्त्र कन्येकडून नेसवावें व दुसरें तिच्या अंगावर द्यावें. वरानें §मंगळसूत्र वधूच्या गळयांत बांधावें. तें बांधतांना—

मांगल्य तंतुनानेन ममजीवन हेतुना ।
कंठे बध्नामि सुभगे स जीव शरदांशतम् ॥

---

* मंत्राचा अर्थ असा आहे कीं, अभिचाराभिमानी देवता कृत्या नीलवर्ण व रक्तवर्ण अशी आहे, अशी ही कृत्या वधूवरांच्या शरीरांत वास करते. तिला ह्या कंकणाच्या योगें घालवून दिलें पाहिजे, व त्यायोगें वधूच्या स्वजनांची वाढ होऊन पति संसारबन्ध होतो.

† वरानें वधूच्या अंजलींत एकत्र केलेलें दूध व तूप दोन वेळां थोडथोडें घालून त्यावर थोडेसे तांदूळ घालावे, आणि फिरून त्या तांदुळावर दोनदां किंचित् दूध व तूप ओतून तिचा अंजलि तसाच राहूं द्यावयाचा. हिच क्रिया कन्येच्या पित्यानें किंवा इतरानें वराच्या अंजलिमध्यें करावी. नंतर उभयतांच्या अंजलींतील तांदुळावर सुवर्ण ठेऊन वधूचा अंजलि वराच्या अंजलीवर ठेवावा, व "कन्यातारयतु" इत्यादि मंत्र म्हणावे. मग कन्येस उठवून तिच्याकडून " भगो मे कामः समृध्यताम् " ह्या मंत्रानें अंजलींतील अक्षता वराच्या मस्तकावर घालवाव्या. वराकडून त्याच्या अक्षता " यशो मे कामः समृध्यताम् " ह्या मंत्रानें वधूच्या मस्तकावर घालवाव्या. ह्याप्रमाणें आणखी दोन वेळ वधूवरांचे अंजलि तयार करवून त्यांतील अक्षता वधूच्या मस्तकावर अनुक्रमें "श्रियो मे कामः समृध्यताम् " व " प्रजामे कामः समृध्यताम् " ह्या मंत्रांनीं व वराकडून वधूच्या मस्तकावर अनुक्रमें " धर्मोमे कामः समृध्यताम् " "यशोमे कामः समृध्यताम् " असें ह्मणून घालविण्यांत येतात.

‡ एक पिवळें केलेलें वस्त्र कासोटा न घालतां परकराप्रमाणें परिधान करावयाचें असतें त्यांस पटवस्त्र किंवा अष्टपुत्री असें म्हणतात.

§ कित्येक ठिकाणीं मंगळसूत्र हें वधूच्या गळ्यांत विश्वयोषितेकडून बांधविलें जातें. ह्याचें कारण तिच्या सौभाग्याला जशी वाण नाहीं, तशीच वधूच्याही सौभाग्याला नसावी. भर्तृजीवन हेतुना असाही पाठ आहे.

हा मंत्र म्हणावा–मंत्रार्थ–हे सुभगे, माझ्या जीवनाला कारण असें हें मंगलसूत्र मी तुझ्या गळ्यांत बांधतों. माझ्याबरोबर शंभर वर्षेपर्यंत सुखानें वास कर.

आणखी थोडासा विधि झाल्यावर मग विवाहहोम करण्याकरितां मंडपांतील *वेदीवर उत्तराभिमुख होऊन यावें. वेदीजवळ गेल्यावर वरानें आपण वेदीवर चढून तिच्यावरील आसनावर पूर्वाभिमुख बसावें, व वधूला वेदीच्या पश्चिमेकडून यावयास सांगून वेदीच्या उत्तरेकडून वर चढवून आपल्या उजव्या हातास बसवावें. वेदीवर आल्यावर वधूनें मौनव्रत धारण करावें. वरानें दोन वेळ आचमन करून प्राणायाम करावा; आणि स्विकारलेल्या ह्या वधूस भार्यात्व प्राप्त व्हावें व गृह्याग्नि सिद्ध व्हावा, ह्याकरितां विवाहहोम करतों, व त्यासाठीं स्थंडिललेपनादि सर्व कर्मे करतों, असा संकल्प करून अग्निध्यानापर्यंतचें सर्व कर्म करावें. स्थंडिलाच्या पश्चिमेस एक लहान व एक मोठा असे दोन दगड (पाटा वरवंटा) ठेवावे. वरानें दोन समिधा हातांत घेऊन देशकालाचा उच्चार करून †अन्वाधानाचा संकल्प ‡आधारांत करून तीन अग्नि, पवमान, एक वेळ

---

* वेदी ही कन्येच्या पांच किंवा सात हात लांब असावी. कन्या वाढीनें उंच असली तर चार किंवा पांच हाताचें प्रमाण धरावें. कोपरापासून करंगुलीच्या टोंकापर्यंतची जी लांबी तिला अरत्नि असें म्हणतात. वेदी ही घराच्या वामभागीं असावी. वेदीच्या पश्चिमेस पांच पायऱ्याची प्रभावळ (अस्र) व पूर्वेस एक वीत पायरी असावी. कित्येक ठिकाणीं बोहल्याच्या चाऱ्ही कोपऱ्यावर रंगविलेली व चित्रविचित्र वेलबुट्टी काढलेली मृण्मय पात्रें ठेवण्याची चाल आहे. मृण्मयपात्रें ठेवणें हा देशाचार आहे, ह्यास शास्त्राधार नाहीं.

अग्नीला संस्कृतांत बहुल म्हणतात. बहुलासहित बसावयाची जी वेदिका तिला मराठींत बहुलें किंवा बोहलें (मध्यदेह) असें म्हणतात. वेदी ही वैश्वानराची छाती आहे, म्हणजे यज्ञासाठीं केलेला ओटा आहे. "उर एव वेदि" केस हे दर्भ आहेत व हृदय हें गार्हपत्य नांवाचा अग्नि आहे असें श्रुति सांगते.

वेदी हें स्थान एक हात उंच असतें. तेव्हां अर्थातच सर्व जमलेल्या मंडळीचें लक्ष सहजगत्या वधुवरांकडेस जातें. हल्लींसुद्धां सभेंतील अध्यक्षाचें स्थान उंच जागीं असतें.

† ज्या देवतांच्या पुढें होम करावयाचा त्यांचा नामनिर्देश करून समस्त व्याहृतीनीं प्रजापतीला उद्देशून २ किंवा ३ समिधा अग्नीवर देणें त्याला अन्वाधान व मुष्टीनें स्थंडिलावर पाणी शिंपडणें त्याला अभ्युक्षण म्हणतात.

‡ आधार म्हणजे वायव्य कोणापासून आग्नेय कोणापर्यंत व नैऋत्य कोणापासून ईशान्य कोणापर्यंत तुपाची धार देतात ती.

अग्नि व प्रजापति ह्या देवतांसाठीं आज्यानें व अर्यमाग्नि, वरुणाग्नि, आणि प्रजापति ह्या देवतांकरितां लाह्यांनीं व शेषानें स्विष्टकृत अग्नि इत्यादि देवतांच्या शांत्यर्थ होम करावा. स्थंडिलाचे उत्तरेस लाह्यांचें सूप ठेवावें. आज्याधिश्रयणापर्यंत सर्व कर्म झाल्यावर लाजसहित आज्याला तीनवेळ पर्यग्निकरण करावें. आज्योत्पवन झाल्यानंतर तीन वेळ लाह्यांस प्रोक्षण करावें, त्यावेळीं वधूनें वराच्या हातास स्पर्श करावा. ह्याप्रमाणें हात धरून झाल्यावर आधार होम करून मुख्य होम करावा, त्यावेळीं पुढील मंत्र म्हणावे.

ॐ अग्न आयूंषि पवस आसुवोर्जमिषंचनः ।
आरे बाधस्वदुच्छुनां स्वाहा ।

हे अग्ने, आमचें आयुष्य रक्षण करून आम्हांस सुख देतोस, तो तूं आम्हांला अन्न व बळ दे, आणि आम्हाला पीडा करणारे राक्षस आमच्यापासून लांब असतांनाच त्यांचा नाश कर.

ॐ अग्निर्ऋषिः पवमानः पांचजन्यः पुरोहितः ।
तमीमहे महागयं स्वाहा ।

हे अग्नि, तूं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अंत्यज ह्यांस इच्छिलेलें फल देणारा असल्यामुळें त्यांचा तूं आप्त झाला आहेस. तूं सर्व कर्मांचा साक्षी, सर्वांस पवित्र करणारा, यज्ञादिकर्मे करण्यासाठीं ऋत्विजानीं पुढें स्थापिलेला व देवादिक ज्यांची स्तुति करतात, अशा पवमान अग्निपाशीं आम्हीं धनादिक मागतों.

ॐ अग्नेपवस्वस्वपा अस्मेवर्चः सुवीर्यम् ।
दधद्रयिं मयिपोषं स्वाहा ।

हे अग्ने, तूं चांगलीं कर्मे करणारा, तूं आमचे ठायीं उत्तम पराक्रम व तेज ह्यांस ठेव, तसेंच द्रव्य व पुत्र ह्यांची समृद्धि आणि गो महिष्यादि पशूंची वृद्धि आमचे येथें होऊं दे.

ॐ त्वमर्यमाभवसि० व ॐ प्रजापतेनत्वदेता० ।

अशा पांच मंत्रांनीं होम करून झाल्यावर वरानें वधूच्यापुढें पश्चिमाभिमुख उभें

रहावें व पांचही अंगुलीसह वधूचा उताणा उजवा हात* आपल्या डाव्या हातानें धरून " गृभ्णामिते सौभगत्वाय हस्तं " हा मंत्र म्हणावा. नंतर वधूकडून स्वच्छ हात धुववून त्या अंजलींत स्त्रुव्यानें थोडेंसें घृत होमांत घालावें. वधूचा भाऊ अगर दुसरा कोणी ह्यांच्याकडून तिच्या अंजलींत दोन वेळ एकेक मूठ लाह्या घालवाव्या. कित्येक तीन वेळां† लाह्यांचा होम करावा म्हणून सांगतात.

प्रथम अग्नींत ‡लाह्यांचा होम करतेवेळेस पति पत्नीस विचारतो कीं " किं पश्यसी ?" तूं काय पाहतेस ? तुझें अग्निजवळ काय मागणें आहे, त्यावेळेस वधू जबाब देते कीं " प्रजां पशुं सौभाग्यं मह्यं दीर्घायु सत्वं पत्युः " माझ्या पतीला प्रजा, पशु मिळून माझें सौभाग्य सदा राहावें, ह्याबद्दल मी अग्नीजवळ मागणें मागतें. प्रथम आहुति देतांना " आयुष्मानस्तु मे पतिरेधतां ज्ञातयो मम-स्वाहा " उत्तम वराच्या प्राप्तिकरतां मी हे तेजस्वी सूर्यदेवते तुझें यजन केलें होतें, व त्याप्रमाणें मला उत्तम पति मिळाला आहे, करितां मला माझ्या पितृ-गृहांतून काढून माझा जो पति त्याजकडे ने, व मला माझ्या पतिपासून दूर करूं नकोस.

ॐ इयं नार्युपब्रूते लाजानावपन्तिका ।
आयुष्मानस्तु मे पतिरेधन्तां ज्ञातयो मम स्वाहा ।
इदमग्नये, इदन्न मम ।

---

* वधूचा हात धरतांना तो कसा धरावा ह्याविषयीं आश्वलायन सांगतात,

अंगुष्टमेव गृण्हीयाद्यदि कामयीत पुमांस एव मे पुत्रा जायेरन्निति ।
अंगुलीरेव स्त्रीकामः । रोमान्ते हस्तं सांगुष्टमुभय कामः ।

ज्याला पुत्रसंतति व्हावी अशी इच्छा असेल, त्यानें फक्त एक अंगुष्टच धरावा, मुली व्हाव्या अशी इच्छा असल्यास अंगुलि धरावी आणि पुत्र व कन्या व्हाव्या अशी इच्छा असल्यास आंगठ्यासहित सर्व हात धरावा.

† वर पंचप्रवरी असल्यास तीन वेळ लाह्या घालाव्या.

‡ लाजाहोम होईपर्यंत पारस्कर वधूला कुमारी ह्या नांवानेंच संबोधितात. विवाहाची समाप्ति लाजाहोम व सप्तपदी नंतरच होते. लाजाहोमाबद्दल लज्जा होम असेंही म्हणतात.

माझा पति पूर्णायुषी होवो, व माझे बांधव आनंदी होवोत, हें सत्य व्हावें, म्हणून मी अग्नींत आहुति देत आहें. ही माझी नव्हे. दुसऱ्या व तिसऱ्या आहुतीच्या वेळेस

इमांल्लाजानावपाम्यग्नौ समृद्धिकरणं तव ।
मम तुभ्यं च संवननं तदग्निरनु मन्यतामियंस्वाहा ॥

माझा पति दीर्घायु होवो, माझें कुल वृद्धि पावो. हे पति आपल्या समृद्धि-करितां ह्या लाह्यांचें मी हवन करतें, व आमच्या परस्परांच्या प्रीतीस हे अग्ने, तूं अनुमोदन दे. असें म्हणून वरानें सुपांतील व अंजलींतील लाह्यांवर एक वेळ अभिधार करावा. नंतर उभें राहून–

ॐ अर्यमणं नु देवं कन्या अग्निमयक्षत । स इमां देवो
अर्यमा प्रेतोमुंचातु नामुतः स्वाहा, अर्यमाग्नय इदं न मम ।

देदीप्यमान अर्यमा नांवाचा, ज्याला आजपर्यंत अनेक कन्यांनीं हर्विद्रव्याच्या योगानें संतुष्ट केलेला, असा, जो अग्नि, तो तूं ह्या वधूचे, तिचे आईबाप, बंधु इत्यादिकांवरील प्रेम कमी करवून त्यांच्या कुलांतून तिला मुक्त कर. माझे आईबाप, बंधु व कुटुंबांतील इतर माणसें ह्यांजवर हिचें प्रेम जडो, एवढेंच नव्हे तर, मजवर नेहमीं ही अनुरक्त होऊन राहण्याची हिला बुद्धि दे. अशी प्रार्थना करून सुपाच्या कोणानें सर्व लाह्यांचा होम करावा. वधूवरांनीं अग्नीस प्रदक्षिणा घालतेवेळेस " अहोहमस्मि " हा मंत्र म्हणावा. लाजाहोम झाल्यावर वधूस दोन्ही पाय पाट्यावर ठेऊन उभें राहण्यास सांगावें. वरानें—

ॐ इममश्मानमारोहाश्मेव त्वं स्थिराभव ।
सहस्वपृतनायतोऽभितिष्ठपृतन्यतः ॥

हे वधू, तूं ह्या पाषाणावर चढ, आणि हा पाषाण जसा घट्ट आहे, तशी तूं मनानें घट्ट हो, तुझें जे अहित करणारे असतील, त्यांना तूं आपल्या सद्वर्तनानें वश कर.

पुनः पूर्वी सांगितल्याप्रमाणें उपस्तरणादि करून वधूच्या हातांतील लाह्या " वरुणंतु " ह्या मंत्रानें होमांत घालून पूर्वीप्रमाणें " अहोहमस्मि " हा मंत्र ह्मणून प्रदक्षिणा घालावी.

वरील कर्मे झाल्यावर सप्तपदीस सुरवात होते.

*सप्तपदी.

जो आपल्याबरोबर सात पावलें चालला तो आपला सखा होतो, एवढ्याकरितांच जो आपला सखा असतो त्यास " सप्तपदीन् " म्हणतात. कन्यादानानंतर अग्निनारायणाच्या व इतर जनांच्या साक्षीनें हा विधि करण्यांत येतो. पश्चिमेकडून पूर्वेकडे एकेक हाताच्या अंतरानें तांदुळाच्या सात पुंज्या करून त्या प्रत्येकीवर एकेक सुपारी ठेवतात, व त्यांच्या पश्चिमेस वधूला पूर्वाभिमुख उभी करून तिच्यासमोर वरास उभें करण्यांत येतें. नंतर वराकडून वधूच्या उजव्या पायाचा आंगठा क्रमानें एकेका पुंजीवरून उल्लंघन करविणें ह्या विधीस सप्तपदी म्हणतात. पारस्कर गृह्यसूत्रांवर हरिहराचें भाष्य आहे, त्यांत

वधूमुदीचीमुदङ्मुखीं सप्तपदानि प्रक्रामयति ।
सप्त प्रक्रमान् दक्षिणपादेन कारयति उत्तरोत्तरं वरः ॥

दक्षिणोत्तर पुंजी करून त्यांचें उल्लंघन वधूकडून करवावें असें सांगितलें आहे.

---

* सख्यं साप्तपदीनस्यात् ।
सतां सप्तपदी मैत्री ।
मैत्री सप्तपदी प्रोक्ता सप्तवाक्याऽथवा भवेत् ।
सत्तराणां तु त्रिपदी सत्तमानां पदे पदे ॥

सज्जनांची मैत्री सप्तपदी (सात पावलें चालल्यानें) अथवा सात वाक्यें बोलल्यानें, सत्तर (अधिक उत्तम) जनांची मैत्री तीन वाक्यांत आणि (सत्तमान) सर्वांपेक्षां चांगल्या जनांची मैत्री पदापदाला होते.

पाणिग्रहण मंत्राणां निष्ठास्यात्सप्तमे पदे ।
पाणिग्रहस्य भार्या स्याद्यस्यचाद्भिः प्रदीयते ॥ महाभारत.

विवाह पूर्ण झाला, सप्तपदी झाली नसली, व जरी कन्यादानादि सर्व विधि झाले असले तरी, वधू ही वराची भार्या होऊं शकत नाहीं. सप्तपदीनंतरच विवाहविधि पूर्ण होतो.

नोदकेन न वा वाचा कन्यायाः पतिरिष्यते ।
पाणिग्रहण संस्कारात्पतित्वं सप्तमे पदे ॥

कन्यादान करतेवेळेस जलाचा संकल्प अथवा वाग्दान संकल्प झाला तरी सप्तपदिनंतरच पतित्व प्राप्त होतें.

हा सप्तपदीचा विधि करतांना सख्याचे सात धर्म आहेत, ते त्याजबरोबर सात पावलें चालतांच प्रत्येक पावलाचे वेळेस उत्पन्न होतात. सप्तपदीचे वेळेस वराचें उपवस्त्र व वधूचें उत्तरीय वस्त्र ह्यांस गांठ द्यावी, वर व वधू ह्यांनीं आसनावरून उठून वरानें आपल्या दक्षिण हातानें वधूची दक्षिण हस्तांजली धरून यज्ञकुंडाचे उत्तर भागास जावें. नंतर वरानें आपला दक्षिण हात वधूच्या दक्षिणस्कंधावर ठेवून दोघांनीं समीप समीप उत्तराभिमुख होऊन नंतर वरानें—

मासव्येन दक्षिणमतिक्राम

असें म्हणून वधूचा दक्षिण पाय उचलून तिला चालण्याची आज्ञा करावी. नंतर

इष एकपदी भव सा मामनुव्रता भव पुत्रान्विंदावहै
बहूंस्ते संतु जरदष्टयः । आश्वलायन.

हे वधू, तूं मजबरोबर एक पाऊल चाललीस. तेव्हां तुझें व माझें सख्य झालें, म्हणून तूं मला अन्न देणारी म्हणजे उत्तम पाकनिष्पत्ति करून मला भोजन घाल, आणि माझ्या मनाप्रमाणें वाग. आपणांस पुत्र होऊन ते शतायुषि होवोत.

ॐ एकमिषे विष्णुस्त्वा नयतु† । पारस्कर.

भगवान् विष्णु तुला अन्नप्राप्तीकरतां मजबरोबर चालवो.

त्वत्तो मेऽखिल सौभाग्यं पुण्यैस्त्वं विविधैः कृतैः ।
देवैः सम्पादितो मह्यं वधूराद्ये पदेऽब्रवीत् ॥

---

* सप्तपदीचे वेळेस प्रत्येक पावलाचे वेळेस जी प्रतिज्ञा केली जाते, ती वधूवरांस समजण्यापुरतें त्यांस ज्ञान असलें पाहिजे, ह्यावरून विवाहाचेवेळीं तीं प्रौढ असलीं पाहिजेत. विवाहापूर्वी वधुवरांच्या परिचयाची आवश्यकता वाटत असावी हें त्या परिचयाच्या सप्तपदीरूप अवशेषावरून स्पष्ट होतें.

† हें पाऊल टाकण्याचा विधि असा आहे कीं, वधूनें प्रथम आपला उजवा पाय उचलून ईशान्य कोनाकडेस धरावा, त्यानंतर डावा पाय उचलून उजवे पायाचे पोटरीपर्यंत धरावा. अर्थात उजवा पाय थोडासा डाव्या पायाकडे ठेवावा. ह्याप्रमाणें एकेक पाऊल गणून तें सहा पावलेंपर्यंत करावें. एकेका मंत्राला एकेक पाऊल ईशान्य दिशेस धरून टाकावें. अश्मारोहणाचे वेळेस सबंध पाय अश्म्यावर न ठेवतां पायाचा पुढील भाग तेवढाच ठेवावा.

अनेक पुण्यसंचय आणि देवतांच्या कृपेनें आपल्यासारखा पति मिळून त्या जगांत मला सौभाग्य प्राप्त झालें आहे.

दुसऱ्या पदाचे वेळेस--

ऊर्जे दिपदीभव सा० पु० । आश्वलायन.

हे वधू तूं माझ्याबरोबर दोन पावलें चाललीस. आतां माझें बळ वाढीव. तूं उत्तम पाकनिष्पत्ति करून मला भोजन घाल.

द्वे ऊर्जे विष्णुस्त्वा नयतु० पारस्कर.

भगवान् विष्णु बलप्राप्तीकरतां दुसरें पाऊल मजबरोबर चालवो.

कुटुंबं पालयिष्यामि ह्यावृद्धबालकादिकम् ।
यथालब्धेन संतुष्टा ब्रूते कन्या द्वितीयके ॥

तुमच्या वडिलांना माझ्या वडिलांप्रमाणें मानून त्यांच्या आज्ञेंत राहीन, बालकें व कुटुंबांतील माणसें ह्यांचें रक्षण करून प्रारब्धानुसार जें द्रव्य मिळेल, त्यांतच आनंद मानून अप्रिय असें वचन कधींही बोलणार नाहीं.

तिसऱ्या पावलाचे वेळेस–

रायस्पोपाय त्रिपदी भव सा० पु० । आश्वलायन.

हे वधू तूं मजबरोबर तीन पावलें चाललीस म्हणून तूं माझें धन वाढविणारी हो.

त्रीणि रायस्पोषाय विष्णुस्त्वा नयतु । पारस्कर.

भगवान् विष्णु धनप्राप्तीकरतां तिसरें पाऊल मजबरोबर चालवो.

मिष्टान्न व्यंजनादीनि काले संपादये तव ।
आज्ञा सम्पादिनी नित्यं तृतीये साब्रवीद्वरम् ॥ ३ ॥

आपल्या आज्ञेप्रमाणें वर्तून उत्तम पाकनिष्पत्ति करून आपणासह सर्व कुटुंबाला भोजन घालून सर्वांस संतोष देईन.

चवथ्या पावलाचे वेळेस–

ॐ मायो भव्याय चतुष्पदी भव । सा० पु० आश्वलायन.

हे वधू, तूं मजबरोबर चार पावलें चाललीस, करितां माझें सुख वाढविणारी हो.

ॐ चत्वारि मायोभवाय विष्णुस्त्वा नयतु । पारस्कर.

भगवान् विष्णु सुखप्राप्तीकरतां तुला मजबरोबर चवथें पाऊल चालवो.

शुचिः श्रृंगारभूषाहं वाङ्मनः कायकर्मभिः ।
क्रीडिष्यामि त्वयासार्धं तुरीये सा ब्रवीदिदम् ॥

नित्य अलंकार परिधान करून, अति पवित्र मनानें, वाणीनें आणि सत्कर्मानें शुभ-चिंतक होऊन आपल्याबरोबर क्रिडा करीन.

पांचवें पाऊल टाकतांना—

प्रजाभ्यः पंचपदी भव । सा० पु० आश्वलायन.

हे वधू, तूं पांच पावलें मजबरोबर चाललीस, म्हणून संतति वाढविणारी हो.

पंच पशुभ्यो विष्णुस्त्वा नयतु । पारस्कर.

भगवान् विष्णु पशु वृद्धिकरतां मजबरोबर पांचवें पाऊल चालवो.

दुःखे धीरा सुखे हृष्टा सुखदुःखविभागिनी ।
नाहं परवरं गच्छे पंचमे सा ब्रवीत्पतिम् ॥ ५ ॥

दुःखाचे वेळीं धीर देणारी, सुखाचे वेळीं प्रसन्न चित्तानें राहणारी होऊन सुखाचे वेळीं सुखी व दुःखाचे वेळीं दुःखी अशी आपणापाशीं राहून परपुरुषाची कधींही इच्छा करणार नाहीं.

सहावें पाऊल टाकतांना—

ॐ ऋतुभ्यः षट्पदी भव सा० पु० । आश्वलायन.

हे वधू, तूं सहा पावलें मजबरोबर चाललीस, ह्याकरतां सर्व ऋतूंत प्राप्त होणारे ते ते भोग मला देणारी हो.

ॐ षट् ऋतुभ्यो विष्णुस्त्वा नयतु । पारस्कर.

किंवा—**ॐ षड्रायस्पोषाय विष्णुस्त्वा नयतु ।**

भगवान् विष्णु वसंतादि षट्ऋतुंचे विलास प्राप्त व्हावे, म्हणून मजबरोबर सहा पावलें चालवो.

सुखेन सर्व कर्माणि करिष्यामि गृहे तव ।
सेवां श्वशुरयोश्चापि बन्धूनां सत्कृतिं तथा ॥
यत्र त्वं वा अहं तत्र नहि वंचे प्रियंकचित् ।
नाहं प्रियेण वंचास्मि कन्या षष्टे पदेऽब्रवीत् ॥

सासुसासऱ्याची सेवा करून आपल्या सग्यासोयऱ्यांचा सत्कार करून गृहकार्य मी उत्तम रीतीनें चालवीन. एवढेंच नव्हे तर, जेथें तुम्हीं तेथें मी राहून आपण परस्परांनीं परस्परांचा छल करूं नये.

सातव्या पावलाचे वेळेस—

सखा सप्तपदी भव सा० पु० । आश्वलायन.

एवढा वेळपर्यंत तूं मजबरोबर चाललीस, त्यामुळें तुझें व माझें सख्य दृढ झालें.

ॐ सखे सप्तपदा भव सा मामनुव्रताभव विष्णुस्त्वा नयतु। पारस्कर.

तूं सात पावलें मजबरोबर चाललीस म्हणून सात लोकांत प्रसिद्ध हो. माझ्या आज्ञेप्रमाणें वागणारी हो. भगवान् विष्णु तुला सातवें पाऊल टाकण्यास शक्तिमान् करो.

होमयज्ञादिकार्येषु भवामि च सहायकृत् ।
धर्मार्थकामकार्येषु मनोवृत्तानुसारिणी ॥
सर्वेहि साक्षिणस्त्वं मे पतिर्भूतोऽसि सांप्रतम् ।
देहो मयार्पितस्तुभ्यं सप्तमे साब्रवीद्वरम् ।

आपली आज्ञा पाळून धर्म, अर्थ व काम हे तिन्ही पुरुषार्थ साधून यज्ञादिक तशीच देवकार्यांत सहाय करणारी होईन. ब्राह्मण, अग्नि त्याचप्रमाणें सगेसोयरे ह्यांच्या समक्ष तुम्हीं माझे पति झालां आहांत. मी माझा देह तुम्हांला अर्पण केला आहे, करितां कोणत्याही कारणानें मी आपली आज्ञा उल्लंघन करणार नाहीं.

ह्या सप्तपदीची मैत्री अति श्रेष्ठ आहे. विवाहांत होणाऱ्या प्रतिज्ञांची नित्य आठवण ठेवून जर वर्तन केलें, तर कलहास कधींही जागा उरणार नाहीं. सप्तपदी नंतर वरानें वधूच्या मस्तकाला स्पर्श करून कलशांतील उदक " शांतिरस्तु " इत्यादि पंधरा मंत्रांनीं वरानें आपल्या व वधूच्या मस्तकावर शिंपडावें. हें जल अभ्युदय व आरोग्य देणारें असून सुख व परमानंद देणारें आहे. वधूवरांस त्यांच्या पूर्वस्थानीं बसवून " स्विष्टकृत " होम, विभूतिधारण इत्यादि करून होमविधि संपवून उभयतांच्या वस्त्राची गांठ सोडावी, व त्यांजकडून वसिष्ठ अरुंधतीचें दर्शन करवितांना " जीवपत्नी प्रजां विंदेय " (माझा पति शतायु होऊन मला संतति व्हावी असें मी इच्छितें) हा मंत्र म्हणावा, आणि वधूनें धारण केलेलें मौन सोडावें. ध्रुव दर्शनाचेवेळीं " ॐ ध्रुवा द्यौ ध्रुवा " हा मंत्र म्हणावा. एवढा विधि झाल्यानंतर गृहप्रवेशनीय *होम करावा. त्यावेळीं १ ॐ आनः प्रजांजनयतु, २ ॐ अघोरचक्षु, ३ ॐ इमांत्वा, ४ ॐ सम्राज्ञां, ५ ॐ समजन्तु " असे पांच मंत्र म्हणावे.

ऐरिणी (ऐरणी, झाल) प्रदान.

ऐरिणी प्रदान करणें ही एक रुढि आहे. ही बहुधा श्रेष्ठ वर्णाच्या लोकांत आढळून येते. बांबूचीं केलेलीं १६ सुपें व त्यांचीच एक मोठी डाळी ह्यांस ऐरिणी म्हणतात. ही ऐरिणी वरमातेस वधुमातेनें द्यावयाची असते. बांबूस वंश म्हणतात. आपल्या कन्येचा वंशविस्तार व्हावा, ह्या शुद्ध हेतूनें व प्रेमानें वंशविस्ताराची खूण म्हणून उमामहेश्वराच्या नांवानें वधुमाता वरमातेस देते. त्यावेळीं वंशपात्रही देण्यांत येतें. कन्येचें कल्याण व्हावें हाच मुख्य हेतु ह्या कर्मांत असतो. कन्येच्या पित्यानें पूर्वाभिमुख बसून आचमन व देशकालाचा उच्चार करून विवाहाचें फल आपणांस मिळावें, एवढ्याकरितां वराचे आईबाप व त्यांच्याकडील इतर मंडळी ह्यांचें यथाशक्ति सत्कारपूर्वक पूजन करतों, असा संकल्प करून उत्तम वस्त्रालंकारांनीं त्यांस भूषित करावें. नंतर–

---

* विवाहाच्या दिवशीं मध्यरात्रीपूर्वी हा होम होण्यासारखा असल्यास करावा. मध्यरात्रीनंतर करूं नये. मग दुसरे दिवशीं करावा. ह्या होमानंतर तीन दिवस, बारा दिवस किंवा एक वर्षपर्यंत वधुवरांनीं क्षार धान्यें व मीठ खाऊं नये. उत्तम वस्त्रें परिधान करून भूमीवर शयन करावें.

ऐरिणीत्वमुमादेवी महेशो गिरिजापतिः ।

हा मंत्र व ह्याशिवाय आणखी मंत्र आहेत ते म्हणून ऐरिणीवर उमामहेश्वराची षोडशोपचारानें पूजा करावी. पूजा झाल्यावर हें ऐरिणीपात्र उमामहेश्वराच्या संतोषाकरितां देतों असें म्हणून वरमातेच्या हातावर उदक सोडावें, त्यावेळीं "वंशोवंशकरः श्रेष्ठो वंशोवंश समुद्भवः" वगैरे श्लोक म्हणावे. नंतर कन्येच्या पित्यानें वरपित्याच्या मांडीवर कन्येस बसवून कन्याग्रहणाविषयीं त्यांची प्रार्थना करावी. एवढें झाल्यावर कन्येस वराचे तसेच त्याचे इतर संबंधी असतील त्यांच्या मांडीवर बसवावें. ऐरिणी प्रदान करून झाल्यानंतर वधुमाता व पिता ह्यांनीं भोजन करावें, तोंपर्यंत त्यांनीं उपाशीच रहावें.

ह्याप्रमाणें कर्मसांगता झाल्यावर व्याही एकमेकांस भेटतात. वर व वधू हीं गीतवाद्यांसह घरीं येण्यास निघतात. घरांत प्रवेश करण्यापूर्वी "इह प्रियं प्रजयाते" हा मंत्र म्हणत वधुवरांनीं गृहप्रवेश करून गणपतिपूजन, पुण्याहवाचन व लक्ष्मीपूजन करावें. "सक्तुमिवतितउना," ह्या मंत्रानें महालक्ष्मीची षोडशोपचारें पूजा करून वहिवाटीप्रमाणें वधूचें नांव ठेवावें व परमेश्वराची प्रार्थना पुढील मंत्रानें करावी.

ॐ मा विदन् परिपन्थिनो य आसीदन्ति दंपती ।
सुगेभिर्दुर्ग मतीतामपद्रान्त्वरातयः ॥

हे प्रभो, हे आडमार्गानें जाणारे दुष्ट लोक ह्या स्त्रीपुरुषावर चालून येत आहेत, त्यांस हीं न दिसतील असें कर; अर्थात् अशा वाईट व दुष्टांपासून ह्यांस पीडा न होवो. हीं स्त्रीपुरुषें उत्तम कृत्यांच्या व ज्ञानादि साधनांच्या योगानें अनेकविध संकटांतून पार पडोत, व ह्यांचे वैरी सर्वप्रकारें नाश पावोत.

इहैवस्तं मा वियौष्टं विश्वमायुर्व्यश्नुतम् ।
क्रीळन्तौ पुत्रैर्नप्तृभिर्मोदमानौ स्वेगृहे ॥

ईश्वर म्हणतो, हे नूतन विवाहित स्त्रीपुरुषहो, तुम्हीं उभयतांनीं गृहस्थाश्रमांत सदोदित सुखानें राहावें, व कोणत्याही प्रकारचा तुमच्यांत विरोध किंवा विरह उत्पन्न होऊं नये. माझ्या आशीर्वादानें परोपकार व धर्माचरण करून माझी नेहमीं भक्ति करा व सर्व आयुष्यभर सुखानें रहा.

ब्राह्मणाकडून आशीर्वाद.

ब्राह्मणांनीं वैदिकमंत्र म्हणून वधूच्या डोकीवर अक्षता टाकून तिला आशीर्वाद द्यावा.

गृहान् गच्छ गृहपत्नी यथाऽसो वशिनीत्वं विदथमावदासि । ऋग्वेद.

तूं आपल्या पतीच्या घरीं जा व गृहस्वामिनी हो, व आपल्या घरीं मुख्यस्थान घेऊन गृहकृत्यें कर.

इह प्रियं प्रजया ते समृध्यतामस्मिन गृहे गार्हपत्याय जागृहि । एनापत्या तन्वं संसृजस्वाधाजिव्रीविदथ-मावदाथः । ऋग्वेद.

याठिकाणीं (पतिगृहीं) तुला प्रजा होऊन तुझ्या आनंदाची वृद्धि होवो. तूं आपल्या घरीं गृहकर्तव्याविषयीं जागृत रहा. आपल्या पतिबरोबर तूं शरीरानें एकजीव होऊन रहा. उत्तम संसार कसा करावा ह्याचें उदाहरण तूं दुसऱ्यांस घालून दे. सारांश उत्तम गृहिणी हो.

वरानें शिष्टजनांस करावयाची प्रार्थना.

ॐ सुमङ्गलीरियं वधूरिमां समेत पश्यत ।
सौभाग्यमस्यै दत्वायाथास्तं विपरेतन ॥ अ. वे.

अहो विद्वान् लोकहो, ही माझी पत्नी उत्तम गुणांनीं युक्त होईल असें हिला करा, एवढेंच नव्हे तर तिला तसें पहा, म्हणजे ज्या रीतीनें हिला उत्तम सुख प्राप्त होईल, अशा रीतीनें तिची उन्नति करा. हिला उत्तम भाग्य (सौभाग्य) देऊन मग आपापल्या घरीं जा. सारांश ही माझी पत्नी उत्तम गुणांनीं युक्त होईल आणि त्यायोगें ही भाग्यास चढेल असा हिला आशीर्वाद द्या.

वडिलांनीं द्यावयाचा आशीर्वाद.

ॐ अविधवा भव वर्षाणि शतं साग्रं तु सुव्रता ।
तेजस्वी च यशस्वी च धर्मपत्नी पतिव्रता ॥

जनयद् बहु पुत्राणि मा च दुःखं लभेत् क्वचित् ।
भर्ता ते सोमपा नित्यं भवेद् धर्मपरायणः ॥
अष्टपुत्रा भवत्वं च सुभगा च पतिव्रता ।
भर्तुश्चैव पितुर्भ्रातुर्हृदयानंदिनी सदा ॥
इंद्रस्य तु यथेंद्राणी श्रीधरस्य यथा श्रिया ।
शंकरस्य यथा गौरी तद् भर्तुरपि भर्तरि ॥
अत्रेर्यथानुसूया स्याद् वसिष्ठस्याप्यरुंधती ।
कौशिकस्य यथा सती तथा त्वमपि भर्तरि ॥

त्याप्रमाणें वधूस आशीर्वाद द्यावा.

भाग ४.

विवाह झाल्यावर स्त्रीची योग्यता व तिची पतिबरोबरची वागणूक.

अपत्यं धर्मकार्याणि शुश्रूषा रतिरुत्तमा ।
दाराधीहस्तथा स्वर्गः पितृणामात्मनश्चह ॥

पुत्रोत्पत्ति, अग्निहोत्रादि धर्मकृत्यें, उत्तम प्रकारची सेवा, उत्तम रतीसुख देणें, आणि पितरांची तशीच स्वतःची स्वर्गगति हीं सर्व कर्मे स्त्रीच्या स्वाधीन असतात, कारण ही पुरुषांस सर्व धर्मकृत्यांत सहाय्य करणारी असते.

संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥

ज्या कुलांत स्त्रीयेच्यायोगें पुरुष व पुरुषाच्यायोगें स्त्री परस्पर संतुष्ट राहतात, त्याच कुलांत कल्याण वास करतें.

प्रजनार्थं स्त्रियः सृष्टाः संतानार्थं च मानवाः ।
तस्मात्साधारणो धर्मः श्रुतौ पत्न्या सहोदितः ॥

गर्भधारण करण्याकरितां स्त्रीया व गर्भाधान करण्याकरितां पुरुष हे उत्पन्न केले आहेत, एवढ्याकरतां पतिपत्नींनें एकचित्तानें वागून धर्मकृत्य साधावें.

न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।
तथा हि सहितः सर्वान् पुरुषार्थान् समश्नुते ॥ गोभिल गृह्यसूत्र.

घराला घर म्हणतां येत नाहीं, तर स्त्रीलाच घर म्हणतात. कारण स्त्रीवांचून असलेलें घर पुरुषार्थविरहित असतें, म्हणूनच आम्हीं एकाद्याला विचारूं लागलों तर आपलें कुटुंब कोठें आहे म्हणून बहुमानार्थी म्हणतों, कारण तीच

धर्मार्थकामकालेषु भार्या पुंसः सहायिनी ।
विदेशगमने चास्य सैव विश्वासकारिका ॥

स्त्री ही धर्म,अर्थ त्याचप्रमाणें एकाद्या कामांत सहाय्य करणारी आहे, व परदेश-गमनसमयीं विश्वास ठेवण्यालायक तीच आपली खरी सोबतीण असते, एवढेंच नव्हे तर—

नास्ति भार्या समो बन्धुर्नास्ति भार्या समा गतिः ।
नास्ति भार्या समो लोके सहायो धर्मसंग्रहे ॥

पुरुषाला स्त्रीसमान दुसरा कोणताही सगा नाहीं, गति त्याचप्रमाणें धर्मसंग्रह करण्यांत तिचीच सहायता विशेष लागते.

पूजनीया महाभागाः पुण्या च गृहदीप्तयः ।
स्त्रियः श्रियो गृहस्योक्ता तस्याद्रक्ष्या विशेषतः ॥

सदाचरणी, पवित्र, घरांत दिपरूप तशी सत्कारार्ह स्त्री घराची शोभा आहे अशा स्त्रीचें विशेष रक्षण करावें.

सदा सुखी गृहं भुंक्ते स्त्री लक्षणवती यदि ।
तस्मात्सुखसमृध्यर्थमादौ लक्षणमीक्षयेत् ॥

सुलक्षणी स्त्रीनें युक्त असलेल्या पतीला फार समाधान होतें. एवढ्याकरितां आपण उभयतांस सुख मिळावें म्हणून स्त्रीपुरुषांनीं परस्पर लक्षणांची परीक्षा करावी.

चक्रवाकेव दम्पती । अथर्ववेद.

ज्याप्रमाणें चक्रवाक् पक्षांचा जोडा असतो त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांचाही जोडा असावा.

भर्ता हि परमं नार्या भूषणं भूषणैर्विना ।
एषा विरहिता तेन शोभनापि न शोभना ॥ चाणक्यनीति.

स्त्रियांस अलंकार नसले तरी पति हाच श्रेष्ठ अलंकार होय, कारण अति सुंदर स्त्री आहे, पण तिचा जर पति नाहीं, तर ती सुंदर असली तरी शोभत नाहीं.

सुस्वभावा सुवचना सुवृत्ता सुखदर्शना ।
अनन्यचित्ता सुमुखी भर्तुः सा धर्मचारिणी ॥ महाभारत.

जी स्त्री पतिबरोबर सुस्वभावानें वागणारी, मधुरभाषिणी, चांगल्या वर्तनाची जिचें दर्शन झालें तर सुख वाटावें, पतीच्याच ठिकाणीं चित्त ठेवणारी व प्रसन्न मुखाची किंवा हास्यमुखी जी स्त्री ती धर्मचारिणी जाणावी.

शुश्रूषां परिचर्यां च करोत्यविमनाः सदा ।
सुप्रतीता विनीता च सा नारी धर्मभागिनी ॥

जी नारी प्रसन्न मनानें आपल्या पतीची सेवा चाकरी करते, मर्यादेंत राहते व विनयशील असते ती धर्मनिष्ठ जाणावी.

सा कविता सा वनिता यस्याः श्रवणेन दर्शनेनापि ।
कविहृदयं पतिहृदयं सरलं तरलं च सत्वरं भवति ॥

जिच्या दर्शनानें किंवा श्रवणानें कविचें त्याचप्रमाणें पतीचें हृदय तत्काल सरळ त्याचप्रमाणें चंचल होतें, तीच कविता व तीच वनिता जाणावी.

तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।
भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥

ज्याला आपली समृद्धि व्हावी अशी इच्छा असेल त्यानें आपल्या भार्येस सदा भूषण वस्त्र आणि अन्नपानादि देऊन तिला प्रसन्न ठेवावें, त्याचप्रमाणें मंगलप्रसंगीं, त्याचप्रमाणें विवाहादिकार्यांतसुद्धां तिचा मान राखावा.

मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः ।
अमितस्य तु दातारं भर्तारं का न पूजयेत् ॥ बाल रा. अयो. कांड.

बाप, भाऊ, व मुलगा ह्यांनीं जर कांहीं दिलें तर तें मोजकेंच देणार, पण सर्वस्वी आपलें सर्व देणारा पतिवांचून दुसरा कोणी नाहीं, म्हणून प्रत्येक स्त्रीनें पतीची सेवा करावी.

पतिर्हि देवो नारीणां पतिर्बन्धुः पतिर्गतिः ।
पत्या समा गतिर्नास्ति दैवतं वा यथा पतिः ॥

स्त्रीला पति हाच देव आहे, स्नेही त्याचप्रमाणें पति आहे, त्यावांचून तिला इतर दैवत नाहीं.

भर्ता देवो गुरुर्भर्ता धर्मतीर्थव्रतानि च ।
तस्मात्सर्वं परित्यज्य पतिमेकं भजेत्सती ॥

स्त्रीला पतीच देव, गुरु, पोषणकर्ता, धर्म, अर्थ त्याचप्रमाणें व्रतरूप आहे, करितां इतर सर्वांस सोडून त्याचीच सेवा करावी.

अनुव्रतः पितुः पुत्रो मात्रा भवतु संमनाः ।
जायापत्ये मधुमतीं वाचं वदतु शान्तिवान् ॥ १ ॥
मा भ्राता भ्रातरं द्विक्षन् मा स्वसारमुत स्वसा ।
सम्यञ्चः सव्रता भूत्वा वाच वदत भद्रया ॥२॥ अथर्वकांड ३।६।३०
यथा सूर्यो नक्षत्राणामुद्यंस्तेजांस्याददे ।
एवा स्त्रीणां च पुंसां च द्विषतां वर्च आददे॥३॥ अथ. कांड ७१।१३
समित ॅ सङ्कल्पेथा ॅ संप्रियौ रोचिष्णू सुमनस्यमानौ ।
इषमूर्जमभि संवसानौ ॥ ४ ॥ यजु. अ. १२.

१ हे मनुष्य हो, तुम्हीं आईबाप, मुलगा, बहीणभाऊ, पति, पत्नी आदिकरून सर्वांनीं प्रेमानें वागावें. आपापसांत मधुर व हितकर भाषण करावें. प्रेमपूर्वक वागून कधींही भांडण करूं नये. २ ज्याप्रमाणें उदय पावणारा सूर्य नक्षत्रांचें तेज नाहींसें करितो, त्याप्रमाणें कलह हा स्त्रीपुरुषांचें तेज नाहींसें करतो, ३ एव-ढ्याकरितां विवाहित स्त्रीपुरुषांनीं परस्पर प्रेमानें वागावें, उत्तम विचार करावे, परस्परांस प्रिय होईल असें आचरण ठेवावें. बिभत्स भाषण व दुष्ट व्यवहार करूं नयेत. विषयासक्त न होतां जेणेंकरून शरीर, इंद्रियें, मन व बुद्धि हीं तरतरीत व तेजस्वि राहतील असें करावें. प्रेमभाव ठेवावा, वैमनस्य नसावें. विद्या व उत्तम वस्त्रादिक प्राप्त करून घेईन अशी ईर्षा बाळगावी व पराक्रम करण्याची बुद्धि नेहमीं धरून पराक्रमी व्हावें हेंच त्यांस उचित होय. एकमेकांबद्दल आदर बाळ-गावा " गृहपत्नी यथासो " (अथर्व०) कारण ज्याप्रमाणें पुरुष त्याचप्रमाणें त्याची पत्नी आहे, व " यो भर्ता सा स्मृतांगना " जो पतीचा मान तोच स्त्रीचा सम-जावा, म्हणजे एकमेकांनीं एकमेकांचा सत्कार करावा.

भाग ५.

प्रतिज्ञा.

विवाहसमयीं होणाऱ्या प्रतिज्ञा वधुवरांस मुळींच समजत नस-तात. भटजीबुवा एकदांची पोथी वाचून जातात, वरास व वधूस मंत्र म्हणावयास सांगतात. तीं बिचारीं उपाध्येबुवा सांगतील ते शब्द पोपटाप्रमाणें म्हणतात, पण त्यांतील रहस्य त्यांस मुळींच कळत नसतें. तें कळावें, आपण विवाहप्रसंगीं कोणत्या शपथा वाहिल्या आहेत, आपण कसें वागावें, आपलें धर्मशास्त्र काय सांगतें, त्यांतील उदात्त विचार किती प्रगल्भ आहेत व ते आपल्या भावी संसार-यात्रेस कोणत्या प्रकारानें उपयोगीं पडतील, आपणावर जबाबदारी किती आहे वगैरे संबंधाची माहिती वधुवरांस असणें अत्यंत आवश्यक आहे. सध्याच्या-काळीं मुलांप्रमाणें मुलीही शिकलेल्या असतात, तेव्हां त्यांस दुसऱ्यांनीं सांगण्या-

पेक्षां त्यांनीं त्या स्वतः वाचाव्या व त्यांचें ज्ञान त्यांस व्हावें म्हणून खालीं दिल्या आहेत.

वर, वधू–ॐ समञ्जन्तु विश्वे देवाः समापो हृदयानि नौ।
सं मातरिश्वा संधाता समुदेष्ट्री दधातु नौ ॥

अहो, येथें विराजमान झालेले सर्व विद्वान् जन हो, निश्चयपूर्वक आम्हीं दोघेंही प्रसन्नचित्त होऊन गृहस्थाश्रमांत एकमेकांचा स्वीकार करून राहण्याचा निश्चय केला आहे. आमचें दोघांचेंही हृदय जलाप्रमाणें शांत राहून एकमेकांत मिळून राहील. प्राणवायु जसा आम्हांस प्रिय आहे, त्याचप्रमाणें आम्हीं एकमेकांवर सदा प्रसन्न चित्तानें राहूं. जगत् धारण कर्ता परमात्मा जसा यच्चावत् वस्तूंत भरून राहिला आहे, तसें आम्हीं आम्हां उभयतांत सारखें भरून राहूं. ज्याप्रमाणें उपदेशक श्रोत्यांवर प्रीति करतो, त्याप्रमाणें आम्हां दोघांचा आत्मा एकमेकांवर प्रेमानें राहो.

वर—ॐ यदैषि मनसा दूरं दिशोऽनुपवमानो वा।
हिरण्यपर्णो वैकर्णः स त्वा मन्मनसां करोतु असौ ॥

हे वरानने, ज्याप्रमाणें सूर्य, पवित्र वायु, आणि जल ह्यांस आपल्या किरणांनीं ग्रहण करून लांबच्या पदार्थांना त्याचप्रमाणें दिशांना प्राप्त होतो, त्याप्रमाणें तूं प्रेमपूर्वक आपल्या इच्छेनें मला प्राप्त झाली आहेस. एवढ्याकरितां परमात्मा तुला माझ्या मनाप्रमाणें वागण्यास अनुकूल करून आपल्या एकमेकांचें चित्त एक होण्यास समर्थ करो.

वर—ॐ भूर्भुवः स्वः। अघोरचक्षुरपतिघ्न्येधि शिवा पशुभ्यः सुमनाः सुवर्चाः। वीरसूर्देवकामास्योनाशन्नोभव द्विपदे शं चतुष्पदे ॥

हे वरानने, पतिबरोबर विरोध न करितां तूं त्याचें रक्षण कर, प्राणदाती, सर्व दुःख दूर करणारी, सुखस्वरूप आणि सर्वांना सुख देणारी ती तूं परमात्म्याच्या कृपेनें आणि आपल्या स्वतःच्या उत्तम प्रयत्नांनीं सर्वांस प्रिय हो. तूं मंगल करणारी, माझ्याकडील सर्व पशूंस सुख देणारी, पवित्र अंतःकरणाची, प्रसन्नचित्ती. सुंदर, शुभगुण, कर्म, स्वभाव आणि विद्येनें सुप्रकाशित उत्तम संतानांस प्रसवणारी,

दीर व इतर कुटुंबांतील मनुष्यें ह्यांजवर प्रेम करणारी सुखयुक्त होऊन आपल्या संतानांस व इतर माणसांस, त्याचप्रमाणें आपली गुरेंढोरें ह्यांस सुखदाती हो. मीही तुझ्या बरोबर तसेंच वर्तन ठेवीन.

वर—ॐ गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं मयापत्याजरदष्टिर्यथासः ।
भगो अर्यमा सविता पुरन्धिर्मह्यं त्वादुर्गार्हपत्याय देवाः ॥

हे वरानने, ऐश्वर्य, सुसंतान आणि तुला सौभाग्य देण्याकरितां व तें वाढविण्याकरितां मी तुझें पाणिग्रहण करतों. तूं माझ्याबरोबर वृद्धावस्थेपर्यंत सुखानें रहा. मी आजपासून तुझ्या बरोबर पतिभावानें राहीन. कारण स्त्रीनें एक पतिव्रत व पुरुषानें एक पत्नीव्रत आचरिलें पाहिजे. परम कृपाळु परमात्मा आणि मंडपांत विराजमान झालेले विद्वान् , गृहस्थाश्रमामध्यें धर्मानुष्ठान सुरळीत चालावें म्हणून, तुला माझ्या स्वाधीन करीत आहेत. मी आजपासून तुझा झालों. करितां तुझ्या मर्जीविरुद्ध आचरण मी कधींही करणार नाहीं.

वधू—आपण जो मंत्र ह्मणालांत, त्या मंत्रान्वयें मी माझ्या सौभाग्यवृद्धीकरितां आपला हस्त ग्रहण करतें. आपण माझ्याबरोबर वृद्धावस्थेपर्यंत प्रसन्नचित्तानें राहून माझ्याबरोबर अनुकूल वर्तन करावें. मी आजपासून आपली पत्नी ह्या भावानें राहीन. सकल ऐश्वर्ययुक्त, न्यायकारी, सर्व जगाचा उत्पत्तीकर्ता परमात्मा आणि ह्या मंडपांत विराजमान झालेले सर्व विद्वान् आपला गृहस्थाश्रम उत्तम चालावा ह्मणून, ह्या सर्वांना साक्षी ठेवून मी आपणांस वरलें आहे. मी आजपासून आपली झालें; व कधींही आपणाबरोबर जेणेंकरून आपणांस त्रास होईल असें आचरण ठेवणार नाहीं.

वर—ॐ भगस्ते हस्तमग्रभीत् सविता हस्तमग्रभीत् ।
पत्नी त्वमसि धर्मणाहं गृहपतिस्तव ॥

हे प्रिये, ऐश्वर्ययुक्त मी तुझें पाणिग्रहण करतों, आणि धर्मयुक्त कामांत तूं माझें प्रेरक बनावें, ह्मणून मी तुझें पाणिग्रहण केलें आहे. तूं माझी धर्मपत्नी आहेस, व मी तुझा धर्मानें गृहपति आहे. आपण दोघें मिळून कामसिद्धि करूं, व जें आपणा उभयतांस अप्रिय, असें आचरण कधींही आपण करणार नाहीं. आपण असें काम करूं कीं, जें आपणा उभयतांसही प्रिय होऊन सुख-

कारक व उत्तम संतान उत्पन्न करून देणारें, तसेंच ऐश्वर्य व सुखाची वृद्धि करणारें असें होईल.

वधू—आपण जी प्रतिज्ञा केली, तिचा मीही प्रतिज्ञापूर्वक स्वीकार करतें.

वर—ॐ ममेयमस्तु पोष्या मह्यं त्वादाद् बृहस्पतिः ।
मया पत्या प्रजावति शं जीव शरदः शतम् ॥

हे स्त्रिये, सर्व जगताचा पालक परमात्मा, त्यानें तुला माझ्या स्वाधीन केलें आहे, करितां ह्या जगांत मला अत्यंत सुख देणारी हो. माझ्याबरोबर शंभर शरद् ऋतुपर्यंत आनंदानें राहून मला सुख दे.

वधू—हे भद्रवीर, परमेश्वर कृपेनें आपण मला प्राप्त झालां अहां. आपल्या शिवाय ह्या जगांत मला कोणीच वंद्य नाहीं. मी आपल्या इच्छेप्रमाणें वागेन.

वर–ॐ त्वष्टा वासो व्यदधाच्छुभे कं बृहस्पतेः प्रशिषा कवीनाम् ।
तेनेमां नारीं सविता भगश्च सूर्यामिव परिधत्तां प्रजया ॥

हे शुभानने, परमात्म्याच्या कृपेनें आणि विद्वानांच्या अनुग्रहानें आपण एक झालों आहोंत. बीज ज्याप्रमाणें सर्व व्यापून राहिलें आहे, त्याप्रमाणें माझ्या प्रसन्नतेकरितां सुंदर वस्त्रें व नानालंकार परिधान करून सुखी हो. ही माझी आणि तुझी इच्छा परमेश्वर तृप्त करो. सर्वव्यापि परमेश्वर तुला ऐश्वर्ययुक्त संतान देऊन तुला त्याच्यायोगानें शोभिवंत करो. सूर्याचीं किरणें हीं जशीं पृथ्वीला तशींच वनस्पतीलाही सुशोभित करतात, त्याचप्रमाणें मी तुला उत्तम वस्त्रें व भूषणें देऊन सुशोभित करीन.

वधू—तथास्तु महाराज.

वर–इन्द्राग्नी द्यावा पृथिवी मातरिश्वा मित्रावरुणा भगो अश्विनोभा ।
बृहस्पतिर्मरुतो ब्रह्म सोम इमां नारीं प्रजया वर्धयन्तु ॥

हे माझे सगेसोयरे हो ! ज्याप्रमाणें वीज आणि अग्नि, सूर्य आणि भूमि, अंतरिक्ष वायु, प्राण आणि उदान, सद्वैद्य आणि सत्योपदेशक मनुष्य, सर्वांहून मोठे परमात्मा आणि चंद्रमा, सोमलतादि औषधि सर्व प्रजांची वृद्धि आणि पालन करितात, त्याप्रमाणें माझ्या पत्नीस तिच्या मुलांसहित उन्नतीला प्राप्त करा.

वर–ॐ अहं विष्यामि मयि रूपमस्या वेददित्पश्यन्मनसा कुलायम् ।
न स्तेयमद्मि मनसोदमुच्ये स्वयंश्रन्थानो वरुणस्य पाशान् ॥

हे प्रिये, ज्याप्रमाणें मी मनापासून कुलाची वृद्धि व्हावी हें इच्छितों, मी तुझ्या रूपाला मोहित होऊन तुझ्याबरोबर प्रेमानें वागतों, तशीच तूं माझ्यावर प्रेम करून अनुकूल व्यवहार चालीव. मी मनानेंसुद्धां कोणतीही गोष्ट तुझ्यापासून चोरून ठेवूं इच्छित नाहीं. कोणत्याही उत्तम पदार्थाचें गपचूप रीतीनें सेवन करूं इच्छित नाहीं. मी स्वतः पुरुषार्थ करून व उत्कृष्ट व्यवहारांत विघ्नरूप दुर्व्यसनी पुरुषांपासून अलिप्त राहून आपला संसार चालवीन, त्याप्रमाणें तूंही आपलें वर्तन ठेव.

वधू—तथास्तु महाराज, मी आपणासारखेंच वर्तन ठेवून आपणांस सुखी ठेवीन.

वर–ॐअमोऽहमस्मि सा त्वँ सा त्वमस्यमोऽहं सामाहमस्मि
ऋक्त्वं द्यौरहं पृथिवी त्वं वावेव विवहावहै सह रेतो
दधावहै ! प्रजां प्रजनयावहै पुत्रान् विन्दावहै बहून ।
ते सन्तु जरदष्टयः सं प्रियौ रोचिष्णू सुमनस्यमानौ ।
पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शतँ शृणुयाम शरदः
शतम् ॥

हे वधू, ज्याप्रमाणें मी ज्ञानवान् ज्ञानपूर्वक तुझें पाणिग्रहण करण्यास तयार झालों आहें, त्याप्रमाणें तूंही ज्ञानपूर्वक माझें ग्रहण कर. तुझा व माझा जो संबंध झाला आहे तो " प्रजायैत्वानयामसि " (अथर्व ५।५।२५) तो संतानोत्पत्तिसाठीं झाला आहे. मी *सामवेदतुल्य प्रसंशित आहे. हे वधू, तूं ऋग्वेदतुल्य

---

* ऐतरेय ब्राह्मण (पं. ३ खं. २३) यांत तसेंच छांदोग्य उपनिषद प्रथम अध्याय ६।७ खंडांत सामाचा इतिहास दिला आहे तो येणेंप्रमाणें:—

पूर्वी ऋचेला सा आणि सामाला अम असें नांव होतें, एके दिवशीं सा अमाजवळ जाऊन आपण उभयतां पति पत्नी होऊन प्रजोत्पादन करूं म्हणून तिनें आपली इच्छा प्रकट केली. हा विचार अमाला मुळींच रुचला नाहीं, कारण तो स्वतःस थोर समजत असे, व मी बायकोच्या नादीं लागून माझा थोरपणा गमवावा हें ठीक नाहीं, असें म्हणून त्यानें तिला हांकून लाविलें. कांहीं दिवस लोटल्यावर पुनः दोन सा एकत्र होऊन अमाकडे आल्या, व दांपत्य संबंध करण्याविषयीं विनवणी करूं लागल्या, पण त्यानें त्यावेळीं सुद्धां त्यांचा

प्रसंशित आहेस. तूं पृथ्वीसमान गर्भादि गृहस्थाश्रमांत व्यवहार धारण करणारी आहेस आणि मी वर्षाव करणारा सूर्यासारखा आहे. तुझा माझा प्रेमपूर्वक विवाह झाला आहे. आपण उत्तम प्रजायुक्त होऊन पुष्कळ संतान उत्पन्न करूं कीं जे पुत्र वृद्धावस्थेपर्यंत जीवंत राहतील. आपण परस्पर प्रसन्न चित्तानें रुचतील असे उत्तम प्रकारें विचार करूं, व शंभर शरदृतु म्हणजे शंभर वर्षेंपर्यंत परस्पर प्रेमानें राहूं, शंभर वर्षेंपर्यंत सुखानें राहूं व शंभरवर्षेंपर्यंत एकमेकांच्या वचनाचें रक्षण करूं.

वधू—तथास्तु महाराज, आपलें म्हणणें सत्य होवो.

वर—वरानें वधूच्या उजव्या खांद्यावरून आपला उजवा हात वधूच्या हृदयाला लावून—

ॐ मम व्रते ते हृदयं दधामि मम चित्तमनुचित्तं ते अस्तु ।
मम वाचमेकमना जुषस्व प्रजापतिष्ट्वा नियुनक्तुमह्यम् ॥

हे वधू, तुझ्या अंतःकरणाला आणि तुझ्या आत्म्याला, तुझ्या धर्मानुष्ठानाला अनुकूल आचरण धारण करतों. माझ्या चित्तानुकूल तुझें चित्त राहूं दे. माझ्या वाणीला एकाग्रचित्तानें श्रवण कर. प्रजापालक परमेश्वर तुला माझ्याकरितां नियुक्त करो.

वधू—हे प्रिय स्वामीन्, आपलें हृदय, आत्मा आणि अंतःकरण माझ्या प्रिय आचरणांत धारण करतें. माझ्या चित्तानुकूल तुमचें चित्त राहो. आपण एक-

---

निषेध केला. तरी पुनः कांहीं काळ लोटल्यावर तिघी सा एकत्र होऊन आपला पूर्व हेतु निर्दिष्ट केला. त्यावेळीं मात्र तो विचारांत पडून म्हणूं लागला कीं एकीला नाहीं म्हटलें, दोघींना नाहीं म्हटलें, तरी पुनः तिघी आल्या. आतां जर नाहीं म्हणावें तर आणखी किती येतील कोणास ठाऊक ! असा पूर्ण विचार करून त्यानें त्यांच्या म्हणण्यास रुकार दिला, व पति व पत्नी ह्या नात्यानें राहूं लागलीं. त्यावेळेपासून यज्ञांत स्तोत्र व उद्गातृत्व हीं कर्मे तीन तीन ऋचांनीं करूं लागले, ह्यावरून सामान्य सिद्धांत असा निघूं शकेल कीं एका पुरुषाला अनेक स्त्रिया होऊं शकतात; पण एका स्त्रीला अनेक पति होऊं शकत नाहींत. आतां असा जरी सामान्यार्थ आहे, तरी एक स्त्री जिवंत असतां अनेक स्त्रिया करणें हें शास्त्राला तसेंच रूढीला धरून नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांतील इतिहास हें दाखवितो कीं सामासारखा पति ऋचारुपी अनेक पत्नींचा स्वीकार करून ज्ञान देणारा आहे. आपल्या गायनानें चित्त रममाण करणारा आहे, करितां त्याची महति गायिली आहे.

चित्त करून मी जें कांहीं आपणाला सांगतें तें श्रवण करावें. कारण आजपासून प्रजापति परमात्म्यानें मला आपल्या स्वाधीन केलें आहे. करितां आपण केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें आपलें वर्तन राहिलें पाहिजे, कीं जेणेंकरून आपण सदा आनंदांत राहूं. कीर्तीला वाढवूं व परस्परांत अप्रिय भाषण कधींही करणार नाहीं.

वधू—ॐ ध्रुवमसि ध्रुवाहं पतिकुले भूयासम् ।

हे स्वामीन् , मी आपली अर्धांगी, माझ्या पतीच्या कुळांत निश्चल राहीन, आपण माझे पति जसे दृढ निश्चयाचे आहां, तशीच मी तुमची पत्नी दृढ निश्चयानें राहीन.

वर—ॐ ध्रुवा द्यौर्ध्रुवा पृथिवी ध्रुवं विश्वमिदं जगत् ।
ध्रुवासः पर्वता इमे ध्रुवा स्त्री पतिकुले इयम् ॥

हे शुभगे, ज्याप्रमाणें सूर्याची कांति सूर्यलोकांत तशीच पृथ्व्यादिकांत निश्चल आहे, जशी पृथ्वी आपल्या स्वरूपांत स्थिर आहे, जसा पहाड स्वतःच्या स्थितींत स्थिर आहे, तशी तूं माझ्या कुलांत स्थिर रहा.

वर-ॐ ध्रुवमसि ध्रुवन्त्वा पश्यामि ध्रुवैधि पोष्ये मयि मह्यं त्वादात् ॥
बृहस्पतिर्मया पत्या प्रजावती सं जीव शरदः शतम् ॥

हे शुभांगे, तूं ज्याप्रमाणें माझ्यापुढें दृढ संकल्प करून स्थिर आहेस, व मी तुला दृढस्थिर पाहतों, त्याचप्रमाणें तूं मजबरोबर नेहमीं दृढ रहा. परमेश्वर तुला माझ्या चित्तानुकूल करून चुकला आहे. आपण उत्तम प्रजावान् होऊन शंभर वर्षेंपर्यंत जगूं व धारण पोषण करण्याला तूं माझ्याबरोबर निकट स्थिर रहा.

वर—ॐ अन्नपाशेन मणिना प्राणसूत्रेण पृश्निना ।
बध्नामि सत्यग्रन्थिना मनश्च हृदयं च ते ॥

ज्याप्रमाणें अन्नाबरोबर प्राण, प्राणाबरोबर अन्न, त्याचप्रमाणें प्राण व अन्न ह्यांचा अंतरीक्षाबरोबर संबंध आहे, त्याचप्रमाणें माझें हृदय, मन आणि चित्त ह्यांना सत्याची गांठ मारतों.

वधू—मीही पण ह्याच मंत्रानें आपल्याबरोबर तशीच प्रतिज्ञा करतें.

वर—ॐ यदेतद्धृदयं तव तदस्तु हृदयं मम ।
यदिदँ हृदयं मम तदस्तु हृदयं तव ॥ १७ ॥

हे चंद्रानने, तुझा आत्मा आणि तुझें अंतःकरण, माझा आत्मा आणि माझें अंतःकरण समान प्रिय व्हावें, माझा आत्मा, प्राण आणि मन हीं तुझा आत्मा, प्राण आणि मन ह्यांजबरोबर सत्यतारूपी गांठीनें बांधतों.

वधू—हे स्वामिन्, आपलें अंतःकरण आणि आत्मा, माझें अंतःकरण आणि आत्मा हीं तुम्हांस जशीं प्रिय आहेत, तशींच मलाही प्रिय व्हावीं, व माझें अंतःकरण आत्मा व मन माझ्या आत्म्याप्रमाणें तुम्हांलाही प्रिय व्हावींत.

वर—ॐ अन्नं प्राणस्य षड्विं॰शस्तेन बध्नामि त्वा असौ ।

हे सुभगे, प्राणाचें रक्षण करणारें जें २६ वें तत्त्व अन्न आहे, त्याबरोबर मी तुला प्रीतिपूर्वक बांधतों, म्हणजे अन्नवस्त्रादिकांनीं तुझें भरण पोषण करीन.

वधू—तथास्तु महाराज.

वर-ॐ आ नः प्रजां जनयतु प्रजापतिराजरसाय समनक्त्वर्यमा ।
अदुर्मङ्गलीः पतिलोकमाविश शन्नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥

हे प्रिये, न्यायकारी दयाळु परमात्मा दया करून वृद्धावस्थेपर्यंत जगावें म्हणून माझ्या उत्तम प्रजेस शुभगुणकर्म व स्वभावानें पूर्ण करो. त्याच्यायोगानें उत्तम सुखाला प्राप्त होवोत. शुभगुणयुक्त स्त्री कुटुंबांत असल्यास ती सर्व स्त्रीवर्गाला आनंद देते, त्यांतलीच हे शुभांगे, तूं एक आहेस, माझ्या घरीं येऊन सुखी हो. माझ्या मातापितरांस त्याचप्रमाणें माझ्या गुराढोरांस सुख देणारी हो.

वर—ॐ सम्राज्ञी श्वशुरे भव सम्राज्ञी श्वश्र्वां भव ।
ननान्दरी सम्राज्ञी भव सम्राज्ञी अधिदेवृषु स्वाहा ॥

हे वरानने, तूं माझा पिता जो तुझा सासरा त्याच्यावर प्रीति कर व स्वंप्रकाशमान् चक्रवर्ति राजाच्या राणीसमान पक्षपात विरहीत हो. माझी आई जी तुझी सासू तिच्याही आज्ञेंत सम्राज्ञीप्रमाणें वाग. माझी बहीण जी तुझी नणंद व माझा भाऊ जो तुझा दीर त्यांच्याबरोबर अधिकारयुक्त होऊन प्रेमानें वाग. सारांश कोणाच्याही बरोबर विरोध न करितां प्रेमपूर्वक आचरण कर.

वधू—तथास्तु महाराज, आपली आज्ञा मला शिरसा वंद्य आहे.

वर दिल्याप्रमाणें विवाहांत वधूवरें ही प्रतिज्ञा करतात, त्यांत केलेल्या उपदेशाप्रमाणें वागल्यास दोघांचाही संसारगाडा सुखानें गेला, तर त्यांत नवल तें कोणतें! वरील प्रतिज्ञांकडे लक्ष दिलें असतां असें आढळून येईल कीं वधू ही वयांत आलेली असली पाहिजे, त्याशिवाय वराकडून जें तिला सांगितलें जातें, त्याचा बोध होण्याचा मुळींच संभव नाहीं. एवढ्यावरून निर्विवाद असें सिद्ध होतें कीं पूर्वकालीन होणारे विवाह हे बालविवाह नसून प्रौढविवाहच असले पाहिजेत.

यज्ञसमाप्ति.

यज्ञ करतेवेळेस यज्ञ करणारास हाताला *कंकण बांधावें लागतें, कारण तो यज्ञसमाप्तिपर्यंत व्रतस्थ असतो. तशीं वधुवरेंही कंकणबंधनानें व्रतस्थ असतात. कंकण बांधणें हें व्रतस्थाची अगर दीक्षेची एक खूण आहे. विधिपूर्वक पारतंत्र्याचें नांव दीक्षा. उत्तम काम करणारास "पुरुषो वाव यज्ञः" असें म्हटलें आहे. जेवढें जेवढें म्हणून उत्तम काम त्यास यज्ञ असें म्हणतात. ज्याच्याकरितां जें जें विहित तो यज्ञ. विवाहांत सूत्र वेष्टनाचें जें कच्चें सूत असतें त्यास पीळ घालून त्यांत हळकुंड बांधून त्याचें कंकण बनवितात. हळद ही रक्त शुद्ध करणारी असल्यामुळें ती आंगाला लावून विवाहांत वधुवरांस आंघोळ घालण्यांत येते. ह्यामुळें शरीर प्रकृति नीट राहावी व दीक्षेचेंही पालन व्हावें हा दुहेरी हेतु असतो. दीक्षा ही नेहमीं कष्टदायक असते. यज्ञ करणारास जसें दीक्षा घेतल्यावर यज्ञमंडप सोडून बाहेर जातां येत नाहीं, त्याचप्रमाणें विवाह्य हाही दीक्षेनें बांधला जाऊन त्यासही लग्नमंडप सोडून बाहेर जातां येत नाहीं. जर त्यास बाहेर जाणें असेल, तर त्यानें एकटें दुकटें न जातां वाजत गाजत चार शिष्ट मंडळीसहित वधुगृहीं जावें. वरानें वधुगृहीं जाण्याचें कारण स्त्रियांचा मान मोठा आहे. "गृहे

---

* दृष्टीविकार होऊं नये म्हणून किंवा वधुपक्षी तिच्या स्वजनांची वृद्धि व वरपक्षी तो इतःपर संसारांत बद्ध झाला हें दाखवितें. कंकण बांधून झाल्यावर रागद्वेषादिकांस बाजूला ठेवावें लागतें. व प्राणी निर्वैर बनतो, नव्हे, बनला पाहिजे. कन्येचा पिता कन्येचें पालन पोषण करतो, एवढें झाल्यावर ती उपवर झाल्यावर तिचें विधिपूर्वक दान केलें कीं तो जबाबदारींतून मोकळा होतो. विवाहप्रसंगीं कंकणबंधन झालें कीं, सर्व जबाबदारी तिच्या पतीवर येऊन पडते.

उत्पाद्य कन्यां न ममेति दाता। पिता विमुक्तो भवतीह लोके॥
निबध्यते कंकण बंधनेन। वरो विवाहेऽत्र तथैवकर्ता॥

लक्ष्म्यो मान्याः सततमबला मानविभवैः ” “ *स्त्री ही घरांतील लक्ष्मी आहे, व स्त्रिया ह्या अबला असल्याकारणानें त्यांचा मानही मोठा आहे. पुढें होणारी जी गृहलक्ष्मी तिला आपल्या गृहीं आणण्यापूर्वींच योग्य मान द्यावा, ह्या भावनेनें वर वधूच्या गृहीं जातो. विवाहकालीं वधूचा पिता अगर वराचा पिता हे दोघेही “अनश्नन् ” म्हणजे कांहीं खात किंवा पीत नसतात, त्यांस बहुधा उपोषणच असतें. ह्याचें कारण त्यांजकडे येणारे जे पाहुणे त्यांस भोजन करतांना पाहूनच त्यांची तृप्ति होते. व जर यदाकदाचित् कोणी त्यांस जेवणाचा आग्रह केला, तरी त्यांस पोटभर जेवावेंसें वाटत नाहीं. वधुवरांची कंकण ही जशी दीक्षा, त्याच-प्रमाणें त्यांच्या मातापितरांची “ स यदशिशिषति यत्पिपासति यन्न रमते ता अस्य दीक्षाः” स्वतः भोजन न करतां किंवा पाणी न पितां आल्यागेल्याचा सत्कार करणें, त्यांस जेऊं घालणें, हीच त्यांची दीक्षा होय. यज्ञ समाप्तीचे वेळेस ब्राह्मणांस दक्षिणा दिल्यावांचून जशी यज्ञसमाप्ति होत नाहीं, तशी वधुवरांच्या मातापितरांच्या यज्ञसमाप्तीची पूर्ति आमंत्रितांस पानसुपारी, टिळाविडा, साखर व नारळ देऊन त्यांची बोळवण करणें ही विवाह समाप्तीची दक्षिणा होय.

देव देवक उठवून झाल्यावर ह्या यज्ञाची समाप्ति होते. वधुवरांचें कंकण सोडण्यांत येतें, त्यावेळीं “ षट्सु षट्सु मासेषु ” म्हणजे दर सहा सहा महिन्यांनीं असेच शुभ प्रसंग आमचे येथें येऊन आमच्या हातून अन्नसंतर्पण, दानधर्म व गृहस्थाश्रमाचें चीज व्हावें, अशा शुभ इच्छेनें विवाहकार्याची समाप्ति करण्यांत येते.

---

* स्त्रियांची योग्यता मोठी असल्याकारणानें त्यांचा मानही मोठा आहे. त्यांच्याच पोटीं भद्र पुरुष जन्मास येतात. ह्मणूनच प्रथमारंभीं त्यांचेच नांवाचा उच्चार करून मग पुरुषाच्या नांवाचा उच्चार केला जातो. जसें “ सीताराम ” “ राधाकृष्ण ” “ लक्ष्मीनारायण ” “ गौरीहर ” “उमामहेश ” असें जरी आहे तरी कित्येक ठिकाणीं शंकरपार्वती, विठ्ठल रखुमाई असेंही ह्मणतात. काव्यग्रंथांतून परमेश्वर प्रार्थनेचे वेळीं स्त्रीजातींचें नांव घेऊन मग पुरुषाचें घेतलें आहे. “ जगतः पितरौ वंदे पार्वतीपरमेश्वरौ ” (रघुवंश) “ पार्वतीवल्लभ सदाशिव ” महान् कवि तुळशीदास हे मोठे रामभक्त होते, त्यांनीं हिंदी भाषेंत रामायण रचलें आहे. हें रामायण त्यांनीं काशीस रचलें. हे जरी कट्टे रामभक्त होते, तरी काशीची स्थानिक देवता श्रीशंकर असल्याकारणानें त्यांचीच स्तुति त्यांनीं ग्रंथारंभीं केली आहे त्यांत “ भवानी शंकरौ वन्दे श्रद्धा विश्वास रूपिणौ ” ह्यावरून पूर्वीपासून स्त्रियांस मान देण्याची वहिवाट आमच्यांत असली पाहिजे हें उघड आहे. हल्लीं स्त्री ही घरांतील बटीक अशी जी कित्येकांची समजूत आहे, तशी ती त्यावेळीं नसावी.

आम्हीं आर्यलोक उत्सवप्रिय असल्याकारणानें कोणताही उत्सव थाटाचा करतों. मंगलवाद्यें, पालख्या, घोडे, रथ, शृंगारलेल्या हत्तीवरून मिरवणुकी वगैरे प्रकार आमच्या आर्यावर्तात जेवढ्या प्रमाणानें होतात, तेवढ्या प्रमाणानें हिंदुस्थानाबाहेर होत नसतील ही गोष्ट निर्विवाद आहे. आमच्या येथील ऐषआरामाचे प्रकार निराळे व इतर देशांतील निराळे, त्यांस एवढें भव्यस्वरूप आमच्या येथील उत्सवाप्रमाणें येत असेल असें वाटत नाहीं. लग्न लागल्यावर परतनावळ, *वरात अगर मांडव परतणी होते, तिचा थाट तर अपूर्वच असतो. त्यावेळेस वर व वधू हीं राजा व राणीप्रमाणें वाजत गाजत आतषबाजीच्या लखलखाटांत वर आपल्या नूतन पत्नीसह †घरीं जातो, त्यावेळेस त्याला त्याच्या नांवानें न म्हणतां नवरदेव अगर वरराजा असें म्हणतात, त्यावेळेस त्याचा मानही तसाच असतो. राजा-शहरांतून राजकीय थाटानें आपल्या राजधानींत अगर दुसऱ्या शहरीं जातो, त्यावेळेस त्याच्या लष्कराच्या, घोड्यांच्या अगर इतर थाटमाटाकडे लोकांचें लक्ष विशेष तऱ्हेनें न जातां राजदर्शनाकरितां उत्सुक असतें, त्याचप्रमाणें वरातीचे वेळेस सर्व लोकांचें लक्ष व डोळे ह्या वरराजाकडे अगर नूतन जोडप्याकडे लागलेले असतात.

विवाहसमयीं होणारा खर्च.

आतां ह्या विवाहाच्यावेळीं होणाऱ्या अतोनात द्रव्याचा जो विनाकारण चुराडा उडतो, त्याकडे लक्ष दिलें तर, बराच पैसा अकारणीं खर्च होतो ह्यांत संशय नाहीं. उत्सव करावा, पण तो बेताबातानें हात राखून केला असतां मागाहून पश्चात्तापास कारण उरत नाहीं, जेवणावळी म्हणजे त्या महिना महिना चालावयाच्या, भेटी, देवघेवी पंधरा पंधरा दिवसपर्यंत चालू असतात. अन्नाचा नाश किती होतो, ह्याची गणतीच नाहीं. एवढा प्रकार होतोच, पण हुंडा देणें घेणें ह्या अनिष्ट चालीनें तर कित्येक मुली अविवाहित राहिलेल्या आपण पाहतों. मुलीच्या बापास कर्ज काढावें लागतें, त्यास आपलें घरदार गहाण टाकण्याची

* संस्कृतांत समुदायाला "व्रात" ह्मणतात, त्याचाच अपभ्रंश वरात होय. "नमो व्रातपतये" असें गणेशउपनिषदांत श्रीगजाननाचें वर्णन आहे.

† वधूप्रवेश होईतोंपर्यंत वरानें श्वशुरगृहींच वास करावा, ह्याचें कारण त्यास गृह्याग्नि व वधूसहित सुमुहुर्तानें आपल्या घरीं जावयाचें असतें.

पाळी येते, व ह्या हुंड्याच्या बाबतींत वारंवार अनिष्ट व शोचनीय प्रकार घडून येतात. हें सर्वांस महशूर आहेच. श्रीमंताकडे मुली देणें म्हणजे प्रथमतः हुंडा किती द्याल ह्याचा खल होतो, त्याचप्रमाणें गरीब अगर साधारण स्थितींतल्या मनुष्यानें आपलें लग्न करावयाचें मनांत आणलें तर मुलीचा बाप प्रथमतः आपली पैसे भरण्याची शक्ति कोठपर्यंत आहे ह्याची विचारणा करतो. जणूं काय, त्या कन्येचा बाजारांतल्या वस्तुप्रमाणें सौदा चालला आहे. जो जास्त पैसा मोजील त्याला मुलगी द्यावयाची हा बापाचा कृतसंकल्प असतो. मग तो म्हातारा असो, पांगळा असो, कसाही असो, बापास पैसा मिळाल्याशीं कारण. मुलीच्या कल्याणाकल्याणाची त्यास मुळींच काळजी नसते. जावयास पैसा देणें म्हणजे तो विकत घ्यावयाचा अशा व्यवहारास हुंडा म्हणतात, व मुलीच्या बापास पैसा देऊन ती विकत घेणें अशा व्यवहारास कन्याविक्रय म्हणतात. हुंडा हें संभावित नांव ह्या व्यवहारास मिळत नाहीं. विहिणीचें, व्याह्याचें व जावयाचें रुसणें फुगणें व त्यांची समजूत घालणें वगैरे प्रकार होतात ते निराळेच. मुलीच्या बापास अगर आईस व्याही मंडळीची मनधरणी व पायधरणी करतां करतां पुरेवाट होते. व तीं मनांत म्हणतात कीं ही व्याधी–पण सुधारलेलें नांव व्याही–नको, पुरे झाली. वरमातेचा कोण तोरा, कोण थाट, कोण मान, जरा कोठें थोडें चुकलें कीं गेलीच हिची मिजास. पायघडी अशीच घातली, तशीच घातली म्हणून पायघडीसंबंधानें जें काहूर माजतें तें तर पुसूंच नका. पायघडीवरून एकदां मिरवत गेलें कीं पुत्रप्रसववेदनेचेवेळीं झालेल्या दुःखाचा तिला विसर पडतो. चौरी, चौरंग, गुलाल व पायघडी ह्यांचा एकदां का मान मिळाला कीं ह्या बाईला मी कृतकृत्य झालें, असें वाटून गर्वानें फुगून जाते. लग्नांत विहिणीचा जो दिमाख असतो, तेवढा व्याह्याचा नसतो. विहीण सांगेल ती पूर्वदिशा व बोलेल तो शब्द, त्यापुढें कोणाची मात्रा चालावयाची नाहीं.

लग्नसमारंभ आटोपल्यावर दाराशीं मागणेकरी येतात. कापडवाला, दाणेवाला, सोनार, बाजेवाला असे एक का दोन, सर्वांस जबाब देतां देतां व वायदे करतां करतां बिचारा अगदीं डबघाईस येतो. पैशाची थोडीबहुत फेड झाली तर ठीक, नाहीं तर सावकार बिचाऱ्याचा वरघोडा काढतात. लग्नसमयीं वधु-

वरांचें वरघोडें निघालें होतें, व लग्न आटोपल्यावर त्यांच्या आईबापांचें वरघोडें निघतें. हात राखून बेताबातानें जर खर्च केला असता तर वरघोड्याची पाळी न येतां सर्व कार्य आनंदांत गेलें असतें. कित्येक जातींत फाजील चालीरीति असल्याकारणानें नेहमीं घोटाळे, तंटेबखेडे, मानपान, टिळाविडा वगैरे अनेक भानगडीचे प्रश्न उपस्थित होऊन कोर्टापर्यंत प्रकरणें गेलेलीं आपण पाहतोंच. आपणांस थोडेंसें ज्ञान झालेलें आहे, जागृति झाली आहे, अनुभव येत चालला आहे, अशावेळीं जुन्या विचारांस, वेडगळ चालीरीतीस हळुहळु फांटा देऊन उत्तम व धार्मिक म्हणून जेवढ्या चाली असतील, तेवढ्याच ठेवण्यांत कोणता प्रत्यवाय आहे. हल्लीं जातीजातींच्या सभा, परिषदा वगैरे भरविण्यांत येतात, अशावेळीं सर्वांनीं एक विचारानें आपल्या समाजांतील विवाहप्रसंगीं होणाऱ्या वाईट चाली समूळ नाहींशा करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांत सर्वांचें कल्याण आहे, व विवाहाच्या शुद्ध स्वरूपाची मांडणी केल्यास उभय पक्षांसही हितप्रद होईल.

ॐ सौभाग्यमस्तु, ॐ शुभं भवतु.

भाग ६.

पारस्करगृह्यसूत्रावरून यजुर्वेदीय विवाहपद्धति.

पारस्करगृह्यसूत्रें हीं माध्यंदिन शाखेच्या यजुर्वेद्यांकरितां ग्रथित केलीं असल्याकारणानें आश्वलायन गृह्यसूत्राप्रमाणें चालणारीं कर्मे ह्यांत फेर असणें जरूर आहे करितां पारस्करगृह्यसूत्रांवरून चालणाऱ्या कर्मांची माहिती किंवा तिची दिशा दाखविण्यास यथामति सारांशरूपानें उपक्रम केला आहे, व तो कर्म करणारांस मार्गदर्शक होऊन कर्म करतांना अडचण पडणार नाहीं, अशी योजना करण्यांत आली आहे.

गृह्यसूत्रकारांनीं प्रथमतः अष्टविवाहविषयींची माहिती देऊन नंतर विवाहकाल, कन्यादानाचा अधिकार, वेदी कशी असावी वगैरे माहिती देऊन विवाहाच्या अगो-

दर हेरंबपूजन, तैल, हरिद्रा, पेषण कांडण, मंडप हीं कर्में करावीं. प्रथम सीमांतपूजन करून झाल्यावर शुभदिनीं कलश त्याचप्रमाणें *उपाध्याय, इतर ब्राह्मण, इष्टमित्र, वाद्य, युग्मवस्त्रें (दोन वस्त्रें) भूषण तांबुलादि घेऊन †कन्येच्या गृहीं जावें. तेथें उत्तम आसनावर पश्चिमाभिमुख वरपित्यानें व पूर्वाभिमुख कन्येच्या पित्यानें बसून कन्येस आपल्या उजव्या हातास बसवावें. त्यावेळीं गणपतिपूजन व कलशस्थापन करून वाग्दानाचा संकल्प कन्येच्या पित्यानें करावा, तो "कन्या विवाहांगभूतं-करिष्ये" पर्यंत व वराच्या पित्यानें "करिष्यमाण पुत्र विवाहांगभूतं कन्या निरीक्षणं पूजनंच करिष्ये" असें ह्मणून करावा. गणपतिपूजन करून झाल्यावर प्रथम वरपक्षाकडून गोत्रोच्चार व्हावा. वरपित्यानें कन्या निरीक्षण करून वस्त्रभूषणादिकें करून तिचें पूजन (सत्कार) करावा. ‡वरपिता व कन्यापिता ह्यांनीं परस्परांचें

---

* उपेत्याधीयते अस्मात्—जो विद्यार्थ्यांस वृत्यर्थ विद्या शिकवितो, तो उपाध्याय. हा आचार्यापेक्षां कमी दर्जाचा असतो. मनु म्हणतात—

एकदेशं तु वेदस्य वेदांगान्यपि वा पुनः ।
योऽध्यापयति वृत्यर्थमुपाध्यायः स उच्यते ॥

उपजीविकेकरितां मंत्र ब्राह्मणांचें अध्ययन सांगणारा किंवा व्याकरणादिक शिकवितो तो उपाध्याय. "उपेत्य यस्मात् अधीते स उपाध्यायः" विद्यार्थी ज्याच्या घरीं जाऊन यथाशास्त्र अध्ययन करितो, तो उपाध्याय.

† कन्या हें एक रत्न आहे. ह्या रत्नाची पारख करणारा तसाच रत्नपारखी लागतो. रत्नें हीं घरोघर भाजीपाल्यासारखीं विकलीं जाणारीं नव्हत, तर तीं खरेदी करण्यास दुकानावरच गेलें पाहिजे. रत्नें विक्रीकरितां दारोदार फिरूं लागलीं तर त्यांची किंमत कोठें राहिली? तसेंच कन्यारूपी रत्न हें त्या रत्नाचे पालक जर त्या रत्नाला देण्याकरितां घरोघर फिरून त्या रत्नाला हिंडवूं लागले, तर, पालकाला व घेणारालाही त्याची किंमत कळली नाहीं असेंच ह्मणावें लागतें. त्या रत्नाची पारख करणारा रत्नपारखी येऊन त्याची मागणी करील, त्यावेळीं त्या रत्नाच्या पालकांनीं योग्य तो विचार करून खुशाल जबाब द्यावा. कन्यारत्न हें उच्च कुलांतच उत्पन्न होतें, व नीच कुलांत त्याचा अभाव असतो असें मुळींच नाहीं. हिरे हे कोळशांच्या खाणींत सांपडतात. कोळशांच्या खाणींत सांपडतात ह्मणून त्यांस कोणी झुगारून देत नाहीं, द्रव्यराशी देऊन खरेदी करतात तसेंच "स्त्रीरत्नं दुष्कुलादपि" वाईट कुलांत जरी कन्यारत्न उत्पन्न झालें तरी त्याचा अव्हेर करणें हें योग्य नव्हे

‡ ह्याच्या अभावीं त्यांच्या गोत्रांतील इतर कोणीही असला तरी चालेल.

पूजन करावें. त्यावेळीं हरिद्राखंड्युत पांच पूगीफलें घेऊन कन्येच्या पित्यानें " अव्यंगे पतिते " हा मंत्र ह्मणून वरपित्याच्या वस्त्रांस तीं बांधावीं. ह्यावेळीं पुन: गोत्रोच्चार करावा तो अमक्या अमक्याच्या मुलाला " वाचादत्तामयाकन्या " माझी कन्या दिली असें ह्मणावें. वरपित्यानें " वाचादत्तात्वयाकन्या " हा मंत्र म्हणून कन्येच्या पित्याचे वस्त्रास गांठ द्यावी. नंतर तांदुळाचे राशीवर त्या हरिद्राखंडयुताचें द्रव्य ठेवून कन्येकडून शचीपूजन करवावें. शचीपूजनानंतर " देवेंद्राणि नमस्तुभ्यं " हा मंत्र कन्येकडून ह्मणवावा. एवढें झाल्यावर औक्षण (आरति करणें) करून आशीर्वादापर्यंत कर्म करवावें. विवाहदिनाच्या पूर्वी कन्येचा पिता व वरपिता ह्या उभयतांनीं आपापल्या घरीं मंगलस्नान करून आपापल्या पत्नीसहीत बसून गणपतिपूजन, स्वस्तीपुण्याहवाचन, मंडपस्थापना, मातृकापूजन, नांदिश्राद्धादि कर्में करावीं. विवाहाच्या दिवशीं घटीयंत्रपूजन, प्रार्थना वगैरे करून ती घटी ज्या ज्या दिशेला जाईल, त्या त्या दिशेची फलश्रुति जोतिषग्रंथांत पहावी. कन्येकडून विवाहापूर्वी गौरीहरपूजनाचेवेळीं देवकस्थापनेजवळ जो दीप असतो, त्या दिपाची वात कन्येच्या उंची बरोबरीचें सूत्र घेऊन तिची " सप्तविंशति तंतुभि: " ह्मणजे ती २७ हिश्शानें वाळावी, व ती वात त्या दिव्यांत घालावी असा शिष्टाचार आहे. वाग्दानाचें कर्म करून झाल्यावर कन्येच्या पित्यानें गंधाक्षत वस्त्रादिक साहित्य घेऊन ब्राह्मण व सुवासिनीसहवर्तमान वाद्यघोषांत वराच्या गृहीं सीमांतपूजनासाठीं जावें. वरास विवाहाकरितां आपल्या घरीं आणण्याकरितां पूर्वीप्रमाणेंच मंगलघोषानें जाऊन वरास आमंत्रण द्यावें. ते समयीं आंदण वगैरे जें देणें असेल तें बरोबर नेण्याचा प्रघात आहे. वधुमंडपांत विवाहाकरितां येतांना वराच्या हातांत श्रीफल असावें, व वरास आमंत्रण देतेवेळीं असें सांगावें कीं, अश्वावर, रथांत, पालखींत किंवा गाडींत अगर पायानें आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें आपण यावें. वर वधुगृहीं आल्यावर मंडपद्वारीं वस्त्रादिकेंकरून त्याला भूषित करून शिष्टाचार करावा. वधूच्या पित्यानें पत्नीसह वरास मंडपांत नेऊन वेदीसमीप शुभासनावर बसवून मधुपर्कादिक कृत्यें करावीं, त्यावेळीं विष्टर बाहुमात्र किंवा हस्तमात्र असावा. मधुपर्काचेवेळीं आचमनार्थ जल, पादप्रक्षालनार्थ जल, अर्घ्याकरितां शंखोदक, यज्ञोपवीत एवढी सामुग्री घेऊन कांसपात्रासहित कन्येच्या पित्यानें पूर्वाभिमुख बसून वरास उत्तमासनावर पश्चिमाभिमुख बसवावें. श्रीगजाननाचें स्मरण करून हात जोडून " ॐ साधु

ो भवंतम्" हा मंत्र ह्मणावा. त्यावेळीं वरानें "अर्चय" असें
खालीं घालण्यासाठीं एक विष्टर द्यावा, त्यावेळीं "विष्टरो विष्टरो
' असा तीन वेळ उच्चार करावा, व वरानें "प्रतिगृण्हामि"
ानदां "पादार्थमुदकं" ह्मणून "विराजोदोहोसि" हा मंत्र ह्मणून
व नंतर डावा ह्याप्रमाणें *पाय धुवावे. पाय धुतेवेळीं पाणी
: विष्टर द्यावा. नंतर "†अर्घोऽर्घोऽर्घः प्रतिगृह्यताम्"
पुनः तीन वेळ "आचमनीयमुदकं प्रतिगृह्यताम्" असें
नंतर "वर्ष्मोस्मि समानानामुद्यतामिव सूर्यः" हा मंत्र ह्मणावा.
ध्यावीं. आचमनानंतर "मधुपर्को मधुपर्को मधुपर्कः"
र्क वराचे उजवे हातावर देऊन त्यानें त्याचें तीन वेळ निरी-
तो डाव्या हातांत घेऊन मग उजव्या हाताच्या अनामिकेनें
डन करून अनामिका व अंगुष्ठ ह्यांनीं तीन वेळ तो बाहेर
ाशन करावें व आचमन घ्यावें. मधुपर्क हातांत असतां-
ागतो, ह्यावेळीं ‡उच्छिष्टाचा भाग नसतो. मधुपर्कानंतर
हणून नंतर ¶गवालंभन करावें. एवढा विधि झाल्यावर
रें करून वराचें पूजन करावें. पूजनानंतर वरास वेदीवर

ास प्रथम डावा पाय धुवून मग उजवा पाय धुवावा.

ाक्षतबदरीमिश्रं शंखपात्रस्थमिति—भर्तृयज्ञ
लशुभ्रसर्षपदुर्वादध्यन्वितं सुवर्णपात्रस्थमिति । हरिहरः

ुंक्ते स्नेहानुलेपने ।
ा नोच्छिष्टं मनुरब्रवीत् ॥

ांगितलें आहे तथापि—

वर्धन इति स्मृत्यंतर बलात्याज्य एव ।
ोक विद्विष्टत्वाच्च कलौ न विधेयः ।
क विद्विष्टं धर्ममप्याचरेन्नतु । याज्ञवल्क्य.

असल्याकारणानें द्रव्यद्वारा उत्सर्ग करून तें द्रव्य वराच्या समीप
. त्यावेळीं कन्येच्या पित्याचा नामोच्चार व
गवालंभपक्षे प्रतिब्रूयात् । उत्सर्गपक्षे तु "मातारुद्राणां" ॥
ांशक्त्वा उत्सृजत तृणान्यत्त्वित्युच्चैः प्रतिब्रूयात् ।

नेऊन शुभासनावर बसवून दारा परिग्रहण निमित्त संकल्प करवून योजक अग्नीची स्थापना करावी. त्या ठिकाणीं वेदीवर अरत्निमात्र हळदीचें स्थंडिल असावें. वेदीजवळ (तृणपुलिका) तृणाची पेंढी असावी, (हल्लीं तृणाचे पेंढी ऐवजीं दर्भ ठेवतात.) पतिपुत्रान्वित स्त्रियांनीं डाव्या हातांत दुधाचें पात्र घेऊन उजव्या हातांत साखर धरून ॐ प्रतिष्ठसमयीं ती साखर दुधांत घालावी. इतर स्त्रियांनीं वधुवरांवर मंगलाक्षता समर्पण कराव्या. (पूर्वी वधुवरांचें विवाह मंडपांत लागत असत, पण तो प्रकार हल्लीं नाहींसा झाला आहे.) वरास गृहांत नेऊन पूर्वाभिमुख कन्येस व पश्चिमाभिमुख वरास तांदुळाचे राशीवर उभें करून त्या उभयतांमध्यें अंतःपट धरावा. अंतःपट धरणारे अविधुर, सुपुष्ट व सद्वर्तनी असावे. अंतः-पटाचा शेला किंवा शाल ह्यांच्या दशा उत्तरेस असाव्या. दैवज्ञांनीं मंगलाष्टकें म्हणावीं, तीं म्हणून झाल्यावर "मनोजूतिऽजुषता" हा मंत्र म्हणून "ॐ प्रतिष्ठ" हा शब्द फार मोठ्यानें म्हणावा. वधूनें आपल्या हातांतील फुलांची माळ वराच्या गळ्यांत घालावी. अंतःपटाचा शेला किंवा शाल हीं उत्तरेच्या बाजूनीं ओढून घ्यावीं. नंतर वराचें तोंड पूर्वेस व कन्येचें पश्चिमेस असावें. ब्राह्मणांनीं आशीर्वादपर मंत्र म्हणावे. वराकडून आलेलें मौल्यवान वस्त्र कन्येकडून परिधान करवावें, त्यावेळीं वरानें—

ॐ **जरांगच्छ परिधत्स्ववासोभवा कृष्टीनामभिशस्तिपावा ।**

हा मंत्र म्हणावा. कन्येला उत्तरीयवस्त्र, म्हणजे कंचुकी, शाल शेला हीं द्यावीं. त्यावेळीं वरानें—

"ॐ याऽअकृन्तन्नवयं याऽअतन्वत । याश्चदेवीस्तन्तून-भितोततन्थ"

हा मंत्र म्हणावा. कन्येच्या पित्यानें वधुवरांकडून एकमेकांचें निरीक्षण करवावें. त्यावेळीं " संमजतुविश्वेदेवाः " हा मंत्र वरानें म्हणावा. आचारप्राप्त्यर्थ मंगल-सूत्र बांधावें, त्यावेळीं " मांगल्यतन्तुनानेन " व " ॐ यदाबध्नन्दाक्षायणा " हे दोन मंत्र म्हणावे. नंतर चतुर्विंशतितंतूंचें वेष्टन वधुवरांच्या कटीस ब्राह्मणांनीं " परित्वागिर्व्वणोगिर " ह्या मंत्रानें करावें. त्या सूत्राचा वधूच्या दक्षिण स्कंधावरून प्रारंभ करून त्याचे पांच फेरे स्कंधाभोवतीं व सात वेळ कटीप्रदेशीं करून वेष्टन करावें. वेष्टनाचेवेळचे जे सात मंत्र आहेत ते त्यावेळीं म्हणावे.

सूत्रावेष्टनानंतर कन्यादानाचा संकल्प करावा. संकल्प करून झाल्यावर वराच्या हातावर " सुप्रोक्षितादि " करावे. एक पळीभर उदक वधुवरांवरून ओवाळून अशुभ निरसनार्थ बाहेर फेकावें. वराकडून गोत्रोच्चार झाल्यावर कन्येकडून गोत्रोच्चार तीन वेळ व्हावा. यथाशक्ति अलंकृताचा संकल्प करतेवेळीं संकल्पित जलावर दर्भाची काडी ठेवून त्या जलासह कन्येचा उजवा हात वराचे उजवे हातावर द्यावा, त्यावेळीं त्यानें कन्याग्रहणसमयीं " प्रतिगृण्हामि " व कन्यादानाची दक्षिणा वरास अर्पण करावी, ती घेतेवेळीं वरानें " स्वस्ति " म्हणावें. कन्येस वस्त्रप्रावर्णादिकांचें यथाशक्ति दान द्यावें. दान देतांना कन्येच्या पित्यानें वरास सांगावें कीं, " धर्मेच अर्थेच " हा श्लोक म्हणून त्याची प्रार्थना करावी, त्या वेळीं वरानें " नातिचरामि " ह्मणावें. " कोदादिति कामस्तुतिं पठेत् " हें ह्मणून झाल्यावर सुवर्णाभिषेक करावा, त्यावेळीं " स यः कामयेत् " इत्यादि मंत्र ह्मणावे. " कन्येममाग्रतो भूयाः " इत्यादि प्रार्थनेचे पांच श्लोक ह्मणावे. मंत्र ह्मणून झाल्यानंतर गणपतिपूजन, कंकणबंधन, अक्षतारोपण, आम्रसिंचनादि कर्मे करावीं. वधुवरांस सूत्रावेष्टन करतात, त्यावेळचें स्कंधावरील सूत्र खालच्या भागानें काढून कमरेचें सूत्र मस्तकावरून काढावें, व त्याच सूत्रांचीं कंकणें हळदखंडयुक्त करून त्यांचें पूजन करावें. कमरेच्या बाजूच्या सूत्राचें कंकण वधूनें वराच्या उजव्या मनगटास व स्कंधावरील सूत्राचें कंकण वरानें वधूच्या डाव्या मनगटास बांधावें. कंकणबंधनानंतर वधुवरांनीं एकमेकांच्या मस्तकावर अक्षतारोपण करून आम्रसिंचन करावें. आम्रसिंचनानंतर " पित्राप्रत्तामादाय " हा मंत्र ह्मणून वधुवरांस मंडपांत वेदीवर बसविण्यास घेऊन जावें, त्यावेळीं वरानें " सोमःप्रथमो विविदे " व " सोमोददद्गंधर्वाय गंधर्वो ददग्नये" हीं सूत्रें ह्मणावीं, व त्यांनीं एकमेकांकडेस पहावें. अग्नीला प्रदक्षिणा करून तृणपुलिकेवर उजवा पाय ठेवून उत्तराभिमुख होऊन वेदीवर चढून भार्यात्वसिद्ध्यर्थ होम करावा. होमाकरितां शमीपलाशमिश्रित लाह्या असाव्या. ह्या लाह्या भ्रष्ट यवाबद्दल घ्यावयाचा असतात. नंतर लोहितमानडुहचर्माबद्दल दर्भ, कन्येचा बंधु, कोरें सूप, *दृढपुरुष, उदककुंभ व आचार्य द्रव्य इत्यादिकें

---

* दृढ पुरुषः कश्चिद्बलवान पुरुष इति–हरिहरः
दृढ पुरुषो जितेंद्रिय इति–भर्तृयज्ञः
जामातैवे दृढपुरुष इति–रेणुकादीक्षित गंगाधरः

करून कुशकंडिका करून प्रयोगांत सांगितल्याप्रमाणें होमकृत्य करावें. कुशकंडिकेनंतर बारा मंत्रांनीं " राष्ट्रभृत " होम करावा, तो करून झाल्यावर " जया होम " करून " अथाभ्यातान " होम अठरा मंत्रांनीं करावा. पांच मंत्रांनीं अग्निरित्यादि होमानंतर उदक स्पर्श करून लाजा होमास आरंभ करावा. लाजा होमाचेवेळीं वधूच्या भावानें शमीपलाशमिश्रित लाह्या वधूच्या ओंजळींत द्याव्या. वधूनें " अर्यमणं देवं कन्याऽअग्निमयक्षत " ह्या मंत्रानें त्यांतील तिसरा हिस्सा अग्नींत होमावा. " ॐ इयन्नार्युपब्रूते लाजानावपतिका " ह्या मंत्रानें ओंजळींतील अर्ध्या लाह्या होमून " ॐ इमांल्लाँजानावपाम्यग्नौ समृद्धिकरणं तव " हा मंत्र म्हणून राहिलेला सर्व भाग अग्नींत होमावा. हे वरील तिन्ही मंत्र वरानें वधुकडून म्हणवावे. नंतर सांगुष्ठम् " गृभ्णामिते " ह्या मंत्रानें वधूचा उजवा हात वरानें धरून वेदीच्या उत्तर बाजूला ठेवलेला अश्मा त्यावर वधूचा दक्षिण पाय ठेववावा. त्यावेळीं " ॐ आरोहेममश्मानमश्मेव त्वं स्थिराभव " हा मंत्र वरानें ह्मणावा. नंतर वरानें " गाथांगायति " ह्मणजे गाथासूत्र ह्मणावें. गाथासूत्र ह्मणून झाल्यानंतर वधुवरांनीं अग्नीला प्रदक्षिणा करतेवेळीं वधू पुढें व वरानें मागें असावें. ते समयीं सुवासिनीकडून पुढें जलधारा घालवावी. ह्याप्रमाणें द्विवार किंवा त्रिवार प्रदक्षिणा घालवाव्या. एवढें झाल्यावर वधूच्या भावानें सुपांत राहिलेलें होमद्रव्य सुपाच्या कोणप्रदेशानें वधूच्या हातावर ओतावें, व तिनें तें सर्व द्रव्य अग्नीस अर्पण करावें. अर्पण करतेवेळीं " ॐ भगायस्वाहा इदं भगाय न मम " ह्मणून अग्नींत आहुति द्यावी. आहुतिनंतर ब्राह्मणांनीं वधुवरांकडून अवशिष्ट कर्म करवावें. एवढें झाल्यावर सप्तपदीस सुरवात करावी. त्यावेळीं वेदीच्या उत्तर भागाला एकेक हात अंतरानें सप्त धान्यांच्या राशी कराव्या. हा मुख्य प्रयोग होय. कधीं कधीं सप्त धान्यांच्या ऐवजीं सुपाऱ्यावरच कार्यभाग आटपून घेण्यांत येतो. सप्ताचल पूजनाचा वराकडून संकल्प करवून त्या सप्ताचलाला वधूच्या उजव्या पायाचा स्पर्श व्हावा. सप्तपदीनंतर उदककुंभ वरानें उजव्या हातानें उचलून वधूच्या मुर्ध्निवर आम्रपल्लवानें " ॐ आपःशिवाः " ह्मणून अभिषेक करावा. अभिषेकानंतर वरानें आपला उजवा हात वधूच्या दक्षिण स्कंधावर ठेवून " ममव्रतेतेहृदयं दधामि " हा मंत्र ह्मणून त्याचा अर्थ वधूस समजावून द्यावा. नंतर वरानें आपल्या

उजव्या हाताची अनामिका वधूच्या मस्तकावर धरावी. त्यावेळीं " ॐ सुमंगलीरियंवधू " हा मंत्र ह्मणावा. नंतर वधूला वराच्या डाव्या बाजूस बसवून तिच्या मस्तकावर त्याच्याकडून शेंदूर भरवावा. नंतर " ॐ व्वाममद्यसवितर्व्वाममुश्वोदिवेदिवे " हा मंत्र व " दक्षिणतऽउहैकऽउपदधाति तदेताः " हा ब्राह्मण ह्मणावा. ह्या कर्माच्यावेळीं वधूस वराच्या उजवे बाजूस बसवावें. एवढें कर्म झाल्यानंतर वेदीजवळ पूर्वी टाकलेल्या दर्भावर वधूला पश्चिमाभिमुख बसवून अगर उभी करून " ॐ इह गावोनिषीदंत्विहाश्वा इह पूरुषाः " हा मंत्र दृढ पुरुषानें ह्मणावा. वरील विधि झाल्यावर वधूस वराचे उजवे बाजूस बसवून " ॐ अग्नये स्विष्टकृतेस्वाहा " असें ह्मणून यज्ञसमाप्ति करावी. कर्मसमाप्तिकरतां ब्राह्मणांनीं आचार्यास गोदान, क्षत्रियांनीं गांव, वैश्यांनीं गाडीघोडा द्यावा असा शिष्टाचार आहे. कित्येक वरील सर्वांनीं सर्व जावयांस द्यावें असें ह्मणतात. ब्राह्मणांनीं वधुवरांस आशीर्वाद द्यावा. त्यावेळीं " ॐ यद्वैतद्वाजप्रसवीयं जुहोति " ह्या मंत्रापासून पुढील पांच मंत्र ह्मणावे. वेदीवरील अग्नि " महानसे प्रक्षिप्य " *महानसांत चार दिवस ठेवावा.

† ऐरिणीप्रदान.

विवाहाच्या चौथ्या दिवशीं अपररात्रभागीं ऐरिणीप्रदान हें कर्म करावें. ऐरिणीप्रदानास १६ सुपें, ११ करक (डाळिंबें) फळें, सुवर्ण, शतछिद्री (गव्हाचें पीठ भरलेली) पंखा, वस्त्र, दीप, सौभाग्यद्रव्यें, नानाप्रकारचीं पक्वान्नें तांबूल हीं असावीं. व तीं सर्व ईश्वरपार्वतीप्रित्यर्थ वंशपात्रें म्हणून वरमातेस दान करावयाचीं असतात. कन्येच्या पित्यानें पत्नीसह पूर्वाभिमुख बसून आपल्यापुढें वंशपात्र ठेवावें, व नानातऱ्हेच्या वस्त्रांचा संभार जवळ घेऊन वधुवरांस पश्चिमाभिमुख बसवावें. वरमातेनें भर्त्यासह उत्तराभिमुख बसून विवाहकर्माची सांगता व कन्यादान संपूर्ण फल, तसेंच वधुवरांस बव्हायुष्य प्राप्त होऊन वंशवृद्धि व्हावी, एतदर्थ उमामहेश्वराप्रित्यर्थ हें कर्म करितों, असा संकल्प करून गणपतिपूजन, ऐरिणीपूजन वगैरे करून झाल्यावर वरमातेच्या हातावर—

---

* लग्न समारंभांतील स्वयंपाक घरांतील अग्नीस " महानस " म्हणतात.

† ऐरिणीप्रदान न केलें तर दोष आहेत, असें कित्येक स्मृतिकारांचें म्हणणें आहे करितां हें केलेंच पाहिजे.

वंशोवंशाकरः श्रेष्ठो वंशोवंश समुद्भवः ।
वंशपात्रमिदं दानं वंशवृद्धिकरं परम् ॥
वंशपात्रमिदं पुण्यं वंशजात समुद्भवम् ।
वंशानामुत्तमं दानं कन्यादान फलप्रदम् ॥

इत्यादि श्लोक म्हणून " शिवा आपःसन्तु " म्हणून तें वरमातेच्या (अगर तिच्या अभावीं आप्तइष्टाचें दांपत्य बसवावें) हातावर तें वंशपात्र दान करावें. ह्याच समयीं वराचे गोत्रज व आप्त ह्यांस वस्त्रादिकेंकरून संतुष्ट करून त्यांचें यथाविधि पूजन करावें. वधूच्या गोत्रजांनीं तें वंशपात्र वराच्या गोत्रजांतील मंडळी असेल त्यांच्या मस्तकावर धरावें, तेवेळीं "ॐ घृतवतीभुवनाशीम्" हा मंत्र म्हणावा. नंतर कन्या निवेदन करावें. त्यावेळीं वधूला वरपित्याच्या मांडीवर किंवा त्याच्या जवळ बसवावें. मांडीवर बसवितेवेळीं " इयंकन्या पुत्रवत् पालिता " हा श्लोक म्हणावा. वधूस वरमातेचे स्वाधीन करतेवेळीं—

अस्मदादि सुहृद्बंधूंस्त्यक्त्वायाति भवद्गृहम् ।
अतिस्नेहेन वै मातः कन्यां मे परिपालय ॥

असें म्हणून वरमातेच्या स्वाधीन आपल्या कन्येस करून अरुंधतीचें पूजन करून झाल्यावर पुनः तिला आपल्याजवळ घेऊन वराच्या स्वाधीन करतेवेळीं—

इयं कन्या मयादत्ता तव विप्रसहायिनी ।
स्वदेशे परदेशे वा परिपाहिकुलोचितम् ॥

असें म्हणून त्याच्या स्वाधीन करावी. एवढा विधि झाल्यावर वधुकडून *वसिष्ठअरुंधतीचें पूजन करवून त्यांच्या प्रित्यर्थ अर्घ्यप्रदान करवावें. अर्घ्याचे वेळीं—

अरुंधति महाभागे वसिष्ठप्रियवल्लभे ।
सौभाग्यं देहि संततं पुत्रपौत्रांश्च देहिमे ॥

वगैरे श्लोक म्हणून त्यांची प्रार्थना करवावी. अर्घ्य देतेवेळीं रौप्यमय †द्रव्य

---

* कित्येक ठिकाणीं ऐरिणीपूजनाचे वेळींच हें पूजन करवीत असतात.

† ह्या विवाहकर्मांत असा सांप्रदाय आहे कीं कन्येकडून प्रत्येक कर्माचेवेळीं जें द्रव्य येईल त्याच्या दुप्पट द्रव्य वराकडून घ्यावें. अरुंधति प्रित्यर्थ १६ वायनें यथाशक्ति द्रव्य-द्वारा द्यावयाचीं असतात. वधुकडील ८ व वराकडील ८ अशा सोळा ब्राह्मणांत तीं वाटावीं.

असावें, ता त्याचा निषेध सांगितला आहे. एवढें कर्म झाल्यावर ब्राह्मणांनीं आशीर्वादात्मक मंत्र म्हणून कर्माची सांगता करावी.

वरील कर्में झाल्यानंतर चतुर्थीकर्मास प्रारंभ करावा. ते वेळीं वेदीवर जो अग्नि स्थापन करावयाचा, तो विवाहदिनीं महानसामध्यें स्थापन केलेला अग्नि घ्यावा. चतुर्थीकर्माचें कारण सोमगंधर्वादिकांचे उपयुक्त दोष परिहार व्हावे हेंच होय. एतदर्थ चतुर्थीकर्माचे दिवशीं वरानें वधुगृहीं मंगलस्नान करावें. त्यावेळीं जसजसा कुलाचार असेल त्याला अनुसरून वर्तन ठेवावें. सासूस जें कांहीं देणें असेल तें कुलाचाराप्रमाणें द्यावें. स्नानानंतर वेदीवर वरानें उदकपात्रानें वधूच्या मूर्ध्निवर अभिसिंचन करावें. ते वेळीं "ॐ या ते पतिघ्नी प्रजाघ्नी" इत्यादि सूत्रांचा उच्चार करून अग्नि, वायु, सूर्य, चंद्र, गंधर्व ह्यांच्या नांवानें अग्नींत आहुति देऊन प्रायश्चित्त करावें. नंतर वधूनें वरास *स्थालीपाक प्राशन करवावा, त्यावेळीं—

† प्राणैस्ते प्राणान्संदधामि अस्थिभिरस्थीनि
मांसै मांसानि त्वचा त्वचम् ।

हा मंत्र ह्मणावा. स्थालीपाक प्राशनानंतर वरानें आचमन करावें. विवाह-दिवशीं बांधलेलीं कंकणें पूर्वीप्रमाणें एकमेकांच्या हातांतून एकमेकांनीं सोडावीं. कित्येक शिष्ट स्नानापूर्वी तीं सोडावीं असेंही म्हणतात.

देवकोत्थापनादि कर्में करून झाल्यावर दोन सुपाऱ्यांस सुताचें वेष्टन करून वरपित्यास व वधूपित्यास श्रेयाबद्दल उपाध्यायानें अर्पण कराव्या. नंतर आचार्यपूजन करून ब्राह्मण, सुवासिनी, इष्टमित्रांस वाज (अन्न) देऊन कर्माची सांगता करावी. विवाहप्रसंगीं घोडे रथ, थाटमाट वगैरे पुष्कळ केला, पण सुग्रास अन्न न मिळालें तर वाजी (घोडे) पुष्कळ असले तरी त्यांस शोभा नसते, करितां चार दिवस सर्वांस मिष्टान्नानें तृप्त करावें.

---

* स्थालीपाक हा ज्यावेळीं वधुवरें एकमेकांस भरवितात. त्यावेळीं तो वधूनें लागलाच तयार करावा, पण, तसें कित्येक ठिकाणीं न करतां लागलाच तयार करण्यापेक्षां तो घरांत केलेले लाडू वगैरे घेऊन तेच वधुवराकडून भरविण्यांत येतात.

† माझा प्राण व आपला प्राण, माझ्या अस्थि व आपल्या अस्थि, माझें मांस व आपलें मांस, माझी त्वचा व आपली त्वचा हीं आजपासून निराळीं नव्हत. तर तीं एकरूप झालीं आहेत.